करकाळ अकास..........................=४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस =१=६
दुसरे खेपस ..........=१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2R
per line over10... 4 as
Repetition pe line 3as

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY OCTOBER 7 1889 NO. 39

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ७ माहे अक्टोबर सन १८८९ इ० अंक ३९

श्री.

श्री व्यंकटेशानो स्वामी संस्थान देऊळगांव राजा ता० चिखली जि० बुलडाणें विद्यमान राव जगदेवराव राजे बाजीराव अज्ञान पा० क० राणी आहिल्याबाई साहेब जाधव जमीनदार सं० दौलताबाद वगैरे महालांत. यांचे तर्फे—

कौलनामा

येथील साहू व व्यापारी, कासार, मण्यारी, हलवाई वगैरे जनसमूह सन १८८९ इसवी. कौलनामा सादर केला जातो कीं, मामूल प्रमाणें आश्विनमासीं विजया दशमी रोज शुक्रवारचा श्रीजी साहेबांचा उत्साह आहे करितां सह कुटुंब सह परिवारें दुकानदारांच मालासहीत श्रीजींचे चरणापाशीं येऊन दर्शनाचा लाभ घ्यावा. कळावें ता० २७ माहे सप्टेंबर सन १८८९ इसवी.

( सही. ) म्यानेजर,
संस्थान देऊळगांव राजा.

## AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल अणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्या.....षयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल.एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक. दंतशाण. हीं औषधें मिळतील.

## जाहीर खबर.

विष्णाजी वल्लद गणाजी घाटोळे वस्ती शेगांव हल्लीं यांचा पत्ता नाहीं. व त्याचा बाप गणाजी वल्लद नानजी घाटोळे रहणार शेगाव हे उभयतां व त्यांचे आप्त वगैरे आणि तमाम सर्व लोक यांसः—

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं, विष्णाजी वल्लद गणाजी हा माझा लग्नाचा नवरा असून तो ८ आठ वर्षांपासून कोठें देशांतरी गेला अगर मेला ही खबर मजला पत्रद्वारें किंवा कोणते ही तऱ्हेनें नसोन तो गैरहजर असल्यानें त्याचा माझा कोणताच संबंध घडला नाहीं. व सदरील इसमाचे आप्ता कडून असें ही ऐकिवांत आले आहे कीं, तो आठ वर्षांपासून देशांतरीं जातानाच जातीभ्रष्ट जाहल्यामुळें मुसलमान जाहला होता यासाठीं असें कळण्यांत येतें कीं सदरील विष्णाजी जातीभ्रष्ट झाल्यामुळें आणि सतत ८ आठ वर्षांपासून त्याची वार्ता व पत्ता नसल्यामुळें त्याज बरोबर माझा झालेला विवाह मी व्यर्थ ठरवून कळवितें कीं, या पुढें मी आपला पाट लावून घेण्याचें मनांत आणिलें आहे यासाठीं या जाहिरातीनें प्रसिद्ध करितें कीं, सदरील विष्णाजी हा ज्या ठिकाणीं असेल त्याची व त्याचे बापाची अगर दुसरे कोणाची मी दुसरा पाट लावूं नये अशी कांहीं हरकत असल्यास त्यांनीं आज तारखे पासून एक महिन्याचे आंत मला लेखी नोटीशीनें कळवावें. ह्मणजे मी त्याचा योग्य विचार करून पुढील वर्तन करीन तसें न झाल्यास मी आपला पाट लावून घेईन. मग मी अगर ज्याशीं पाट लावला जाईल तो अपराधी न होता उभयतांचे करणें कायदेशीर व योग्य मानलें जाईल कळावें.

( सही )
भुली मर्द विष्णाजी हल्लीं
वस्ती बाळापूर इचे
हातची निशाणी खुद्द
बांगडी असे.

## मुंबई येथील महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा भाषणोत्सव

हा भाषणोत्सव तारीख २९ नोवेंबर १८८९ रोजीं सुरू होईल त्यांतील भाषणास पुढील विषय योजिले आहेत.

विषय पहिला—राष्ट्रीयसभेस पूर्णपणें यश येण्यास लोकांचें अंगीं कोणकोणते गुण आले पाहिजेत.

विषय दुसरा—सांप्रतच्या स्त्रीशिक्षण पद्धतीनें अत्यावश्यक जे गृहशिक्षण तें कितपत मिळतें? मिळत नसल्यास त्यास कोणते उपाय योजावे?

विषय तिसरा—आमच्या देशीं ( मराठी ) भाषेस वरिष्ठ विद्याक्रमांतून काढून टाकिल्यापासून होणारें राष्ट्रीय नुकसान.

मुलांकरितां.
( सोळा वर्षांच्या आंतील )

विषय चवथा— एखाद्या देशाभिमानी पुरुषाची हकीकत सांगणें.

बक्षीस.

| | | |
|---|---|---|
| विषय पहिला–३० रु. | २० रु० | |
| विषय दुसरा–३० रु. | २० रु० | |
| | + | |
| विषय तिसरा–२५ रु. | १५ रु० | |
| विषय चवथा–१० रु. | ५रु० | |

वक्त्यांस सूचना.

१. मोठ्यांच्या भाषणास ३० मिनिटें व मुलांच्या भाषणास १० मिनिटें याहून वेळ मिळणार नाहीं.

२. वक्त्यास एकाहून अधिक विषयावर बोलण्याच परवानगी नाहीं.

३. भाषण राजनिष्ठापूर्वक व कोणासही न लागे असें असावें.

४ या सभेकडून बक्षीस मिळालें असेल त्यांस फिरून बक्षिस मिळणार नाहीं.

५ बक्षिसें घेण्यापूर्वीं उमेदवारांनीं आपलीं भाषणें साद्यंत बाळबोध लिहून चिटणीसांस दिलीं पाहिजेत. त्यांजवर मंडळीचा हक्क राहील.

६ अर्ज नोवेंबर १५ चे आंत चिटणीसांकडे पाठविले पाहिजेत. अर्जांत त्यांनीं आपलें अध्ययन, व्यवसाय, जात व वय यांचा उल्लेख स्पष्ट करावा.

७. उमेदवारांनीं समारंभाचे आदले दिवशीं खुलाशाकरितां चिटणीस यांस भेटावें.

वर्गणीचे दर.

५रु. ३ रु. २ रु. १रु. ॥ रु०

विशेष सूचना–मंडळीचे सभासद होऊं इच्छिणारांनीं दर वर्षास तीन रुपये किंवा त्याहून अधिक वर्गणी दिली पाहिजे.

मंडळीचे आज्ञेवरून.
नारायण नरसिंह साठे.
महादेव वामन भट बी. ए. एल. एल. बी.
चिटणीस.
पत्ता--इंदुप्रकाश कचेरी मुंबई

+सदर बक्षीस आमच्या एका देशहितेच्छू महाराष्ट्र मित्राकडून आलें आहे

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

वाशीम २०–९–८९.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक सा० न० वि० वि०बऱ्याच दिवसात आपल्या भेटीस येण्यास अवकाश सापडला नाहीं त्याबद्दल माफी होईलच सालमजकुरीं पाऊस उत्तम पडून अजून पर्यंत शेती फारच चांगल्या स्थितींत आहे. निर्विघ्नपणें सर्वंगीक हातीं लागल्यास ह्या वर्षी धान्य फारच स्वस्त होईल असा अदमास आहे आतां सध्यां पाऊस नको आहे. वाट माध्यावर ३३ इंच पाऊस पाहिजे तितकाच पडला. आतां परजन्य समाप्तीचे दिवस जवळ आले. शरत् लागल्यापासून हिवतापानें डोकें वर उचललें आहे. बऱ्याच लोकांना त्यानें त्रस्त करून सोडलें आहे. पांच सात दिवसापूर्वीं येथें टोळधाड आली होती (Locusts) चार दोन शतांचें अगदीं नुकसान केलें असें ह्मणतात. ह्या टोळांचा रंग तांबूस होता. संख्या तर अगण्य होती. ही प्रचंड कित्येक मैलपर्यंत लांबीचा थवा जेव्हां शेतावर उतरला तेव्हां मग काय यमस्वरूपीच तो थवा भासूं लागला. ही वार्ता जेव्हां गांवांत आली तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांनीं ह्या कामीं फार त्वरा करून दोन दिवस फार मेहनत केली. व त्यांना यश येऊन तो यमस्वरूपी थवा तात्काळ उठून इंगोलीकडे गेला. ज्या ठिकाणीं कांहीं वेळपर्यंत तो बसला होता त्या स्थळाचा देखावा जळकटलेल्या ठिकाणाप्रमाणें दिसतो झाडावर पान नाहीं कां शेतांत कांहीं ठेविलें नाहीं. ह्या हद्दींतील जें त्यांनीं नुकसान केलें त्यापेक्षां बाहेरचे गांवीं अधीक केलें अशी खबर आहे. टोळ आल्याची वार्ता गांवात आल्याबरोबर लोकांच्या मनाची स्थिती अगदीं चमत्कारिक झाली सर्व कामें शेतीवर चालावयाचीं. व्यापार उदरनिर्वाह, विद्या कला अनेक कारखाने हे सर्व शेतीच्या जोरावरच चालावयाचे. शेतीवर ऐन घांस तोंडांत पडण्याचे वेळीं अशा प्रकारचें विघ्न आलेलें कळतांच सर्वांच्या उरांत भितीची धडकी भरली. प्रत्यक्ष शेतकरी लोक तर ढळढळां रडले असो. "भयकृत भय नाशनः" त्या प्रभूनेंच विघ्न आणिलें होतें व त्यानेंच त्याचें निवारण केलें वर ध्वनींत केलेली व्याधी शिवाय करून बाकी प्रकारें लोकांची आरोग्यता साधारण बरी आहे.

हल्लीं येथें श्री बाला साहेबांचा उच्छा[...] सुरू आहे. उदरंभर ब्राह्मणांची मोठी चै[...] आहे. सायंकाळीं बहुधा पाऊस असतो य[...] मुळें उत्साहांत जरा कमीपणा येऊं पहा[...] परंतु हा पराधीन गोष्ट असल्यामुळें व्यवह[...] पकांचा काय इलाज.

येथें कांठे वेशीजवळ एक साधु ये[...] पिंपळाच्या पारावर आसन घालून ब[...] आहेत इतकेंच नाहीं तर त्यांनीं पिंप[...] च्या झाडास एका फांदीला एक [...] दोरी बांधून त्या दोराला [...] टांगून घेतात. कित्येक वेळां ख[...] डोकी वर पाय अशा स्थीतींत लोंबत रा[...] त व आपल्या शरीराला अतिशय कष्ट [...] त. तपश्चर्येची नवीनच रीति पहाण्यांत [...] ली. हल्लीं असें समजतें कीं हे साधु प[...] र्थ साधना करितां देह कष्टवीत नाहीं[...] लोकांनीं आपल्याला पांचशे ब्राह्मणांचा [...] दा द्यावा ह्या करितांच साधुचा साधन[...] यत्न चालला आहे. साधु कसा असला [...] जे या विषयीं प्रसिद्ध साधु तुकाराम [...] एक अभंग आहे तो खालीं लि[...] प्रमाणेः—

॥ आत्मा अनुभवीं चोखाळिल्या वाटा ॥
॥ त्याचे मार्थां नटा असो नसो ॥
॥ पर खोंचे ठार्यी जो कां नपुंसक ॥
॥ त्याचे अंगीं राख असो नसो ॥
॥ परद्रव्य आणि परनिंदेसी जो मुका ॥
॥ तुका ह्मणें देखा साधु तोची ॥
पुढें पुरवणीपहा.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती आश्विन शुद्ध १३ शके १८११

## वरपासून छाट.

आलीकडेस सरकारचें लक्ष्य खर्च कमी करण्या कडेस लागलें आहे. त्या संबंधानें कोणत्या योजना चांगल्या अशा विषयीं अनेक सूचना झाल्या आहेत व होत आहेत. परवाच्या मुंबई ग्याझेटांत वर दिलेल्या माथाळ्या खालीं या संबंधानें एक सूचना लेख आला आहे. ज्या गृहस्थानें हा लेख लिहिला आहे, तो सरकारी नोकर असून त्याचा पगार हजारावर आहे. त्यानें गव्हरनर जनरल पासून सरजन जनरलपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांची नांवें व त्यांचे पगार याची एक याद दिली आहे. ती खालीं दिल्या प्रमाणें.

| हुद्दा | दरमहा पगार. |
|---|---|
| व्हाईसराय | २०,९०० |
| मद्रास गव्हरनर | १०,००० |
| मुंबई गव्हरनर | १०,००० |
| गव्हरनर जनरलच्या कौंन्सिलचा प्रेसिडेंट | ६,७०० |
| बंगाल ले० गव्हरनर | ८३३३-५-४ |
| वायव्य प्रांत ले. गव्हरनर | ८३३३-५-४ |
| पंजाब ले० गव्हरनर | ८३३३-५-४ |
| बंगाल चीफ जस्टिस | ६,००० |
| गव्हरनर जनरलच्या कौंन्सिलच्या प्रत्येक मेंबराचा पगार. | ६४०० |
| मद्रास चीफ जस्टिस | ५००० |
| मुंबई चीफ जास्टिस | ५००० |
| वायव्य प्रांत चीफ जस्टिस | ५००० |
| आसाम चीफ कमिशनर | ४१६६-७-० |
| मध्य प्रांत चीफ कमिशनर | ४१६६-७-० |
| ब्रह्मा चीफ कमिशनर | ६,६६६-८-० |
| मद्रास कौंन्सिलर प्रत्येकी | ५,११६-१०-८ |
| मुंबई कौन्सिलर प्रत्येकी | ५,१२० |
| हैद्राबाद रेसिडेंट | ४,८४० |
| गव्हरनरजनरलचा एजंट रजपुताना | ४,००० |
| गव्हरनरजनरलचा एजन्ट मध्यप्रांत | ४,००० |
| " " " बडोदें | २,५०० |
| कमांडर इ. चीफ | ९८३३-५-४ |
| मुंबई कौन्सिलचा आडिशनल मेंबर | ४,४६६ |
| "चे चीफ सेक्रेटरी | ३,७५० |
| राजकीय सेक्रटरी | ३१२५ |
| उत्तरभाग जनरल कमांडर | ३,५०० |
| मध्य भाग जनरल कमांडर | ३५०० |
| हायकोर्ट जज्ज प्रत्येकीं | ३,७५० |
| कस्टम कमिशनर | ३,५०० |
| सर्वे सेटलमेंट कमिशनर | ३,००० |
| फ. ग्रे. से. जज्ज | ३,००० |
| एडन पोलिटिकल रेसिडेंट | ३,००० |
| काठेवाड पोलिटिकल एजंट | २,५०० |
| कोल्हापूर पोलि. एजंट | २,२०० |
| मिंठ मास्तर | ३,००० |
| साल्ट रेव्हेन्यू कमिशनर | २,५०० |
| विद्याखात्याचे डायरेक्टर | २,५०० |
| सर्जन जनरल | २,५०० |

आतां यांत नवल ह्मणून इतकेंच कीं एवढा मोठा खर्चाचा बोजा बिचाऱ्या गरीब हिंदुस्थानाला सतत सोसावा लागत आहे. खेरीज ही मंडळी इकडील सुख भोगून विलायतेस परत गेल्यावरही त्यांच्या पेनशनाचा भार हिंदुस्थानालाच तोलावा लागतो. असें चालणार तरी किती दिवस! वरील गृहस्थांची सूचना ही कीं हजार रुपयांच्या जागेपासून तहत लाट साहेबांच्या जागेपर्यंत सर्वांचा पगार शेंकडा २५ टके प्रमाणें कमी करण्यांत यावा. व या गोष्टीच श्रेय लाट साहेबांनीं आपणा कडेस घ्यावें ह्मणजे हिंदुस्थानावर अतिशय मोठा उपकार होणार आहे. ज्या कोणास ही तोड पसंत नसेल त्यांनीं पाहिजे तर नोकरी सोडून चालते व्हावें त्यांच्या इतके हुषार कामगार अशा संधीची मोठ्या खुषीनें वाट पहात आहेत. युक्ति तर उत्तम काढिली. परंतु अमलवारी होणें कठीण आहे खर्च कमी करण्याची चालू व्यवस्था ह्मणजे कारकून व शिपाई कमी करणें व भत्ता बंद करणें.

इतर प्रांताप्रमाणें वऱ्हाडांत सर्व खातीं वेगवेगळीं असून त्यावर काम करणारे अधिकारीही स्वतंत्र आहेत व कोणत्याच शेजारच्या प्रांताशीं वऱ्हाडचा संबंध नाहीं फक्त काय जो संबंध थोडासा आहे तो विद्याखात्याचा आहे. तो असा कीं वऱ्हाडांत इतर प्रांता प्रमाणें महापाटशाला व युनिव्हर्सिटी नसून या संबंधानें वऱ्हाडप्रांत मुंबई ईलाख्याशींच जुळविला आहे व ज्या अर्थीं वऱ्हाडांत फार श्रीमान् लोक नाहींत व सरकारही त्याप्रित्यर्थ पुष्कळ खर्च करण्या करितां तयार नाहीं त्या अर्थीं वऱ्हाडला या संबंधानें इतर प्रांताकडेच पहाणें भाग आहे. वऱ्हाडांत दोन हायस्कुलें आहेत व या दोन हायस्कुलांतून दरसाल मॅट्रिक्युलेशन परीक्षेकरितां मुंबईलाच उमेदवार पाठविले जातात व सुमारें २५ विद्यार्थी दरवर्षीं अलीकडे मॅट्रिक्युलेशन पसार होतात. पसार झाल्यावर वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांस बक्षिसें व स्कालरशिपा मुंबई युनिव्हर्सिटींतून च मिळत असल्या मुळें व इतर इलाख्या पेक्षां मुंबई जवळ असल्या मुळें बहूतेक विद्यार्थी मुंबईच्याच कॉलेजांत शिकण्यास जातात.

मॅट्रिक्युलेशन पसार झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं जे ह्मणून कांहीं थोडेबहूत श्रीमान् असतात किंवा ज्यांना ह्मणून वऱ्हाडच्या ३ स्कालरशिपा मिळतात तेच जातात. बाकीच्यांना आपल्या अभ्यासाचा राजीनामा देऊन उदर निवारणार्थ नोकरीदेवीचीच प्रार्थना करावी लागते. एखादे कॉलेजांत गेल्या शिवाय किंवा कायद्याचें अध्ययन केल्या शिवाय कोणचाही स्वतंत्र धंदा करण्याचें सामर्थ्य येत नसल्यामुळें सर्वांना परतंत्रतेचा सहवास सहन करावा लागतो.

कॉलेजांत शिक्षण मिळावें असें सर्वांस वाटतें परंतु तें मिळण्यास फार पैसा लागत असल्यामुळें तें फार थोड्यांच्याच वाट्यास येतें. आधींच कॉलेजांतील शिक्षण मिळणें फार कठीण आहे परंतु या पुढें अधीक अधीक कठीण होणार व त्या प्रमाणें हल्लीं थोडें झालेंही आहे.

मुंबईच्या युनिव्हर्सिटीची परवां नुकतीच एक सभा भरली होती त्यांत ऑनरेबल मि. तैलंग मुंबईचें प्रसिद्ध ब्यारिस्टर यांनीं अशी सूचना केली आहे कीं बी. ए. परीक्षेची मुदत तीन वर्षांची आहे ती यापुढें चार वर्षांची करावी व ती सूचना मंजूरही झाली आहे. ह्या सूचना करण्याचें मुख्य कारण तें असें सूचवितात कीं अलिकडे जे म्हणून विद्वान युनिव्हर्सार्टीत पदव्या मिळवून बाहेर पडतात त्यांच्या आंगीं जितकें ज्ञान असणें जरुर आहे तितकें नसतें सबब एक वर्ष पर्यंत शिक्षण जास्त मिळालें म्हणजे ती उणीव दूर होईल. सूचना कांहीं वाईट आहे असें म्हणता येणार नाहीं कारण शिक्षण हे कितीही दिवस मिळालें तरी ते थोडेंच आहे परंतु ही सूचना करते वळेस लोकांच्या स्थितीचा शिक्षणा प्रित्यर्थ लागणाऱ्या खर्चाचा व सरकारचा आज काळच्या हेतूचा त्यानीं पूर्णविचार केला नसवा असें वाटते कालेजांत राहण्यास निदान प्रत्येक विद्यार्थ्यास दरमाहा ३० रुपये खर्च लागतो त्या मानानें प्रत्येक वर्षी ३६० रु. होतात व या प्रमाणें निदान ४ वर्षे पर्यंत खर्च करावयाचो म्हणजे लहान सहान गोष्ट नाहीं दरसाल ४०० रुपये मुलाच्या विद्या प्रित्यर्थ खर्च करणाऱ्या बापाचे निदान १५०० रु. तरी वार्षिक उत्पन्न असलें पाहिजे. इतक्या उत्पन्नाचे लोक आज किती आहेत याचा कांहीं तैलंग साहेबानी विचार केला आहे काय! तीन वर्षेच इतर कुटुंबाचा खर्च चालवून कालेजांत मुलाला ठेवणें म्हणजे आलिकडच्या मोठ मोठ्या श्रीमान म्हणविणाऱ्या लोकांच्या जीवावर येतें. परंतु शिक्षणा शिवाय निभत नसल्यामुळें कशीही काटकसर करून मुलाला पैसा पुरविणें भाग पडतें. त्या अशास्थितींत आणखी एक वर्षाचा खर्च वाढविणें ह्मणजे लोक स्थितीस केवढें बरें कठीण आहे. कदाचित तैलंग साऱख्यांच्या लक्षांत हें आले नसल व आले तरी त्या बद्दल त्याना विशेष महत्व वाटणार नाहीं व असें वाटणें त्याना सहज आहे. कारण गरीबीचा अनुभव चांगला अंगीं असल्याशिवाय एक पैशावाचून कशी अडचण होते हें समजावयाचें नाहीं. बरें हा ही विचार कदाचित एकीकडे ठेवून पुढें होणाऱ्या फायद्याकडे कदाचित लक्ष देऊन आह्मी असा एवढा मोठा खर्च करण्यास तयार होऊं परंतु अलीकडे शिक्षणाचो सरकारांत काय किंमत आहे व कितपत मान आहे हें सर्वांस माहित आहेच. बी.ए.ला वीसपंचवीस रुपयाची जागा पतकरण्याची वेळ आली आहे शिक्षणाप्रित्यर्थ दरमहा लागणाऱ्या खर्चापेक्षां जर उत्पन्न कमी होऊं लागलें तर त्या प्रित्यर्थ एवढा मोठा खर्च करणें लोकांना बरें वाटेल काय! दुसरें असें कीं सरकारही हा खर्च होता होईल तोपर्यंत कमी करावा व या शिक्षणाचे सर्व ओझें लोकांच्या आंगावर टाकावें ह्मणून विचार करीत आहे व त्याप्रमाणें सरकारनीं केल्यास लोकांना हे शिक्षण कितपत मिळेल याजबद्दल तर आमचा हिंदुस्थान विचारांत आहेच तर अशा स्थितींत मि तैलंग यानी केवळ परकीयांची विद्येत बरोबरी करावी एवढ्याच इच्छेनें आपली सर्व स्थिती विसरणें हें मोठें दुर्भाग्य समजलें पाहिजे.

मि. तैलंग हे समाजाचे पुढारी ह्मणविले जातात त्याच्या सारख्याच्या विचारावर सर्व समाजाचा उत्कर्ष अवलंबून आहे तर त्यांनीं जर सूचना करून लोकांच्या शिक्षणाच्या मार्गीं दिवसेंदिवस येणाऱ्या अडचणींत वाढ केली तर मग इतरांना काय ह्मणावें! हिंदुस्थानचा उत्कर्ष विद्येचा प्रसार झाल्यानें होणार ना! तर मग अशा रीतीनें सर्वांना शिक्षण मिळेल कां! कधींही मिळणार नाहीं. कदाचित् या रीतीनें कांहीं थोड्या लोकांना चांगलें शिक्षण मिळेल. परंतु त्या योगानें समाज सुधारणार नाहीं व त्यामुळें हिंदुस्थानची स्थितीही बदलेल किंवा नाहीं याचा मोठाच संशय आहे.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 7 1889.

Paucity of officers in Berar at present proves very highly injurious to the interests and rights of the subject. There is neither a magistrate nor a judge of any grade at Badnera. The consequence is that such of the rights of the subject as require immediate attention and which on account of their being neglected at the moment are lost for ever. The great principle of law where there is right there is remedy is trampled down without the slightest regard to the conveniences of the subject. The Court at Malkapur— an important town in Berar is left without a single officer to look to the rights of the people. The work that used to be done at Malkapur has to be taken 28 miles away from the seat of the Court. For a suit of 10 or 12 Rupees a man must travel 28 miles and incur enormous amount of expense before he can get redress at the hands of the pediciary. This may not at all be strange in the sight of the Resident but to the poor ryot entrusted to Her Majesty's Care it is oppression in the extreme.

There is no Judge also at Badnera and that Court has been closed for suits of all kinds. All work from Badnera that can only be tried by a subordinate Judge is sent to Amraoti to be tried by a new Judge Mr. O'Grady. The work on this officer's hands is already full and over full and to load him further with work is simply absurd. The Government is certainly not doing its duty to the people concerned in Civil litigation.

At Buldana, again, there is practically speaking only one Court at present, and it is presided over by Mr. Harbamji. This officer has original jurisdiction in Civil cases of the District from Rs. 500 upto any amount. He has also original Civil cases below Rs. 500 of the Court of Malkapur and Chikli. He also performs the duties of an appellate Court of the District. The result is that, this officer finds it impossible to go through the whole work during office hours. If at all he does despatch the work entrusted to him it is necessarily very hurridly done. The attention both to law and evidence which ought to be given to original cases cannot be ad-

equately given to numerous applications and plaints that are on the file of the Court. If a mistake happens in the Court of first instance that can be mended in the Court of Appeal. But in regard to first appeals if adequate care and attention be not paid to questions of evidence and questions of law which depend on evidence an irreparable injury is done to the parties. Mr. Harbamji is a very careful officer and having received superior education in England is in every way fitted to discharge the onerous duties entrusted to his care. Moreover by descent he is a prince of the blood royal in Kattyawar, consequently having ample means at his disposal, he is one of the most reliable officer that the Government of India could have secured in its service for Berar. He is a man of very quiet nature and is amiable. But all these qualities in this Prince ought not to go to be a means for imposition on him of an enormous quantity of work of the District. Therefore it would be much better for the protection of the interests of the subject if arrangements are made early to appoint officers for several Courts now left vacant for one reason or another. It is the paramount right of the subject to have the administration of justice done properly and well; and if there is anything that savours of hardship to him, it is the bounden duty of the Government to see that that hardship is removed and course of justice made smooth and easy.

## DISCIPLINE AND MORAL TRAINING IN SCHOOLS AND COLLEGES IN INDIA

Continued from the issue of 2nd September 1889.

8. It was admitted in the Home Department letter of 31 st December, 1887, that the monitorial system cannot be as effectual and aid to discipline in India, where schools are mostly day schools, as it is in England. At the same time his Excellency in Council believes that the adoption of rules, such as the Elphinstone High School Rules referred to in paragraph 17 of the letter, will be found productive of advantage. The essence of these rules is the independent power of punishment given to Prefects, which is thus referred to by Mr. Jacob, who introduced the system into the Elphinstone High School.

" It is the delegation of this diciplinary power to the Prefects that emphatically marks the trust reposed in them and brings them to look upon the reputation and prosperity of the school as partly committed to their keeping. If you withhold this power, and require the Prefects not to preserve discipline but merely to report breaches of it to the masters, you reduce the Prefects to the position of mere tale-bearers. Self-Government becomes government by espionage, and with a decided tendency to develop nothing but ignoble traits of character in those who are allowed to play no higher part in it than that of menials. "

In Bombay the Elphinstone Rules are to be circulated, and an attempt made to introduce the system in High schools generally. In Bengal the monitorial system will be tried in hostels, and subsequently extended, if successful. In the North-western Provinces and oudh and in Assam it will be tried in selected schools. In the Punjab, the Central Provinces, and Berar the system is recognized already, especially in the Punjab: it is to be extended in the Central Provinces and Berar On the whole, the Government of India is satisfied with the manner in which local Governments and Administrations have accepted its suggestion on this matter. Time will show whether the system is well-suited to Indian boys, and with the improvement of the quality of teachers it will be possible to extend it generally, If it is found to succeed in the better schools.

9. On the proposal to enforce the exclusion from school of boys who do not reach a certain class by a certain age the general opinion is that a rigid application of a rule of this nature would involve the risk of injury to classes of society whose backwardness requires encouragement. The Governor-General in Council recognizes the force of this argument; and as he thinks that there is not the same objection to big and small boys being associated together at day schools as there is at boarding schools his Excellency in Council is content to leave the matter to local Governments and Administrations, on the understanding that the recommendation in paragraph 18 of the letter of 31st December 1887, will not be lost sight of.

10 The question of inter-school rules is one of great importance in the interests of discipline, and rules on the subject are already in force in nearly every province. The points which it is essential to secure are, that, without the consent of the educational authorities, a boy shall not be taken into a school who has been dismissed from another school for misconduct; that failure to pay his school fees in his former school shall debar a boy from admission to another school, except under similar consent of the educational authorities and that if recieved into another school a boy shall not be placed in a higher class than the class he was in before leaving the other school, except at the begining of a new term. The rules on the last point should only be applicable to schools of the same grade; those on the first and second points would be generally applicable to schools of all grades.

The rules in the Madras and Bombay Presidencies are too exclusively directed towards the second of these objects. Those in Bengal and the North-Western Provinces and Oudh seem to give more or less effect to the three essentials; but the point of dismissal for misconduct might be brought into greater prominence even in these provinces. In the Punjab rules have been prepared, which apply to all Government and aided schools; but it is not proposed to ask the University to co-operate on the ground that the number of unaided schools and Colleges in the province is very small. In the Central Provinces there are no inter school rules at present, and it is proposed to introduce simple rules to apply to schools in the same town. This limitation, however, seems calculated to diminish the effect of the rules, and should be reconsidered by the chief Commissioner. The rules in Burmah apply to all Government schools and aided schools of the advanced kind. They are defective in that they contain no reference to conduct. Revised rules are being issued in Assam, which, if acted upon by the managers of unaided schools, will go far to meet the objects which the Government of India has in view.

(To be continued).

## HYDERABAD RESIDENCY ORDERS OCTOBER 1, 1889.

The Residency Orders Notification No. 213 dated the 10th September 1889, granting privilege leave for 50 days to Mr. G. Soobrayaloo Naidu, Tahsildar of Morsi in the Amraoti District, is hereby cancelled.

Under Section 6 of the Indian Registration Act, III of 1877, the Resident is pleased to direct the following transfers of Sub Registrars.

| | From | To |
|---|---|---|
| Mr. Jayram Krishna ... | Tamgaon, Akola Dist. | Akola Dist. |
| Mr. Sakharam Mahadeo | Akola. | Tamgaon |

These transfers are made at the request of the officers concerned.

In exercise of the authority conferred by section 15 of the Code of Criminal Procedure, the Resident is pleased to appoint Messrs H. McIntyre, Aba Rao, Khan Saheb, Bhole Khan, and Pooran Lal to be Special Magistrates for the town of Khamgaon in the Akola District, and to compose a Bench and in such capacity to exercise the powers of a Magistrate of the 3rd Class.

In further exercise of his authority under section 16, clauses (c) and (d) of the Code of Criminal Procedure, the Resident is pleased to direct:

That no Bench shall be formed for business unless two of the Magistrates above named are present throughout the sitting.

That Mr. H. McIntyre when present shall be the Chairman of the Bench and in his absence that a Chairman shall be elected by the members present, provided that when only two are present the senior by age shall preside.

That in the event of a difference of opinion, the Bench consisting of two or four and being equally divided, the Chairman shall have a casting vote; in other cases the majority shall decide.

That the Chairman shall write the proceedings.

Mr. Wasudeo Sadashiv Pisolkar, who has been appointed an Extra Assistant Commissioner of the 5th Class in Foreign Department Notification No. 1599-G of 6th September 1889, is posted to the Amraoti District.

The Resident is pleased, under section 8 of the Hyderabad Assigned Districts Courts Law, to declare that the Court of Mr. Wasudeo Sadashiv Pisolkar, Extra Assistant Commissioner within the Hyderabad Assigned Districts shall be that of an Assistant Commissioner of the 3rd Class.

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Wasudeo Sadashiv Pisolkar, Extra Assistant Commissioner within the Hyderabad Assigned Districts, to be a Magistrate of the 2nd Class.

With reference to Rule II, of the Rules framed under the Berar Rural Boards Law, 1885, and promulgated in the *Residency Orders* Notification No. 167, dated the 8th July 1889 the Resident is pleased to direct the publication of the subjoined list of members of the District Board of the Buldana District

*Elected Members* (18).

Taluk Board Chikhli.

1 Mr. Balaji Narsinha, Deputy Educational Inspector, Buldana.
2 Khan Bahadur Mahomed Salamull-Khan, Special Magt. Deulghat.
3 Mr. Waman Renko, Pleader Buldana
4 ,, Yeshwant Mahadeo, Tahsildar of Chikhli.
5 ,, Anant Ramkrishna Deshpandey Deulghat.
6 ,, Jankiram Waman of Sakli.

Taluk Board Mehkar.

7 ,, Balkrishna Kashinath, Tahsildar of Mehkar.
8 ,, Sheoram Krishna, Overseer Mehkar.
9 ,, Kashinath Bhikaji, Pleader, Mehkar.
10 ,, Kwaja Abdul Bahki, Mehkar.
11 ,, Vyankat Natho of Fatehkhelda.
12 ,, Ganesh Nilkantha.

Taluk Board Malkapur.

13 ,, Trimbuk Myral, Pleader Malkapur.
14 ,, Eknath Moreshwar, Tahsildar of Malkapur.
15 ,, Damodar Hari, Pleader, Malkapur.
16 ,, Khan Bahadur Khwaja Badi-ud-din, Special Magistrate of Malkapur.
17 ,, Kesheo Vishnu, Pleader Malkapur.
18 ,, Nathmal Chandanmal of Nandura.

*Members appointed by Commissioner* (5)

1 Mr. Narayen Prabhakar, Head Master A. V. School Chikhli.
2 ,, Sheik Abdul Ryhim of Loni Gouli.
3 ,, Hari Moreshwar, Head Master, A. V. School, Malkapur.
4 ,, D. Callaghan, Civil Surgeon, Buldana.
5 ,, Krishnaji Mahadeo, Local Fund Supervisor, Buldana.

The Resident is further pleased to direct that this Board shall come into existence from the date of this notification.

Ellichpur, Berar 4th October 1889

To

The Editor "Berar Samachar"

Sir,

Please insert the following lines in the next issue of your journal:—

Colonel Mackenzie, Judicial Commissioner H. A. D. came here and went to Chikalda.

*Ram Lila*.—The Hindu members of the 1st Infantry Regiments H. C. located at Paratwada, performed the ceremony of *Ram Lila* with greatest pomp and *eclat*, The festival commenced on Ashwin Shudh 1 and closed on the night of Dasara Holiday, The extensive plain of *Parode* ground was selected in performance of the ceremony. Towards the North side of *Maidan* was constructed something like the city of *Ayodhya*, the abode of *Rama*, in which conspicuously stood a huge and gigantic image of *Maruti*, the chief devotee of *Rama*. Towards the South was built the city of *Lunka*, the capital of *Ravana*, the bitter enemy of *Rama*. Huge images of *Ravana* having ten heads and twenty hands, and Kumbhkarna and Shurpanaka that had been made to stand glaringly on the site, gave the spectators a good idea of the plan being *Lunka*. From the first day commenced the reading of Ramayana in song attended with tunes of *Zanj* and *Dholak*. The nineth day was devoted to the performance of the play of "Sangita Gopichand," which though not liked by educated and advanced gentlemen, was much admired by the ignorant public. The ceremony reached its climax on Dasara Holiday. People commenced to pour in from surrounding villages at 5 P. M. and at 7 P. M. the whole of the *Parode* ground was full of thousands of spectators numbering about 25,000. A beautiful *chamina* was pitched to accomodate European officers and Ladies to see the fun. The place was nicely decorated with a line of lamps and hanging glasses, which furnished ample lights on the occasion. The exhibition of fireworks was most marvellous and admirable. The burning of *Hawaees* and *Nalees* producing beautiful flowers, discharge of *fire baus*, which going up with greatest force attended with a hissing sound, appeared to reach sky in a minute the ascensions of fire boloons (*gubares*) high in heaven and mainly the exhibition and burning of fire trees of various kinds all this furnished to spectators a most brilliant and pleasing sight, which greatly interested and amused the minds of people. At 10 30 P. M. the image of Ravana was set on fire and when his head fell down, some spectators hoiled with joy, admiring and eulogising *Rama* for his bravery and martial spirit shown by him in destroying the *Rakshasa*, who had harassed the holy *Sita* and pure Tapaswi Brahmins. On the whole the scene was most imposing and amused the public for while. The Police or rather Military *Bandobasta* was most satisfactory and creditable to officers doing duty.

Yours truly
"X"

## वर्तमानसार.

फक्त जबलपूर शहरांत तात्याचे एक हजार फोटोग्राफ खपले.

तंजावर जिल्ह्यांत तिरुवडी येथें येत्या जानेवारी पासून एक संस्कृत वर्तमानपत्र निघणार आहे.

आमच्या पब्लिकवर्क खात्याच्या सेक्रेटरीची नेमणूक पांच वर्षांची असावी. अशी हिंदुस्थान सरकारानें शिफारस केली आहे.

काबूल येथें तापाची साथ उद्भवली आहे. देवीही आल्या आहेत. यामुळें काबूलचे अमीर लवकरच जलालाबादेस जाणार आहेत.

इंग्लिश वसाहत झालेल्या कोट नांवाच्या बेटांत मुसलमान व ख्रिस्ती यांच्यांत मोठा दंगाधोपा सुरू आहे. तेथील इंग्लिश लोक दिवसा ढवळ्या बायकांवर जुलूम करीत आहे.

मुंबई ब्यांकेचा दर कमी झाला असून तो चार टक्के आहे.

लेडी डफरीन फंडाची स्त्रियांस वैद्यकी संबंधानें शिकविण्याची एक शाळा नाशकास सुरू होणार आहे असें ह्मणतात.

तूं आपले संडास हल्लीं आहेत त्याहून जरा लांब बांध असें बेळगांव म्युनिसिपालिटीनें दशरथ नांवाच्या एका मनुष्यास सांगितलें. तो तसें करीना ह्मणून म्युनि० पालिटीनें त्याजवर फिर्याद केली तेथील क्यांटानमेंट माजिस्त्रेट तो जागा पहावयास गेले व त्याच वेळीं आरोपी हजर नसतां अथवा आरोपीचें काय ह्मणणें आहे तें ऐकून न घेतां आरोपीस ५० पन्नास रुपये दंड केला. आरोपीनें तो दंड भरला परंतु तेथील जज्ज डा. पोलन यांणी माजिस्त्रेटनें केलेलें हें काम गैरशिस्त आहे असें ह्मणून तो खटला विचार करण्या करितां हाय कोर्टाकडे पाठविला हाय कोर्टानें माजिस्त्रेटचें कृत्य बेकायदेशीर आहे कारण खटल्याची मुळींच चौकशी झाली नाहीं असें ठरवून दंड परत दिला वरील माजिस्त्रेट हे मुन० चे मेंबर ही आहेत. मुनसि० चे मेंबर असूनच माजिस्त्रेटचें काम करणारांनीं या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें.

अमेरिकेंत नुकतेच एक विमान उडविण्यांत आलें हें विमान उडविणारी एक बाई होती. हें विमान ७००० फूट उंच गेलें होतें. विमानारोहण बाई खालीं येत असतां वाटेंत एका मनोऱ्यावर बाईची छत्री अडकली पण बाई धीराची असल्यामुळें न डगमगतां तशीच ओळकंबत राहिली. पुढें धाबाधाब होऊन त्या बाईची छत्री त्या मनोऱ्यावरून सोडविली ती पुन्हा ती बाई दुखापत न होतां खालीं आली. अशाच प्रकारची दुसरी एक भयंकर गोष्ट घडून आली आहे. यावेळीं विमान उडविणारा अतिशय उंच गेला तो इतका कीं दिसेनासा झाला तरी खालीं आल्याचें दिसत नव्हतें मग कांहीं वेळानें तें विमानच खालीं येऊं लागलें विमान उडविणारा एका शेतांत धाडकन खालीं पडला पण विशेष दुखावला नाहीं. याप्रकारचें कारण त्यास विचारतां माझी छत्रीची दोरी विमानास अडकून छत्री उघडेच ना असें तो सांगूं लागला विमान उडविण्याचें काम किती धोक्याचें आहे.

आमचे सरकार इकडे प्रत्येक संस्थानिकांपासून सैन्याची हत्तेबंदी करून घेत आहे, फामीनरीलीफ ( दुष्काळापीत्यर्थ उभारलेला फंड सरहद्दींच्या किंवा इतर रेल्वेच्या कामीं लावीत आहे, काश्मीरचें राज्य अशाच कांहीं गुप्त गोष्ट खटपटी साठीं खालसा केलें असावें अशी लोकांत गप्प आहे आणि या सर्वांहून अती गंमतीचा गोष्ट ही होय कीं, टीचभर अफगाण प्रदेशाच्या अमिराची उत्तम रीतीनें खुषमसकरी करीत आहे; असले प्रकार आमचे सरकार करीत असून तिकडे रशिया ह्मणजे स्वस्थ बसला आहे असें नाहीं. तोही आपली रेल्वे झपाट्यानें वाढवीत आहे इराणच्या शाहास आपल्या मुठींत ठेवला आहे. चार जुइपासून केमकीपर्यंत रेल्वे वाढविण्याचें काम अती झपाट्यानें सुरू झालें आहे ही रेल्वे आक्स सनदींच्या डाव्या किनाऱ्यावरून नेणार आहे. तसेंच मऱ्हईपासून पेंजदेपर्यंत रस्ता बिकट पडल्यामुळें ट्राम्बेचा रस्ता तयार करीत आहे. दोन्ही राजे मोठ्या नेटानें तयारी करीत आहेत. ज्याचा सत्पक्ष व जो यथा न्याय राज्य करीत असेल त्यास जय मिळणें वाजवी आहे.

रेव्हेन्युबोर्डाचें सीनीयर मेंबर मि. वुइलसन यांनीं राजिनामा दिला.

लष्करी खातें जास्त वाढविण्या संबंधानें हिंदुस्थान सरकार विचार करीत असून त्या संबधानें त्या सरकारांनी इतर सरकारांचेही मतें विचारलीं आहेत. हें खातें वाढविण्याचें कारण.

खुद्द लंडन शहरांत दररोज १ लाख रुपयांची अंडी खातात! व त्यांतील बहुतक फ्रांस देशांतून येतात. बकासुराच खाणें हें.

महाराणी सरकारचे पौत्र सर आल्बर्ट व्हिक्टर हें प्रथम मुंबईस येऊन नंतर एकदम मद्रासेस जातील. तेथें तीन दिवस राहून नंतर बंगलोर, ह्मैसूर, मदुरा व त्रावणकोर या ठिकाणीं जातील असा ह्या नवीन प्रोग्राम बाहेर पडला आहे.

अलीकडे वर्तमानपत्राच्या किंमती कमी करण्याची लोकांत चढाओढ सुरू झाली आहे असें दिसतें, पण याचा परिणाम चांगला होईल असें दिसत नाहीं. विलायतेकडे पाहूं लागल्यास किमती कमी करण्याची चढाओढ नसून चांगले लेख लिहिण्याची चढाओढ आहे असें आढळतें आणि तिकडे आठवड्यांच्या पत्रांची किंमत ही बारा रुपयापेक्षां जास्त आहे. कागद, शाई, यंत्रें, ही सर्व तिकडेच होत असून तिकडच्यापेक्षां इकडे कमी किंमती करण्याची इच्छा करणें निभावण्या सारखें आहे असें वाटत नाहीं. खरें पाहिलें तर किंमत माफक असेल तरच त्याच्या कर्त्यास किंवा मालकास त्याची सुधारणा करण्याची उमेद राहील आणि ते कांहीं अंशी चिरायुही होईल, पण किंमतींत कांहींच नफा नाहीं असें झालें तर सुधारणा कशी व्हावी आणि चांगले लेखक कसें मिळावें हेंच समजत नाहीं. उपजतच जर एकादा प्राणी अशक्त असले तर पुढें कितीही टानिक घातलें तरी कितीसा उपयोग होइल हें दिसतच आहे. असो, या चढाओढीचा परिणाम काय होतो पाहावें.

ता० ३१ मार्च १८८९ पर्यंतच्या विलायती पोष्टाचा सरकारी वार्षिक रिपोर्ट बाहेर आला आहे त्यावरून या सालीं ११,६३,१९,३०० रुपये उत्पन्न झालें असून ८,४३,२२,८६० रुपये खर्च होतो ह्मणजे ३१८३०४० रुपये निवळ नफा राहिला. आमच्या इकडे पोष्टाचे दर तिकडच्यापेक्षां जास्त असून नेहमीं तोटाच येतो याचें कारण इकडील कामदारांचा पगार. यासालीं १८कंदर २३६२ दशलक्ष पत्रें गेलीं. ३ दशलक्ष पार्सलें गेलीं १४२८६८३१ पाकिटें पत्रा वगैरे नमळ्यामुळें पोष्टाच्या मृत ( डेड ) खात्यांत पडून राहिली. पार्सलें परत आली त्यांत निरनिराळे गमतीचे पदार्थ सापडले आहेत. मनुष्याची हाडें, हिरे जिवंत बेडूक स्त्रियास घालण्या जोगा केसांचा टोप, बकऱ्याचें हाड, तंबाखूचो पिशवी, मांजर, खार, डुकराचें पिलू, पाल, साप, कोंबडा, उंदीर, घुशी वगैरे जिन्नस सांपडलेले आहेत.

ठा० अ०

रशिया व चीन यांजमध्यें आगगाडी:— सेंटपिटर्सबर्ग आणि पेकिन ( चीनची राजधानी ) यांचेमध्यें आगगाडीचा रस्ता बांधण्याचा रशियन सरकारचा विचार ठरला आहे व तो रस्ता पुढें तसाच प्यासिफिक महासागराचे कांठी असलेलें बंदर ब्लाडिवस्टॉक येथपर्यंत नेणार. हें शहर ह्मणजे स्यानफ्रान्सिस्का संस्थानच्या अगदीं समोर पैलतीरास आहे. ही रेलवे तयार झाल्याबर लंडन येथून पेकिन येथें पोंचण्यास १८ दिवस लागतील. हल्लीं लन्डन येथून पेकिन येथें पोंचण्यास आगबोटीनें सुवेझ मार्गे ४१ दिवस लागतात व क्यानेडियन प्यासिफिक रल्वेनें ३५ दिवस लागतात. वरील रल्वे तयार झाल्यावर बहुत करून मध्य एशियेंतून बहुत लोक प्रवास करू लागतील, असें वाटतें.

लष्करी खात्यांतील नेटीव पेनशनरांस सरकारी रेल्वेंत; इंजिनियर खात्यांत व इरिगेशन खात्यांत पटेवाल्यांच्या जागा देण्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें गेल्या जुलई महिन्यांत ठराव केला आहे. तो ठराव जिकडे तिकडे अंमलांत येण्याकरितां भागांचे कमिशनर व कलेक्टर यांजकडे हल्लीं रवाना झाला आहे असें समजतें. लष्करी नेटीव पेनशनर लोकांपैकीं किती लोक पटेवाल्याच्या वगैरे जागा पतकरण्यास कबूल आहेत, याची लिष्ट लष्करी कामगारांनीं ठेवावीं व तीं जिल्हा कामगारांकडे पाठवावीं असा बेत झालेला आहे.

दी० बं०

कोट मध्यें अनर्थ उसळला आहे टर्कीचे लष्करी लोकांना तेथील ख्रिस्ती लोकांवर मोठा जुलूम चालविला आहे. बायकांवर फार जुलूम होतात. दंगे करणाऱ्या लोकांच्या गर्दीनें तुरुंग अगदीं भरून गेले आहेत. ख्रिस्ती लोक तें बेट सोडून भराभर निघून जावयास लागले आहेत असें छं. च्या ता. २६ च्या तारे वरून समजतें.

हिंदुस्थानास लुटावें हे जसें काय मुख्य व मुळ तत्वच इंग्रजी राज्य रीतींत ठरल्यासारखें दिसतें. जी रविवारीं आगबोट जाण्याच्या वाटाघाटीनें दोन लटपटी उघडकीस आल्या. इंग्लंड व मुंबई यांजमध्यें अंतर ६२७४ मैलाचें असतां डाक नेण्या बद्दल खर्च अधिक घ्यावयाचा व त्याच्या दुप्पट अंतराचें ठिकाण ह्मणजे १२४५ मैलावर आस्ट्रेलियास डाक नेण्यास कमी खर्च पडावयाची ही एक गोष्ट झाली. तशीच दुसरी गोष्ट येथून विलायतेस जाणाऱ्या येणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या क्लासांच्या उतारूंस अनुक्रमें ६८ व ३५ पौंड पडतात व आस्ट्रेलियास दुप्पट अंतरावर जाण्या येण्यास त्या क्लासांच्या उतारूस अनुक्रमें ६० व ३० पौंड पडतात तेव्हां हा लुटारूचा न्याय नव्हे कां!

तसबीर काढण्याच्या कलेचा नवीन उपयोग. अमेरिकेमध्यें लांकूड चांगलें आहे किंवा नाहीं हे पाहाण्या करितां त्यांचे उभे व आडवे तुकडे करितात व या तुकड्याच्या तसविरी काढून त्यावरून त्याहून बऱ्याच मोठ्या तसबिरी काढितात. त्याच्या प्रत्येक इंचात किती रेषा वगैरे आहेत हें पाहून लांकूड चांगलें किंवा वाईट आहे हें समजतें.

प्रकाशाची गति दर सेकंदास १,८१,००० मैल आहे असें ज्योतिषशास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. सबब सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर येण्यास ५०० सकंड किंवां सुमारें आठ मिनिटें लागतात. तेव्हां सूर्योदय झाल्या पासून आठ मिनिटें पर्यंत सूर्य आपणास दिसत नाहीं व अस्त झाल्यावर आठ मिनिटें पर्यंत तो दिसत असतो असें झालें. आपण जेव्हा एखाद्या ताऱ्याकडे पहातो तेव्हां तो आपणास त्यावेळीं असतो तसा दिसत नाहीं तर कांहीं वर्षांपूर्वी होता तसा दिसतो कारण पृथ्वी पासून जो तारा सर्वांत जवळ आहे त्याचा प्रकाश पृथ्वीवर पोहोंचण्यास तीन वर्षें लागतात आणि तो जर एकाएकी आकाशांतून नाहींसा झाला तर पुढें तीन वर्षें पर्यंत तो आपणास दिसत राहील. असें व याहून दूर असणारे तारे नभोमंडळांत असंख्य आहत.

सु० प०

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होतेपरम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

शुद्ध ४ इंग्रजी तारीख २८-९-८९ इ० रोजीं खालीं लिहिल्या अन्वयेंः—

जवारी खंडी १०० तीनशें दर खंडीस रुपये ४७॥६ प्रमाणें.

गहुं खंडी १०० दर खंडीस रुपये ६१॥६ व ६१॥७ प्रमाणें.

अळशी खंडी १०० दर खंडीस रुपये ८६॥१० प्रमाण

रुई ओझे १०० दर बोज्यास ६५॥१० ६५॥१२ प्रमाणें.

या प्रमाणें घेणें केला हा सवदा आम्हीं तुमचे नांवें लिहिला आहे. परंतु तुम्हीं आपल वहीत नोंदून घतल्या बद्दल अद्यापि कळविलें नाहीं या साठीं कळविले जातें कीं ही नोटिस पावल्या पासून एक दिवसाचे आंत सदरहू सवदा तुम्हीं आपले येथें नोंदून घेतल्याचे लेखी कळवावें तसें न कराल तर आह्मी जोखमित न रहाण्या साठीं तुमचे करितां केलेले सवद्याची आपले मर्जी प्रमाणें विक्री अगर नीट दिसेल ती तजवीज करून तुमचे खात्यांत नफा नुकसानीची रक्कम लिहिली जाईल मग आह्मी आपले मर्जीप्रमाणें केल्यानें तुमचे कोणतेही प्रकारें जबाबदारीस अगर छत्यास आह्मी पात्र होणार नाहीं. कळावें. तारीख ३ माहे आक्टोबर सन १८८९ इ०

सही

बाबुजी जगन्नाथ वहिवाटदार हरसुकदास जेठमल दुकान अकोलें दस्तूर खुद.

नोटीस.

तिर्थरूप रा० रा० गणभट बीन सिताराम भट्ट जोशी क० पिंपळगांव राजा वखेडदेगांव जळके वगैरे ता० मलकापूर जिल्हे बुलढाणें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे जळके येथील वतनदारी संबंधीं तुह्मी कोणास गहाण करून देत असें ऐकतों. तर तुह्मास ह्या नोटीशीनें असें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी वयातींत असून दोन्ही डोळ्यांनें अंधळे अहां करितां वतनदारी संबंधीं कोणत्याच प्रकारें हक्क चालत नाहीं. व मौजे जळके येथील भट्टपणाचे काम मीच करीत आहे व सर्व प्रकारें हक्क माझेच आहे व तुमचे पालन पोषण आज १२ वर्षें मीच करीत आहे असे असून तुह्मी थोडे दिवसांपूर्वीं लोकांचे नांदी लागून जळक्यास जाऊन राहिले आहांत आणि आमची वतनदारी बालवूं पहातां तर ह्या बाबतींत तुह्मी कोणास दस्ताऐवज अगर खरेदी व गहाण देऊं नये. दिल्यास ते खोटें समजलें जाईल. ह्या नोटीशीचा जबाब आठ दिवसाचे आंत मिळावा. कळावें ता० ३।१०।८९ इ०

( सही. )

केशव सखाराम जोशी दस्तुर खुद.

नोटीस.

रा. रा. येडु वल्लद महादाजी पाटील मौजे जळके प्र० नांदुरा ता० मलकापूर जि० बुलढाणें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत कीं माझा वडील बंधु गणभट बिन सितारामभट जोशी कसबे पिंपळगांव राजा वखेड, देगांव, जळके वगैरे ता० मलकापूर जि० बुलढाणें हा इसम अगदीं वयातींत असून यांची उमर सुमारें ९० वर्षांची आहे शिवाय हा दोन डोळ्यानीं अंधळा आहे. आणि कायद्याप्रमाणें अशाबित मनुष्याजवळून कोणत्याच प्रकारचा दस्ताऐवज करून घेणें अगर वतनदारीं संबंधीं खरेदीखत अगर गाहाणखत करून घेणें असल्यास त्यांचे वारसाची सही घेतली पाहिजे. वारसाचे सहीशिवाय खरेदीखत अगर गहाणखत किंवा कोणत्या प्रकारचा दस्ताऐवज घेईल तर तो कायद्या विरुद्ध समजावा. यांबद्दल पिंपळगांवराजा येथील वतनदारी भटपणाबद्दल दिवाणीत दावा चालून त्यांत देशमुख देशपांडे वगैरे लोकांच्या जबान्या होऊन त्यांत असें ठरले कीं गणभट, व केशवभट, व लहानभट वगैरे रंगाढीचे वतनदार आहेत त्याचे प्र० मौजेखेड देगांव व जळके येथील त्रिवर्ग वतनदार आहेत. याबद्दल दि० मु० नं० ८८ ता० ३० माहे अगष्ट सन १८८७ इ० यांत उलगडा केला आहे आतां माझ्या ऐकण्यांत असें आले आहे कीं सदरील वयातींत झालेला मनुष्य याजला फुस देऊन माझे भटपणाचें वतन मौजे जळके येथील गाहाणखत आहे तर ह्या नोटिशीनें तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं वयातींत झालेल्या मनुष्यांचे वतनदारीवर कांहींच हक्क नाहीं. करितां गाहाण अगर खरेदी घेऊं नये. त्याचा सर्वप्रकारे वारस मी आहे व त्याचें पालनपोषण आज पर्यंत मीच करीत आहे व जळके येथील भटपणाचें काम मीच करीत आहे त्यानें कधींच काम केलें नाहीं आणी तुह्मी थोडे दिवस झाले त्याजला आपले मतलबाकरितां जळके येथें घेऊन गेले आहों. तर तुह्मी त्याच्यापासून गाहाण किंवा खरेदी अगर कोणते प्रकारचा दस्ताऐवज घ्याल तर तो बातल समजला जाईल त्याच प्र० त्या गांवचा माझा भटपणाचा इनाम एक दोन वर्षांपासून तुह्मास लाऊन काढला आहे तोही ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत कबजांत द्यावा नादिल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल व जो खर्च लागेल तो तुमच्याजवळून घेतला जाईल कळावें ता० ३-१०-८९ इ.
सदरहू नोटिशीचा जबाब ८ दिवसाचे आंत द्यावा पुढें तुमची कोणतीच तकरार चालणार नाहीं.

( सही )

केशवभट बिन सखारामभट जोशी दस्तर खुद.

## वऱ्हाड

रा. रा. श्रीधर गणेश जिनशीवाले एम. ए. डावुईलसन कालेजांतील संस्कृत विषयाचे प्रोफेसर हे दसऱ्याच्या सुटींत आपल्या मित्रमंडळीस भेटण्या करितां येथें आले आहेत. त्यांनीं मंडळीच्या आग्रही वरून शनिवार तारीख ५ मिनहूरोजीं येथील नेटिव जनरल लायब्ररींत "अंमची आजकालची स्थिति" या विषयावर व्याख्यान दिलें. सुटीचा दिवस असल्यामुळें व नोटीशीनें व्याख्यानकाराचें नांव पूर्वींच समजल्यामुळें श्रोतेजनाची बरीच गर्दी झाली होती. व्याख्यान सरासरी दोन तास चाललें होतें. व्याख्यानकार निरभिमानी व सत्यप्रियअसल्या मुळें व्याख्यानांत एक पक्षता कुठेंच दिसून आली नाहीं. त्या मुळें सर्व श्रोतुजनांस व्याख्यान एकसारखें रुचलें विषयाची व्याप्ती फार असल्यामुळें व्याख्यानकारानें विषय नियमीत वेळांत आटोपता यावा ह्मणून विषयापैकीं दोन तीन मुख्य मुख्य गोष्टांबद्दल साधारण परंतु महत्वाची माहिती दिली. ती आजच्या अंकीं सादर करण्याला जरी आम्हाला सवड नाहीं तरी त्यापैकीं ध्यानांत ठेवण्या सारख्या गोष्टीं वाचका करितां आम्ही आज लिहितो. आजकालच्या स्थितींत राज्यकीय आणि सामाजिक सुधारणा ह्या दोन गोष्टीं सर्वांच्या विचारांत आहेत. त्या पैकीं पहिल्या संबधानें ते असें म्हणालें कीं राजकीय अधिकार मागा व कदाचित सरकार देईल अशा विचारांत निमग्न व्हा. परंतु इंग्लिश लोकांच्या आंगीं जे शहाणपण आहे व ज्या मुळें स्वराज्य कसें संरक्षण करावें हें त्यांना पूर्णपणें समजत आहे ज्यामुळें इतर सर्व सुधारलेल्या राज्यांत त्यांची थोरवी गाजत आहे ते शहाणपण शिकण्यास हयगय करूं नका. दुसऱ्याबद्दल ते असें ह्मणालें कीं आज काल सर्व ठिकाणीं धर्माची अनास्था झाली आहे. व तसें होईल असें वाटतच होतें. परंतु ईश्वर नाहीं. असें ह्मणून निभत नाहीं. धर्मांचे खरें स्वरूप काय आहे हे बहुतेकानां समजत नसल्यामुळें किंवा तें समजून घेण्या बद्दल कोणी खटपट करीत नसल्यामुळें आजकालही अशी स्थिती प्राप्त झाली आहे. आज शेंकडों वर्षांपासून लोकांना अनुसरलेला धर्म वाईट असेल अशी प्रथम कल्पना करणें चांगल नाहीं. प्रथम चांगला अशी कल्पना करा व त्याचें खरें स्वरूप पहाण्या विषयीं खटपट करा व जर शेवटीं तुह्माला चांगला वाटणार नाहीं तर मग सोडून द्या. कांहीं कांहीं गोष्टींत सुधारणा झाली पाहिजे ही गोष्ट खरी आहे. तरी अगदीं पायाच वाईट आहे असें ह्मणतां येत नाहीं.

मागील शनिवारीं नवीन आलेल्या मुंबईकर संगीत मंडळीनीं मृच्छकटीक नाटकाचे संगीत ५ अंक करून दाखविले. एकंदरींत प्रयोग सुरेख झाला व त्यांत विशेषें करून वसंतसेना व वीट या दोन पात्रांचीं कामें फार सुरेख झालीं. वसंतसेना व वीठ हीं दोन पात्रें किर्लोसकरांतील सौभद्र पात्राच्या जरी बरोबरचीं नाहींत तरी खालाखाल आहेत वसंतसेनेच्या पात्रांत स्त्री जातीला योग्य असा मार्दव व अभिनय कमी असल्यामुळें या पात्रांत बरीच उणीव दिसून येते. ती उणीव दूर झाल्यास हें पात्र बरेंच रमणीय व प्रेक्षणीय होईल. या शिवाय मंडळींत बहुतेकांस त्यांत मुख्यत्वेंकरून चारुदत्ताचे पात्रास घाईनें व हळू ह्मणण्याची सवय असल्यामुळें बराच भाग श्रोतृजनांस ऐकूं येत नाहीं व त्यामुळें नाटकाचा रंग ही जातो ह्या ठळक गोष्टीकडे जर ही मंडळी लक्ष देईल तर प्रेक्षक जनांस ती कांहीं दिवस रम्य स्थानें होईल असें आह्मी समजतो. येत्या बुधवारीं संगीत शाकुंतलाचे चार अंक करून पुढील शनिवारीं ही मंडळी संगीत सौभद्र करणार आहेत.

मि० एटकीन येथील हायस्कूलचे हेडमास्तर हे लवकरच दोन वर्षांचे फर्लो रजेवर जाणार असें समजतें.

मे० कर्नेल स्पांस्की साहेब कमिशनर यांची स्वारी गेल्या रविवारीं दुपारच्या गाडीनें बुलढाण्याकडे गेली.

मि० महंमद इस्मायल यांस कामीशनरचे क्लार्क आफ कोर्ट नेमल्यावरून खालील जागा पुढील प्रमाणें भरण्यांत आल्याः— रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांस १५० रुपयांवर अकोला डे० क० चे क्लार्क आ० कोर्ट; रा० दामोदर नानाजी शिंदेकर यांस १२५ रुपयावर अकोला स्मालकाज कोर्टाचे क्लार्क आ० कोर्ट; रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस ७५ रुपयांवर ज्युडिशियल कमिशनरचे डे० क्लार्क आ० कोर्ट ( पण उमरावती डे० क० च्या डे० क्लार्कचे काम करायावें ); मि० सैफुद्दिन लालखान यांस ७० रुपयांवर डे० क्लार्क आ०. कोर्ट ( ज्युडिशियल कमिशनर कोर्टच्या डे० क्लार्कचें काम करायाचें ); रा० लक्ष्मण नारायण गोखले यांस ६० रुपयांवर यवतमाळ डेपुटि कमिशनर चे डे० क्लार्क आफ कोर्ट, रा० त्र्यंबक नारायण तारे यांस ५० रुपयांवर मलकापूर कोर्टाचे क्लार्क व रा० वामन संतो यांस ज्युडिशियल कमिशनर कोर्टांत ४० रुपयांवर कारकून नेमलें.

मागील सोमवारीं येथील ट्रेनिंगकालेजांतील विद्यार्थ्यांची कवाईत व कसरत पाहण्या करितां मे. डायरेक्टर साहेब गेले होते ती पाहून साहेबांची स्वारी खुश झाली ही गोष्ट रा० बळवंतराव सोमण कसरती मास्तर यांस भूषणास्पद होय. ह्या गृहस्थानीं बरीच वर्षें परिश्रम करून आमच्या वऱ्हाडास शारिरीक शिक्षणाचें महत्व दाखवून दिलें आहे. तेव्हां मे. ब्यारेट साहेब त्यांस त्याच्या श्रमाबद्दल कांहीं तरी उत्तेजनार्थ मोबदला देतील अशी आशा आहे.

जसें जसें कलयुग आपला पगडा अधीक बसवीत चाललें आहे तसें तसें खरें साधु आतां सांपडणें कठीण. व जों पर्यंत खऱ्या साधुशि गांठ पडली नाहीं तों पर्यंत अशा नाना प्रकारचीं सोंगें करणाऱ्या साधूंना भलत्यांत परमार्थ तो काय व अशा दांभिकपणानें लोकांचे मनावर साधुत्वाचा ठसा तो काय उमटणार.

येथील लायब्ररीची रडं येण्यासारखी स्थिती बड्या अधिकाऱ्यांपर्यंत गेली असें ह्मणतात. येथें इतके मोठे मोठे कामगार असून, व ते विद्वान असून देश हिताची व देश बांधवांच्या सुधारण्याची इच्छा बाळगण्याची त्यांचे मध्यें शक्ति असून इतक्या दिवस ह्या लायब्ररीची अशी स्थिति कां झाली कोणजाणें. पुढारी ह्मणविणाऱ्या लोकाचे लक्ष्यांत हा गोष्ट कधींच आली पाहिजे होती परतु ही त्यांचे मोठें मनाचे अटकळी पलीकडे कशी गेली कोणजाणें. लायब्ररी हे लोकांना व आपल्या स्वतांला सुधारण्याचें साधन आहे असें ज्या कोणाला थोडा बहुत पाश्चमात्य विद्येचा संस्कार झालेला आहे तो प्रांजळपणें कबूल करील. हीं कामें अधिकारारूढ झालेल्या लोकांच्या हातूनच झालीं पाहिजेत असा सर्व काळीं नियमच पडून गेला आहे. हें जिल्ह्याचें ठिकाण असून हें सुधारण्याचें साधन जें लायब्ररी त्याकडे कोणी ढुंकूनही पाहूं नये.

एकूण ह्या कामीं लोकांची उदासीनता पाहून कोणीही थक्क झाल्या वांचून राहणार नाहींत पूर्वीं झालें तें बरेंच. परंतु हल्लीं अशी आनंद मानण्याची गोष्ट झाली आहे कीं, रा. पंडीत साहेब सुरज नारायण अ. क. यांनीं ह्या कामीं फार लक्ष्य दिलें आहे असें ह्मणतात. पंडिता सारख्या मोठ्या मनाच्या हद्देदारानें अशा परोपकारीक व लोक सुधारणेच्या कामाकडे लक्ष्य दिल्यास काय नाहीं होणार गगनांतून सूर्य सुद्धां आणितां येईल ह्मणजे अशक्य गोष्टी हा ह्यांच्या सारख्यांनीं मनावर घेतल्यास शक्य होतील. आज ह्या आमच्या गांवांत १२००० हजारांच्या वस्ती मध्यें पंडितांचें वजन उल्लंघन करणारा असा मनुष्य सांपडणें कठीण आहे. ह्यांनीं लायब्ररी सुधारण्याची गोष्ट मनावर नुसती घेतल्या बद्दल शेंकडों लोकांनीं ह्या इच्छे बद्दलच त्यांचे आभार मानिले. व जेव्हां ही गोष्ट प्रत्यक्ष घडून येईल तेव्हां लोक त्यांचें कृतज्ञता पूर्वक किती आभार मानतील व त्यांची किती स्तुती करतील ह्याची कल्पनाच करवत नाहीं. ह्या लायब्ररीला दरमहा १० दहा रुपये म्युनिसिपल ग्रांट मिळत असते. म्युनिसिपालिटीचे पैसे वर आले ह्मणून अगर ज्यांना सामर्थ्य आहे त्यांना ती पासून फायदा व्हावा ह्मणून नव्हे तर अनभिज्ञ लोकांना वाचनाची गोडी लागावी त्यांची सुधारणा व्हावी ह्या करितांच आहे. परंतु ही गोडी उत्पन्न करण्याचे कामीं जर यत्न होत नाहीं तर हे म्युनिसिपालिटीचे पैसे व्यर्थ जातात असें कोणीही समजेल पूर्वीं लायब्ररी अगदीं भरवस्तीमध्यें होती. तेव्हांही लोकांना गोडी नव्हती आतां तर नवीन झालेल्या टाऊन हालांत गेली आहे. तें तर पूर्वींच्या जागेपासून फार दूर आहे. अशा ठिकाणीं ज्याला खरी गोडी आहे तोच जाणार. परंतु अशा खऱ्या गोडीचे लोक ह्या ठिकाणीं फारसे दिसत नाहींत. तरी पुढारी लोकांनीं वाचनाची गोडी लोकांत अनेक तऱ्हेनें उत्पन्न केली पाहिजे. व पुढारीपणा बद्दल सर्वांचे आभार घेतले पाहिजेत.

सुमारें पंधरा दिवसांपूर्वीं लायब्ररीच्या शोचनीय स्थिती बद्दल विचार करण्या करितां नवीन टाऊन हालांत बड्या लोकांची सभा झाली होती. त्या वेळीं विशेष कांहीं झालें नाहीं परंतु लायब्ररी करितां नियम करण्या साठीं एक कमेटी करण्यांत आली. आतां ही नेमलेली कमेटी जेव्हां नियम करील तेव्हां त्या लायब्ररीचें नशीब उघडणार!! आतां हे नियम ह्मणजे एखाद्या कायदे कौन्सिलांत कायद्याच्या बिलाचा मसुदा आणणें नव्हे किंवा कांहीं राजकारस्थान नव्हे कीं त्याला कित्येक दिवस विचार केला पाहिजे. स्वतः बुद्धी मता खर्चून ह्या कामीं नियम करण्याबद्दल जर मंडळीला वेळ नसेल अगर हें काम ह्मणजे यःकश्चित वाटत असेल तर इतक्या खटपटींत न पडतां वऱ्हाड प्रांतांत ज्या उत्तम चाललेल्या आजकाल लायब्ररया गाजत आहेत तेथील नियम मागवावेत व ते येथें लागू करावेत. ह्मणजे सर्व नीट चालेल. आतां हे नियम नेमलेली कमेटी कधीं करून आणिते व लायब्ररीचें भाग्य कधीं उदयास येतें व या कामीं मंडळी यशाचा विडा कधीं उचलतें तें पहावें. कशी व्यवस्था होते ते पाहिल्यावर या विषयाकडे पुन्हां वळूं.

ह्या जिल्ह्यांतून वकिलीच्या परीक्षे करितां दोन उमदवारांनीं आपलीं नांवें पाठविलीं होतीं. परंतु त्यांपैकीं एक कांहीं घरगुती कामाच्या नडीमुळें परीक्षेस गेले नाहींत व दुसरे गृहस्थ दाखल झाले होते. परंतु नशीबानें पिछेहाट खाल्यामुळें बिचाऱ्याचे सर्व श्रम फसले. त्याची तयारी उत्तम होती व पुस्तकाला धरून जर कांहीं तरी प्रश्न असते तर कांहीं तरी परीक्षा उतरण्याचा संभव होता. परंतु सालमजकुरची परीक्षेची तऱ्हा कांहीं चमत्कारिक होती असें प्रश्न पाहिल्याबरोबर वाचणाराच्या मनांत येतें. वऱ्हाडांत परीक्षा सुरू झाल्यापासूनचे जर प्रश्न पहिले तर सर्व निराळे तऱ्हेचे व सालमजकूरचे एकप्रकारचे असें दिसून येतील. प्रत्येक प्रश्नाच्या कागदाला दिलेला वेळ पुरेसा नव्हता. कागद हातांत पडल्या बरोबर प्रश्नांचें स्वरूप कसें हें पहाण्यांत व कठीण असें मनांत आल्याबरोबर ते प्रश्न कोठून सोडविण्यास प्रारंभ करावयाचा यांतच वेळ निघून गेल्या कारणानें लांबलचक प्रश्न सोडविण्यास वेळ न मिळाल्यामुळें परीक्षेचा परिणाम आलेले गृहस्थ नापास होऊन त्यांचे मेहेनतीचें मातेरें होऊन गेलें. त्यांची आशा भंग झाली. अशा प्रकारचे प्रश्न मुंबई इलाख्यांतील वकिलीच्या परीक्षेंतसुद्धां बहुधा नसतात असें कोणीही ह्मणेल. मग इकडे अद्याप या प्रांतांत इतका विद्येचा फैलाव झाला नसून इकडेच इतकी परिक्षकांची काही कमाल परीक्षेस येणाऱ्या उमेदवाराविषयीं कां असावी कोणजाणे. जे इंग्रजींत पारंगत झालेले त्यांनीं जरी अभ्यास करून ह्या परीक्षेस नांवें पाठविलीं असती व ते परीक्षेस बसले असते तर त्यांनाही घाम वाजावण्या सारखेच प्रश्न होते. यावरून कच्चे विद्यार्थी मॅट्रिक्युलेशन झाल्याशिवाय परीक्षेस येतात ह्मणून ते नापास होतात हें सदैव कारण नव्हे तर त्यास नापास करण्यास कारण अति लांबलचक नेहमींची तऱ्हा सोडून काढलेले प्रश्न हेंच सबळ कारण होय. आतां मॅट्रिक्युलेशन शिवाय वकिलीच्या परीक्षेस येऊं देऊं नये असा जो नियम होणार असें वाटत आहे तो सध्यांच्या स्थितीस कांहीं वर्षें पर्यंत बरोबर नाहीं. कारण नुकताच कोठें हा प्रांत विद्येच्या कामीं डोकें वर करूं लागला आहे. खुद्द वऱ्हाडचे रहाणारे आजपर्यंत किती ग्रॅजुएट झाले असा जर कोणी आपल्या मनाशीच प्रश्न केला तर तो असें उत्तर देईल कीं, फारच थोडे. जे झालेले आहेत ते बहुतेक बाहेरच्या प्रांतांतून इकडे आलेल्या लोकांनीं मुळें अगर त्याचे आप्त आहेत ते जर इकडे आले नसते तरी तिकडे कोठें ही ते विद्वान झाले असतेच. तसेंच वकिलीची परिक्षा सुरू झाल्या पासून जे उमेदवार आले त्यांत ह्या प्रांतांत खुद्द शिकल्या पैकीं किती पास झाले. व जे झाले त्यांत मॅट्रिक्युलेशन परिक्षा पास झालेले किती व न झालेले या पैकीं वकीलींत किती उतरले याचा विचार झाल्यानें सहज समजेल कीं, सध्यांच्या स्थितीस ही अट घालून बिन मॅट्रिक्युलेटेडांचा मार्ग बंद करणें बरोबर नाहीं. मॅट्रिक्युलेशन परिक्षा पास झाल्यानेंच मनुष्य हुशार होतो असें नाहीं. परिक्षा झाल्यावर जो आपले दिवस हमेश विद्याव्यासंगांत घालवितो. हमेश विचार करून आपल्या मनाची व बुद्धीची सुधारणा करितो तोच योग्य होतो. परीक्षा होऊन योग्याधिकारी ठरल्याची ही उदाहरणें दाखवितां येतील तर ह्या गोष्टीचा विचार होऊन योग्याधिकारी गरीब बिचाऱ्यांचा मार्ग बंद करणार नाहींत. अशी आशा आहे.

आपला.
"क्ष"

---

पिंपळगांव राजा तारीख ३।१०।८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस वि. वि. येथें तारीख २९।९।८९ इसवी. रोजीं ऐथील मराठी स्कुलांत सभा झाली. सभेमध्यें अध्यक्षस्थान रा. रा. रामराव मुनसरिम सरकल पिंपळगांवराजा यांनीं स्विकारलें होतें. सभेंत रा. रा. गुलाम आहामदखा विद्यागर यानीं पैश्याचा व्यय कसा करावा याजवर फार उत्तम प्रकारचें व्याख्यान दिलें. सभेचे उत्पादकांनीं सभा स्थापन झाल्या पासून अद्याप पावेतों त्यांचे कडून सुधारणा केली जात नाहीं. सभा पुष्कळ ठिकाणीं होतात परंतु सभेंत येणाऱ्या प्रत्येक मनुष्याची चालचलणुक व त्याची इजत व संभावती पाहून त्या त्या प्रमाणें त्याना बसण्यास स्थान द्यावें अशी रीत आहे. परंतु या ठिकाणीं आश्चर्य आहे. कीं येथील हिंदु लोकामध्यें पुष्कळ जाते विद्वान संभावित लोक असून त्याना सभेचे उत्पादक नीच जागेवर बसवितात. ज्या मुख्य लोकांना बेदुनी वितो हे समजत नहीं त्याना खर्चीवर बसवितात यास्तव अशा रिवाजा वरून सभेचे उत्पादक येथील हिंदुलोकाना त्याचा अपमान करून त्याची नाचक्की करण्यास इच्छितात असें वाटते. करितां काम स. उ. याना हिंदु वि. आहे कीं जर लोकांची इजत व मान सन्मान व मातबरी अनलक्षुन जर त्याचा आदर सत्कार करितील तर सभेला दिवसें दिवस ज्यास्त भरभराट येईल कळावें.

आपला एक
"क्ष"

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांज कडून देण्यांत येते कीं मौजे जळक वरवडद गांव पिंपळगांव राजा येथील गणेश सिताराम भट याचे जोसपण आहे आणि तो आतां वयातीत वृद्ध जाला असून दोन्ही डोळ्यानें अंधळा आहे आणि तो माझा भाऊ आहे व आतां लोक त्याला फितवून त्याची वतनदारी दगाबाजीनें खरेदीखत घेऊं इछीतात करिता माझी हीच विनंती आहे कीं कोणी दगलबाजी करून बेमानी करून घेण्याची इछा करूनये कळावें तारीख ३।१०।८९ इसवि.

वर लिहिलेली गांवे व सरवई नंबर इनाम मौजे जळक येथील कोणी गहाण रेही घेतले असून माझी सही दस्तऐवज रद्द असें. कळावें.

( सही ) ता० ९-१०
केशव भट बिन पाचार कर्ते
भटनी जोशी दस्तुखुद्द

---

नोटीस.

इच्छाराम हुलासराय साहू दुकान शेगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येतें कीं आमचे आडतींत तुमचा गुमास्ता व तुमचे साठीं नेहमी सवदा करणार रुंजाजी माळी य.णी तुमचे करितां अश्विन

सालअखेर ॥ ७ ॥ १८८
किरकोळ अंकास......................८४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ....०१

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as
Repetition pe line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY OCTOBER 14 1889 NO.40

वर्ष२३ अकोला सोमवार तारीख १४ माहे अक्टोबर सन १८८९ इ० अंक ४०

## गरमीचे रोगावर औषध,

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते- परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु भरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळांतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें म.फक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल. एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक. दंतशाण. हीं औषधें मिळतील.

## बिरार हॉर्स अॅन्ड कॅटल शो.

वऱ्हाडांतील वार्षिक घोड्यांचे व इतर गुरांचे प्रदर्शन येत्या २१,२२ व २३ तारखेस उमरावती येथें मे० कमिशनर साहेब बहादूर यांचे अध्यक्षते खाकीं अंबा यात्रेचे संबंधानें होईल. ६५० रुपयांचीं अगर या पेक्षां जास्त रुपयांचीं इनामें वाटलीं जातील. आणि खरोबर प्रदर्शना करितां आणिलेल्या जनावरास प्रदर्शन होई पावेतों फुकट गवत दिलें जाईल.

J. Cooper Exq:
Vatoriary Superintendent
H. A. D.
Honorary Secretary
Berar Horse and Cattle Show.

नोटीस.

रा० नरसू वल्द बापुजी सोनार सावरकर राहणार मौजे चिकणी पोष्ट नेरपरसोपत तालुके दारव्हा जिल्हा वणी यांस

खालीसही करणार इनकडुन नोटीस देण्यांत येतेकीं. तूं माझा लग्नाचा नवरा असून, त्वा मला लग्न झाल्या दिवसा पासून आण केली नाहींस. मी जों पर्यंत अज्ञान होतें तों पर्यंत बरे होतें, परतु आतां मी सज्ञान असून वयांत आले आहे. ह्मणून माझ्या बापानें तुझाला दोन तीन वेळा मजला आपले घरी नेण्या करितां निरोप पाठविले. व त्या प्रमाणें तुह्मी एकवेळ माझ्या बापाच्या घरीं मला नेण्याचे इरादानें आले होतें; परंतु तुह्मी मजला घेऊन, नजाता, व कोणास न विचारतां रात्रींस निघोनगेला या वरून माझी खात्री झाली कीं, तुम्हीं मला आपले घरीं नेऊन वागवित नाहीं. माझे आईबाप माला पाठविण्यास व मी ही जाण्यास राजी असून तुम्ही मजला कां नेतनहीं याचें कारण मजला काहींच समजत नाहीं. माझ्या खाण्या पिण्या बद्दल माझ्या बापास मी वयांत आल्या पासून सुमारें २५० रुपये खर्च आला आहे. तरी हे रुपये देऊन त्वा मजला घेऊन जावे यास मुदत नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत निकाल करावा नाहींतर हीच फारकत समजून मी दुसरीकडे कोठें जागा केल्यास मग तुमचा लग्नाचा काहीं हक्क राहणार नाहीं हें पक्के समजावें कळावें तारीख २२ सपटेंबर सन १८८९ इ०

सही
मुक्ताई मर्द नरसू सोनार
इचे हातची बांगडी असे

हैदराबादचे प्रधान सर अस्मानजहा यांनीं हैदराबादेस ज्या ज्या गोष्टी तूर्त करण्याच्या ठरविल्या आहेत त्या आम्हांस इतर पत्रांतुन पाहाण्यांत आल्या त्या आम्हीं आमच्या वाचका करिता खालीं देतो.--

दक्षिण हैदराबाद शहरांत पटकीचें एक कायमेंच ठिकाणच होऊन राहिलें आहे. तेथील इंजिनेर व स्यानिटरी कमिशनर यांनीं शहरांत आरोग्य राहावें ह्मणून झान वगैरेची सर्व तयारी केली आहे पण मुख्य पैशाचीच अडचण आहे खुद्द हैदराबाद शहराची स्वच्छता राखण्याकरतां पैसा नाहीं म्हणून आजपर्यंत सर्व कामाची तहकुबी राहली आहे. या शहरांत पाण्याची सोय व्हावी म्हणून खुद्द मुख्य प्रधान सर असमानजा हे आपल्या खर्चानें गांवांत पाणी आणणार आहेत असें म्हणतात. उद्योग स्तुत्य आहे पण एका अर्थीं निजामास पेडें लागिवणारा आहे. सरहद्दीच्या संरक्षणार्थ ६० लाख रुपये देणाऱ्या निजामा जवळ गांवांत स्वच्छता राखण्या इतका पैसा नसावा हे आश्चर्य नव्हे काय?

सर ग्रिफिनचे सर्व ह्मणणें खोटें आहे हैदराबादचे प्रधान सर अस्मानजा यांनी विलायतच्या एका मासिक पुस्तकांत एक निबंध लिहून प्रसिद्ध केला आहे उपयोग काय?

हैदराबादचे प्रधान सर आस्मानजहा हे ३०००० ची एक धर्मशाळा बांधणार असून हजारों पात्रांचा समपाक होईल अशी ६०० रुपयाची भांडीं तयार करणार आहेत असें ह्मणतात.

गुप्तदान--हैदराबादेस असलेल्या जाती सुधारक मंडळीच्या कडक नियमांमुळें तिकडील लोक मुलींच्या नवऱ्याकडे गुप्तपणें मोठ मोठीं आंदणें देत असतात, असा बोभाट झाला आहे. असें असेल तर वरील जाती सुधारक मंडळीचा उपयोग काय!

निजाम सरकारचे दिवाण सर असमानजहा यांनीं असा हुकूम काढिला आहे कीं निजाम सरकारच्या नोकरींत कोणत्याही अमलदारानें सरकारच्या परवानगी वांचुन दिवाणी अगर लष्करी खात्यांतील कोणत्याही युरोपियन अमलदारांस नजराणे देऊं नये हे नजराणे अगर मेजवान्या देण्याची रीत अलीकडे साधारण होऊन गेली आहे. आणि ती बंद व्हावी म्हणून निजाम साहेबांनीं हा हुकूम काढला आहे.

निजाम सरकाराकरितां एक मोठा महाल तयार होत आहे त्यांत शाळेंतील मुलांची निजण्या जपण्याची सोय करणार आहेत व या कामाकरितां सर अस्मानजाहा १ लक्ष रुपये देणार.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मताप्रमाणेंच असेल असें समजूं नये.

मुक्काम सस्ती तारीख ७।१०।८९ ई०

साष्टांग नमस्कार वि० वि० खालील चार ओळी छापण्यास पाठविल्या आहेत तर त्यांस आपले सुंदर पत्रीं जागा मिळावी.

(दसरा) हिंदु लोकांच्या सणांत दसरा हा सण बराच महत्वाचा आहे. ह्यासच कोणी विजया दशमीही म्हणतात या दिवशींच पांडव वनवास भोगून आपले राज्यांत आले; व येतांना त्यांनीं आपलीं अयुधे (धनुष्यें) शमीचे झाडावर ठेवून नंतर राज्यावर बसले, अशा समजुतीनें शमीचे झाडाचें पूजन करण्याची वहिवाट पडली आहे. त्याप्रमाणें आमचे येथें दसऱ्याच्या दिवशीं दिवसा सुमारें पांच वाजण्याचे सुमारास गांवातील सर्व मंडळी एकत्र जमून व नवे नवे पोषाक घालून सिमोल्लंघन करण्या करितां दक्षिण दिशेस गेली थोडे दूर गेल्यावर शमीचें यथाविधी पूजन होऊन वाजत गाजत परत गांवांत आली. बरोबर बाळासाहेबाची पालखीही होती. ही पालखी येथील श्रीमंत रा० रा० रामराव भगवंतराव देशमुख हे काढीत असतात. सदरहू गृहस्थ, बालासाहेबाचे फार भक्त आहेत. त्यांनीं त्या दिवशीं बराच उत्सव करून व ब्राह्मण भोजन घालून सर्व रात्रभर गांवांतून दिंड्या वगैरे सह मोठ्या जलशानें सरगत मिरवली. त्यास बराच खर्च लाविला. त्या योगानें विशेष शोभा होऊन सर्वत्रांचीं मनें फार खुष झालीं. एकंदरींत दसरा सण फार आनंदानें झाला.

अफिसर लोक येण्याचे दिवस आले आहेत करितां पाटील पांड्यांचो सफाई करण्याची बरीच गडबड चालली आहे. फार चांगलें आहे;( गांवांतील प्रमुख मंडळी याकडे लक्ष देईल काय? ) गांवांतील लोकांस रोजचा बाजार साथ नसल्यानें फार तकलीफ सोसावी लागते व भाजी वगैरे आणण्या करितां मळे हुसकावें लागतात. करितां गांवांत दररोज बाजार साथ (गुजरी) भरविण्याची तजवीज झाल्यास सर्व लोकांची अडचण दूर होईल.

आपला
गांवांतील "स"

परतवाडा ता० ९-१०-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:--

सा० न० वि० वि० खालील चार ओळींस आपल्या सुंदर व जगमान्य पत्रीं जागा द्याल अशी आशा करून पाठविल्या आहेत त्या येत्या अंकीं छापाल अशी विनंति आहे

हवामान--- पावसानें राजीनामा दिल्यासा वाटतो. परंत मध्यंच संध्याकाळचे वेळेस कोठें कोठें ढग दिसतात. परंतु काम बजावीत नाहीं पिकें बरी आहेत. थंडीही पहाटच्या सुमारास फेरी करूं लागली.

रामलीला--- येथील पलटणींतील हिंदु लोकांनीं गुदस्तसाल प्रमाणें रामलीलेचे काम उत्तम रीतीनें बजाविलें. व्यवस्था व दारुकाम चांगलें होतें कोठें कोठें भजनाचा समारंभही दृष्टीगोचर होत होता एकंदरींत पलटणींतील हिंदु लोकांना आपल्या धर्माचा अभिमान आहे हे पहून मनाला बहुत संतो

होतो.

लायब्ररी— गांवच्या वस्तीच्या मानानें वर्गणीदार बरेच आहेत व वर्तमानपत्रें हीं बरीच येतात. परंतु लायब्ररीच्या इमारतींत शपथ वाहायाला कोणी बसलें तर इकडे आमचे लायब्ररीचे वर्गणीदार लक्ष देतील काय?

शाळा—येथील इं० म० स्कूलचे हेड मास्तर सदाशिव गोविंद दामले हे बिनपगारी दोन महिन्यांची रजा घेऊन उमरावतीकडे निघुन गेले आहेत, त्यांचें काम फ० अ० मास्तर मि. विनायकराव हे पहातात. येथील सातवे इयत्तेतील मुलें बाल लायब्ररी काढणार असा गवगवा आहे उद्योग स्तुत्य आहे हा त्यांचा उद्योग विश्वभर सफल करो आणखी मी त्यास असें सांगतों कीं ह्या बरोबर त्यांनीं बालसभेचाही उद्योग चालवावा. हिच्या पासून हो बहुत फायदे होतात व आहेत.

पत्रकर्तेराव पत्र फार लांबलें ह्मणून रागावूं नका अशी माझी विनंती आहे व हें पत्र केराची टोपली धवणार नाहीं अशी माझी दुसरी हात जोडून विनंती आहे. पुढें एखादे वेळीं भेट घेईन. कळावें लोभ असावा हो विनंती.

आपला

"नवीन रहिवासी"

---

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्विन वद्य ५ शके १८११

## लॉर्ड डफरिन साहेब यांचे हिंदुस्थान देशा विषयीं उद्गार.

सुमोर एक महिन्या पूर्वी विलायतेंत लार्ड डफरिन साहेबांना ऐरिष लोकानीं मेजवानी केली. त्या वेळीं लाट साहेबांचे गुणानुवाद तेथें जमलेल्या सर्व मंडळीनें केले यांत नवल नाहींच. त्याच प्रमाणें त्या गुणानुवादाचे उत्तर देतानां लाट साहेबानीं

ज्याची खावी पोळी
त्याची वाजवावी टाळी.

या म्हणी प्रमाणें एरिश लोकांची तारिफ केली यांत ही नवल नाहीं ही मेजवानी ऐरिश लोकांनीं दिली त्या ठिकाणीं स्काच लोकानीं दिली असतीतर त्या प्रसंगीं लाट साहेबानीं स्काच लोकांच्या वैभवाचें असेंच तुणतुणें वाजविलें असतें. ऐरिश लोकांचीं तारीफ करितां करितां ते असें म्हणाले कीं हिंदुस्थान देशांत ही ऐरिश लोकानीं आपला पगडा सर्वांचेवर ठेविला आहे. लाट साहेब म्हणाले हिंदुस्थानांतले हल्लींचे गव्हरनर जनरल लॉर्ड लांन्स डौन साहेब हे ऐरिशमन आहेत. मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड कानिमारा साहेब हे ही ऐरिशमन आहेत. तसेंच हिंदुस्थानांतील सव लष्करी खात्याचे मुख्य सेनाधिपति सरफ्रेडरिक राबर्टस हे ही ऐरिशमन आहेत ज्यानें ब्रह्मदेश काबीज केला ते सरजार्ज व्हाईट साहेब हेही ऐरिशमन आहेत. या हिंदुस्थान देशातील अनुभवा वरूनच काय परंतु ब्रिटिश सरकारच्या अमला खालील इतर देशांच्या माहिती वरून असें सिद्ध झालें आहे कीं कोणत्याही देशाचें राज्य नीट रितीनें चालविण्याची ऐरिश लोकांत चांगली शक्ति आहे असें म्हटलें तरी चालेल मात्र त्यांच्या स्वतःचें देशाचें राज्य त्यांना चालवितां येत नाहीं. ) या पुढें साहेब म्हणाले "मी जरी पुष्कळ देशांतील लोक पाहिले आहेत तथापि त्या सर्वांमध्यें हिंदुस्थानांतील लोकांचें हृद्गत शोधून काढणें अगदीं कठिण आहे. हल्लींच्या काळीं आमची साहेब लोकांची जी कांहीं सुधारणा आहे तिला प्रारंभ होण्याच्या पूर्वी शेंकडों वर्षे हिंदुस्थानांत सुधारणेचा पुष्कळ उत्कर्ष झाला होता. त्यांच्या धर्मांचीं मूळतत्वें शोधून काढण्यांत आणि त्यांचेवर विचार करण्यात अनेक युरोपियन पंडितांच्या अक्कला गुंग होऊन गेल्या तथापि त्याचा धर्म आम्हांला समजला नाहीं. परंतु आमच्या हिंदुस्थानांतील प्रजा बांधवांची स्थिती सुधारण्याचे खटपटींत जरी आम्हाला कधीं कधीं यश आलें नाहीं तथापि इंग्लिश लोकांना या कामांत संतोष मानून घेण्याला पुष्कळ कारणें आहेत कारण कीं ज्या राज्यांत निरनिराळ्या देशचे निरनिराळ्या धर्मांचे लोक असून त्या सर्वांची सामाजिक आणि राजकीय स्थिती इतक्या थोड्या अवकाशांत पुष्कळ सुधारली आहे असा देश कोणता आहे तो पाहूं गेलों असतां कोणीही हिंदुस्थानांकडेच बोट दाखवील त्या देशांत इंग्रज सरकारचे राज्य स्थापन झाल्या पासून त्या देशाचा जितका उत्कर्ष झाला आहे तितका उत्कर्ष तितक्या थोडक्या काळांत या पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही काळीं कोणत्याही देशांत आणि कोणत्याही राज्याच्या अमलांत झाला नसेल ज्या संस्थानांतील मुख्य अधिपतींचें एकमेकांशीं हाडवैर पिढ्यान पिढ्या चालत आलें होतें, जे मांडलीक राजे शेंकडों वर्षे एकमेकांच्या राज्याचा नेहमी विध्वंस करून टाकीत असत ते संस्थानिक आणि ते मांडलीक राजे हल्लीं एकमेकांजवळ एकोप्यानें आणि प्रेमभावानें वागत आहेत न्याय म्हणजे काय पदार्थ आहे हें हिंदुस्थानच्या लोकांस पूर्वी कधीं ही माहित नव्हतें आणि पूर्वे कडील इतर देशानां अद्याप पर्यंत माहित नाहीं, अशी ज्या हिंदुस्थानांत स्थिती होती त्याच हिंदुस्थानांत रावा पासून रंकापर्यंत सर्व लोकांचे जीवित आणि वित्त हल्लींच्या राज्यांत अगदीं निर्भय होऊन गेलें आहे. हजारों मैलांन पर्यंत आगगाडीचे रस्ते झाल्या मुळें एका प्रांतांतून दुसरे प्रांतांत प्रवास करणें सुलभ झालें इतकेंच नाहीं परंतु एकदां दुष्काळ पडला म्हणजे ज्या ज्या प्रदेशांत मनुष्यांचे प्राणांचा फडशा पडत असे अशा प्रदेशांतून ते रस्ते गेले असल्या मुळें विपत्तीच्या काळीं लाखों लोकांचे प्राणवांचविण्याला मोठें साधन झालें आहे युनिव्हर्सिट्या कालेजें, आणि शाळा या मोठमोठ्या राजधानीच्या शहरांतूनच आहेत असें नाहीं त्या प्रत्येक शहरांतुन आणि खेड्यापाड्या निहायहीं आहेत आणि त्यांतून लोकांनां विद्यादान अगदीं फुकट दिलें जातें. विलायतेंतील यंत्रशास्त्रज्ञ लोकांच्या श्रमामुळें आणि उद्योगा मुळें हिंदुस्थानांतील कोट्यावधी लोकांना सस्त्यादरानें वस्त्रें मिळतात इतकें नाहीं परंतु त्या लोकां कडूनच व त्यांच्याच देशांत त्यांची स्वतःचीं यंत्रें व कारखानें स्थापन करून नवीन वस्त्रें प्रावर्णे तयार करण्याचे त्यांनां आम्हींच शिकविलें. परंतु या सर्वां पेक्षां मुख्य महत्वाची गोष्ट ही कीं आमच्या पाश्चिमात्य लोकांची म्हणजे खरी नीति ही त्या देशांतील लोकांनां आतां कळूं लागली आहे. या प्रमाणें अनेक तऱ्हेनें हिंदुस्थान देशचें हित इंग्लन सरकारच्या राज्या पासून झालें आहे. परंतु मी पूर्वी त्या देशांत गव्हर्नर जनरल होतों यासाठीं मला त्या विषयीं विशेष सांगणें उचीत नाहीं."

इतकें भाषण झाल्यावर लाट साहेब पुनः दुसऱ्या विषया संबंधे बोलूं लागले. आम्हीं तूर्त लाट साहेबांच्या भाषणाचा गोषवारा दिला आहे या भाषणांत खरें तथ्य किती आहे याचा विचार आमचे प्रिय वाचक यांनीं आणखी एक आठवडा भर करावा अशी त्यांना शिफारस करून आम्ही तूर्त रजा घेतों आमचे स्वतःचे या विषयी विचार पुढें एखादे वेळीं कळवूं.

## प्रोफेसर जिनसीवाले यांनीं घातलेली धर्म संबंधीं समजूत.

हल्लीं ज्या विषयावर नेहमीं व्याख्यानें होतात निबंध लिहिले जातात त्यापैकींच समाज व्यवस्था, राज्यव्यवस्था व धर्म हे विषय आहेत. ह्या तिहीपैकीं गहन विषय जो पस्तुतचा धर्म यावर प्रोफेसर जिनसीवाले यांचीं येथें दोन व्याख्यानें झालीं. यामुळें त्यांचा अकोलेकरांशीं जरी परिचय झाला नाहीं. तथापि अकोलेकर आतां यांची ओळख विसरणार नाहींत. ही ओळख न विसरण्याचें कारण त्यांनीं धर्मासंबंधानें आमची लहानापासून थोरापर्यंत सुलभरितीनें व सरळ अशी घातलेली समजुत. आजपर्यंत अकोले करास पुष्कळ व्याख्यानें ऐकण्यांत सांपडलीं परंतु प्रोफेसर साहेबांच्या व्याख्यानापासून आकोलेकरास एक निराळे प्रकारचा फायदा झाला आहे.

अमुक धर्म चांगला अगर अमुक धर्म वाईट असें ठामसत ठोकून देणें ह्मणजे केवळ साहस व हट्ट आहे. प्रत्येक धर्माची मूलतत्वें खरी व चांगलीं आहेत. प्रत्येक धर्मांत देशकालाच्या मानानें व्यंगें आहेत तसाच चांगुलपणाही आहे. पण एका धर्मातील लोकांस विनाकारण दोष लावणें व उपहास करणें ह्मणजे व्यर्थ अभिमान नव्हे काय? अभिमान हा प्रत्येक मनुष्याचे ठायीं असतो व तो असणें वाजवीही आहे तथापि कोणत्याही गोष्टींत सत्यासत्याचा विचार करूं लागलों ह्मणजे क्षणभर तो एकीकडे ठेवला असतां यश प्राप्तीचा जास्त संभव आहे. हा अभिमान तुर्त एकीकडे ठेवून आपण आपल्या धर्माविषयीं विचार करूं लागलों तर परधर्मातील लोकांचे आपणांवर जे आक्षेप आहेत ते निवारण करतां येतील. हिंदुधर्मावर पहिला आक्षेप हा कीं तुह्माला एक देव नाहीं. तुमचे देव ह्मटलें ह्मणजे शेंकडों आहेत. वेदाविषयींची माहिती नष्ट होत चालली आहे. ही स्थिती आजकालची नव्हे. फार दिवसापासून चालत आलेली आहे. यास कारणें अनेक आहेत तीं सांगण्याची येथें जरूर नाहीं तथापि वेदाविषयी जी माहिती आहे त्यावरून इंग्रजी दिक्षीत देखील कबूल करतात कीं ख्रिस्ती शकाच्या २००० वर्षांपूर्वी ही वेदा संबंधी माहिती. आतां "द्यौपृथ्वी जनयन्नेक देव" व "सभूमि विश्वतोवृत्वा नयत्तिषत् दशांगुलं" वगैरे जीं वेद वाक्यें आहेत त्यावरून देवाच्या एकते विषयीं कांहीं शंका राहत नाहीं. हें जर २०० वर्षां पूर्वीच आह्मांस कळलें आहे तर ही कल्पना आमच्या पासून घेतली असेल तर इतरांनीं घेतली असें ह्मटलें असतां विशेष शोभेल. आमच्यांत ३३ कोटी देव आहेत ही जी कल्पना आली ती वेगळ्या कारणामुळें ईश्वर आहे ही जी कल्पना आपण कबूल करतों ती प्रत्यक्ष ज्ञानानें नव्हे तर अनुमानानें. व्यवहारांत अनुमानानेंच पुरावे आपणास जास्त घ्यावे लागतात या न्यायानें भक्तिभावामुळें. ईश्वरा विषयीं जसें ज्यास अनुमानानें ज्ञान झालें तसे तो परमेश्वराचें रूप कल्पूं लागला व त्या त्या नांवानें अळवूं लागला. वस्तुतः ईश्वर एकच. कल्पना करा एका आईला ४ मुलें आहेत. एक चांगला सुशील आहे ह्मणून ती त्यावर लोभ करिते. दुसरा उनाड आहे ह्मणून त्यावर ती रागावते. तिसरा लहान आहे ह्मणून ती त्याला खाऊ देते. पहिल्याला आपली आई चांगली वाटेल. दुसऱ्यास तसे न वाटतां याच्या उलट वाटेल. तथापि दोघांची आई एकच. तद्वत ईश्वर एक असतां हा सृष्टिचमत्कारांत कौतुक मानतांना जसजसे ज्यास अनुमान करितां आले ततसतसे त्यानें ईश्वर कल्पून वर्णन केलें आहे.

आतां दुसरा जो आरोप आहे तो फारच घाणेरडा आहे. ते ह्मणतात तुमचे देव व्यभिचारी आहे. ब्रह्मदेवानें प्रत्यक्ष आपल्या कन्येशीं व्यभिचार केला. विष्णुनें ऋषिपत्नीशीं या गैरसमजुती कशा झाल्या पहा. प्रथम सांगितलेंच आहे कीं ईश्वर एक आहे. परंतु भावपरत्वें एका देवासच अनेक नांवें आहेत. सूर्य यासच प्रजापती ह्मणतात. उषःकाल यास सरस्वती कवीनें मानलें आहे. आतां उषःकालाच्या मागोमाग सूर्योदय होतो यावरून कल्पना कीं उषःकाल जो रमी इच्या मागोमाग प्रजापती आला ह्मणून प्रजापतीवर व्यभिचाराचा आरोप आला. वस्तुतः मूळ अर्थ उषः कालानंतर सूर्योदय झाला. तसेच विष्णुस अहिल्याजारजे ह्मणतात ताही गैरसमज आहे. अहिल्या ह्मणजे रात्र व जार ( जॄ ह्मणजे मारणें ) मारणारा म्हणजे नाहींसा करणारा. रात्रीस नाहींसा करणारा हा सुलभ अर्थ असतां ता नाहींसा होऊन अज्ञानत्वामुळें वरील अर्थाची प्रवृत्ति आहे. तात्पर्य काय कीं केवळ गैर समजुतीमुळें हे प्रकार झाले आहेत. वस्तुतः सर्व नीट आहे.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 14 1889.

## DRAFT RULES UNDER BIRTHS DEATHS ACT.

The subjoined draft rules framed under sections 25, 27 and 33 of the Hyderabad Assigned Districts and Secunderabad Births, Deaths and Marriages Registration Laws, 1888, respectively, are published for information and public criticism.

2 The draft will be taken into considera tion on or after the 1st November 1889, and any person desiring to make any objection or suggestion regarding it should submit such objection to the Resident on or before the said 1st November 1889.

Notification by the Government of India Foreign Department dated Simla, the 1889 No.

The Governor General in Council is pleased to publish the following rules made under sections 25, 27 and 33 of the Hyderabad Assigned Districts Births, Deaths, and Marriages Registration Law, 1888:...

1 In these rules, unless there is somethig repugnant in the subject or context,—

(1) "the Law" means the Hyderabad Assigned Districts Births, Deaths and Marriages Registration Law, 1888:

(2) "schedule" means a schedule to these rules:

(3) "Registrar-General" and "Registrar" means respectively a Registrar General of Births, Deaths, and Marriages and a Registrar of Births and Deaths appointed under the Law: and

(4) "sign" used with reference to a person who is unable to write his name includes mark.

2 Notices of births and deaths shall be in the form set forth in schedule A and schedule B respectively.

3 Every such notice shall be signed by the person giving it, and shall specify the capacity in which the person claims to be authorized to give it.

4 Every such notice shall ordinarily be presented to the Registrar for the local area in which the birth or death occurred within three months of the date of the birth or death to which it refers, as the case may be:

Provided that the Registrar may, of his own authority, for any reason which he considers sufficient, accept notice of a birth or death at any time within six months from the date of its occurrence, and with the special sanction in writing of the Registrar General after that time.

5 An appeal against an order of a Registrar refusing to register a birth or death on any other ground than that referred to in proviso (a) to section 18 of the Law shall lie to the Registrar General, who may in his discretion either confirm the order of the Registrar or direct him to register the birth or death.

6 Registers of births and deaths shall be kept in the forms set forth in Schedule C and Schedule D respectively.

7 When a birth or death has occurred during a journey, or when the person giving notice of a birth or death was compelled by duty, or urgent necessity, or unavoidable accident, to leave the local area in which such birth or death occurred so soon after its occurence that he was unable to give the prescribed notice to the Registrar for that local area, any Registrar may receive notice of such birth or death and register the same as if it were a birth or death which had occurred within the local area for which he has been appointed.

8 The provisions of rule 4 as to the time within which notice of a birth or death must be given shall apply to every notice of a birth or death given under the circumstances described in the last foregoing rule.

9 In every case of a birth or death admitted to registration under rule 7 the Registrar to whom the notice of the birth or death is given shall record in his register the reason why the notice was not given to the Registrar of the local area within which the birth or death occurred, and shall within one week from the date of the registration of the birth or death forward to the Registrar-General and to the Registrar of the local area within which the birth or death occurred a copy of the entry in the register relating to the birth or death.

Every Registrar shall paste into a book kept by him for the purpose all copies of entries received by him under this rule, and the book containing the copies shall be at all reasonable times open to inspection by any person desiring to inspect it.

10 Every certificate of registration of a birth or death given by Registrar under section 22 of the Law shall be in the form set forth in Schedule E.

11 At the foot of every copy of an entry given under section 9 or section 24 of the Law, there shall be written a certificate dated and subscribed by the Registrar-General or officer authorized under section 9 or by the Registrar, as the case may be, that the copy is a true copy of the entry.

12 Every Registrar shall keep in the form set forth in Schedule F a register of all certificates of registration and copies of entries given by him.

The Registrar-General shall keep a register in a similar form of all copies given by him of entries in the certified copies of the registers sent to his office.

13 The copies of entries of births and deaths which Registrars are required by section 23 of the Law to send to the Registrar General shall be certified in the form set forth in Schedule G, and shall be sent at intervals of three months on or as nearly as possible after the 1st January, April, July and October in each year.

Should no entries be made in a register during the preceeding three months, a certificate to this effect shall be sent to the Registrar General.

14 The indexes which are required by section 7 of the Law to be made of the certified copies of registers of births deaths and marriages sent to the office of the Registrar General shall be in the forms set forth in Schedule H, Schedule I, and Schedule J respectively.

Every entry in an index shall be made alphabetically with reference to the initial letter of the name of the person indicated by the entry.

In the index of certified copies of entries of marriages the names of both the husband and the wife must be indexed.

In the case of a person of European descent, the initial letter will be the first letter of the surname, and in the case of any other person the first letter of his name, and not that of his rank, title or class.

15 A Registrar may of his own motion correct in manner prescribed in section 27 of the Law any error in form made in an entry of a birth or death in a register of births or register of deaths kept by him under the Law.

In every case in which an entry is corrected under this rule intimation thereof shall (if practicable) be communicated within one week from the date of the correction being made to the person who gave the notice of the birth or death.

16 When an error in substance in any entry of a birth or death in a register of births or register of deaths is asserted to have been made, the Registrar may correct the error, in manner prescribed in section 27 of the Law, on application made in writing and signed in the presence of two witnesses attesting the signature by any person authorized under section 19 or 20, as the case may be, to give notice of the birth or death to which the entry relates.

Provided that the Registrar is satisfied that the application is well founded.

An appeal against an order of a Registrar under this rule refusing to correct an asserted error in an entry in a register shall lie to the Registrar General, who may, in his discretion, either confirm the order of the Registrar or direct him to correct the error.

17 Without the special sanction in writing of the Registrar General, an application for the correction of an entry in a register of births or register of deaths shall not be entertained after the expiration of one year from the date on which the notice of the birth or death was given.

18 The sums specified in Schedule K shall be the fees payable under the sections of the Law there referred to:

Provided that soldiers and non commissioned officers of Her Majesty's Regular Forces, and all seamen shall be exempted from the payment of any fees.

19 The Registrar-General and every Registrar shall keep a register, in the form set forth in Schedule L, of all fees realised under these rules, and shall forward the fees at the end of each month to the nearest treasury to be credited to Government. The treasury officer shall give the registrar a certificate of the amount so credited and the registrar shall send a copy of the certificate to the Registrar General.

The above rules are good so far as they go. It is not quite clear if these same rules will be applicable to the local municipalities; probably they will. The rules at Khamgaon make it penal not to give due information of the fact of death or birth. The Amraoti Municipality has, we learn framed certain rules for registration of births and deaths minus the penal clauses at Khamgaon. It is very good now that these rules are framed that all over Berar there would be the same rules to guide the people. But the working of these rules must depend always on the good sense of the people who must be habituated to give information voluntarily in due time.

## CORRESPONDENCE.

Akola. 13th October 1889

It is highly pleasing to note that the Hindus of this little station are heartily endeavouring to bring up a cricket club and for this purpose they have collected among themselves about Rs. 20. But the Native gentry in general have not been called upon to subscribe their mite to the fund for this really laudable object. A general meeting of the members was to be convened in the Library on Sunday last the 6th, with the object of making suitable and convenient arrangements for the realization of subscription and the working of the club, but unfortunately they could not get together for some reason or other; at all events it is hoped that sufficient funds will be forthcoming in due time. I should not omit to mention here however that there are a few gentlemen in the City and round about of solid worth, who always take keen interest &c. and lend ungrudgingly their helping hand to such purposes will kindly come forward and better the prospects of this time-honored game.

"A wellwisher."

पोंचः—"आपला एक पुसदकर अपरिचित अं" आपलें पत्र पावलें. स्थलसंकोचास्तव पुढील खेपेस घेऊं.

## वऱ्हाड.

हवामानः- दोनतीन दिवसापासून सकाळीं थोडीथोडी थंडी पडूं लागली आहे. दुपारी उन कडक पडल्यामुळें उष्मा फार होतो आजार वगैरे विशेष कांहीं नाहीं.

येथील हायस्कूल व ट्रेनिंगकालेज यांच्या वार्षिक परीक्षा गेल्या बुधवार पासून सुरू झाल्या.

येथील रेलवे स्टेशना वरील सब पोस्ट आफिसात देव घेव व इतर कामें या पुढें सकाळीं १०॥ पासून सायंकाळी ६॥ वाजे पर्यंत होतील. पत्राचा खांत्र नेहमीं प्रमाणें प्रत्येक गाडी येण्यापूर्वी १० मिनिटें उघडला जाईल.

मुंबईकर संगित मंडळीनें गेल्या शनवारीं सात्र संगित सौभद्र हा खेळ करून दाखविला. तो साधारण बरा झाला.

चीफकान्स्टेबल लोकांची परीक्षा गेल्या आठवड्यांत उमरावती येथें झाली. मे. राईट सा०, गंथार्प सा० व रा० रा० विठ्ठल बळवंत हे परीक्षक होते.

मि. जे. ए. क्राफर्ड यांस हैदराबादच्या फर्स्ट असिस्टंन्ट रसिडेन्टच्या जागीं नेमले असें समजतें.

रा. रा. सखाराम माहादेव येथील सब रजिस्ट्रार यांस खामगांवास बदलले व रा. रा. जयराम कृष्ण सब रजिस्ट्रार यांस येथें नेमीले

खामगांवास स्पेशल म्याजिस्ट्रेटचे बेंच मध्यें च्यार गृहस्थांची नेमणूक झाली. ते खालीं लिहिले प्रमाणें मे० मोलेखान, मेसर्स मॉकिनटायर, मे० पुनमल शामलाल, व रा० रा० आनाराव देशमुख.

उमरावती येथील हायस्कुलांतून यंदां १६ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेस जाणार आहेत असें कळतें.

मि० आवर्ड सा० सि० आणि सेशन जज सेशनासाठीं येत्या ता० २१, चे सुमारास अकोल्यास येणार आहेत.

आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं, उमरावती येथील जुने वकील रा. रा. रामचंद्र त्र्यंबक यांस देवाज्ञा झाली.

## जाहीर खबर.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून या जाहिरातीनें जाहीर केलें जातें कीं माझे मुलगे दोन नामें बळीराम वल्लद जानराव व बनशी वल्लद जानराव हे उभयतां आमचे कोणच्या ही प्रकाराने कहेत नाहींत. व सदरील बळीराम हा आद मासें दाहा आकरा वर्षां पासून आमचे पासून वेगळा आहे. आतां बळीराम यानें दहीगांवकर मन्नु मुसलमान कलाली मक्तेदार याजपासून कलालीचा पोटमक्ता घेतला आहे. याज करितां असें जाहीर केलें जातें कीं सदरहू बळीराम यांस सदरील कलाली मक्त्यात नफा किंवा नुकसान जाहलें तर त्याजबद्दल आह्मी कोणचेही प्रकारचे जबाबदार नाहीं व असें ही आणखी जाहीर करतो कीं आमच्या भरवशावर जर कोणी या उभयताशीं कोणत्याही प्रकारची देवघेव वगैर केली तर अगर जर कोणी कर्ज वगैरे दिल्यास त्या उभयतांच्या जातीवर द्यावें आमच्या भरवशावर देऊं नये दिल्यास त्याजबद्दल आह्मी कोणच्याही प्रकारानें जबाबदार नाहीं. म्हणून दिली जाहिरात सही ता० १२।१०।८९ इ०

( सही )

ज्यानराव वल्लद गोंडुबा देशमुख

राहणार भांबेरी ता० आकोट

यांचे हातची निशाणी असे

## वर्तमानसार.

ह्मैसूर मध्यें दसऱ्या करितां पुष्कळ लोक जमले असतां तेथील बाजारावर सरकारनें कर वाढविला यामुळें दुकानें बंद झालीं. जमलेल्या लोकांस अन्न व वस्त्र वगैरे सामुग्री मिळेनाशी झाली. त्यामुळें फार बोंभाट झाला तेथील सरकार लोकांचें ह्मणणें मनावर घेत नाहीं सबब रेसिडेंट साहेबांकडे तक्रार नेली आहे असें मद्रास मेलवरून समजतें.

कलकत्ता व सिमला मध्यें नाण्या येण्या बद्दल क्लार्क लोकांस कमींत कमी १०० रुवाट खर्ची करितां द्यावें असें ठरलें.

सर विलियम आर्मस्टांग यांनीं धूर न होणारी व सर्दीची भीति नाहीं अशा प्रकारची नवीन दारू तयार केली आहे.

कलकत्ता येथें पंडित प्राणनंद कवी भूषण यांनीं ज्योतिषशास्त्र शिकविण्याची शाळा घातली आहे. त्यांत जन्मपत्रिका वगैरे कशा कराव्या हें देखील शिकविलें जातें. शिकविण्या बद्दल फी पांच रु. ठेविली आहे. सु. प.

वाढविणार—लष्करी खातें जास्त वाढविण्याच्या संबंधानें हिंदुस्थान सरकार विचार करीत असून, त्या संबंधानें इतर सर्व स्थानिक सरकारांचीं मतें मागितलीं आहेत.

रेलावर डब्बे ठेवून ते पाण्याच्या जोरानें चालविण्याची युक्ति निघाली आहे. ह्या डब्यांस चाकें नसून त्यांच्या बुडाशीं खोरणीचे ठोकळे लाविलेले असतात आणि जोरानें उडणाऱ्या पाण्याच्या योगानें त्या डब्यांची ट्रेन चालवितां येते. आगगाडींत प्रत्येक माणसा पाठीमागें जो कोळशाचा खर्च येतो, त्याच्या दशांश या नवीन युक्तीनें येईल असें ह्मणतात. शिवाय तासास १०० मैल या वेगानें जरी ट्रेन चालत असली तरी ती चटकर थांबवितां येते. क०

मागणी—हिंदुस्थानच्या संरक्षणा साठीं सरकार निरनिराळ्या ठिकाणचीं बंदरें आपल्या हस्तगत ठेवून बंदोबस्त करीत आहे. त्याप्रमाणें पोरबंदर व द्वारका हीं बंदरें आपल्या ताब्यांत यावी अशा बद्दल त्या त्या संस्थानिकाकडे मागणी करण्यांत आली आहे असें ह्मणतात. बंदर स्वाधीन करण्याच्या मोबदला ह्मणून पोरबंदर येथील राण्यास पुन्हा गादीवर बसविण्याची आशा दाखविली जात आहे असेंही समजतें.

एखाद्याची जागा म्युनिसिपालिटीनें घेतल्यास त्या जाग्याची किंमत जितकी महाग बाजारांत होईल त्याहून शेंकडा १५ टक्के जास्त किंमत म्युनिसिपालिटीनें द्यावी असें नुकतेंच हायकोर्टानें ठरविलें आहे.

नवीन ठराव—इंग्लिश मुलखांत फिरणाऱ्या नेटिव सरदारांनीं वगैरे २० असामी पेक्षां जास्त हत्यारबंद लोक बरोबर बाळगूं नयेत. अशा बद्दल हिंदुस्थान सरकाराकडून हुकूम सुटला आहे असें समजतें.

इंडिया कौन्सिलच्या मेंबर लोकांची संख्या कमी करण्याविषयींचें बिल हाऊस आफ लार्डस् मध्यें पास झालें.

बेळगांवच्या पूर्व व दक्षिण भागांत टोळांचा उपद्रव बराच होत असल्याचें कळतें.

ह्मैसूर महाराजांनीं इंग्लंडाहून एक वाफेची ३ चाकांची गाडी ( ट्रायसेकल ) आणविली आहे. हिचा उपयोग ते आपल्या राजवाड्या पासून बंगलोरच्या स्टेशना पर्यंत करितात. ह्याच्यांत तीन मनुष्यांची सोय केलेली असते. हिचा वेग तासांत १५ मैल आहे. ही एक लहान वाफेचीच गाडी ह्मणावयाची.

कापसाचे व्यापारास धोका— ( लंडन २८ सप्टेंबर ) आज रोजीं येथें असें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें कीं, आजमासापेक्षां १८,२०० कापसाचे गठ्ठे लिव्हरपूल स्टाक एक्सचेंज मध्यें कमी आहेत, या योगानें कापसाचे व्यापारांत मोठा हाहाकार उडाला आहे. ब०

गोरेलोक संस्थानांतून जाऊं लागले ह्मणजे त्या त्या संस्थानिकापासून फुकटच्या गाड्या घोडीं उपटतात अशा प्रकारचा एक पत्रव्यवहार नुकताच बाहेर आला आहे इकडे सरकारानें लक्ष्य द्यावें.

मामलेदारांच्या संबंधानें सरकारानें दिलेलें वचन मोडूं नये अशी कलकत्ता ब्रिटिश इंडियन सभेनें स्टेट सेक्रेटरीस तारानें विनंती केली आहे.

मनोतीचा भाव उतरल्यामुळें ग्यारेंटीड रेल्वेला सरकारास जें व्याज द्यावें लागतें तें १०३ लाखांनीं जास्त जातें असें ह्मणतात. विलायतेसच जातें ना!

बोलटन प्रांतांत दहा हजार खलाश्यांनीं काम करण्याचें नाकारलें आहे. पगार जास्त मागतात.

बुडापेस्त येथील एका कामदारावर सरकारी ४२,००० क्लारिनचीं अफरातफर केल्याबदल आरोप आला आहे. आरोपी ह्मणतो कीं मी ते पैसे सरकारी मोठमोठ्या अंमलदारास उसनवारी दिले.

मद्रासेस एक हिंदु पुनर्विवाहाचा खटला आला आहे. एका ब्राह्मणानें एका विधवेशी लग्न लावलें त्यावरून तेथील उपाध्ये त्यास जातींत घेईनात ह्मणून त्यानें उपाध्यावर पूजा करण्याची व अब्रुनुकसानाची फिर्याद केली आहे.

भूमध्यसमुद्रांत जीं लढाऊ गलबतें आहेत त्यांत आणखी पांच गलबतें नवी ठेवण्याचा इंग्रज सरकारचा विचार चालू आहे.

गोव्यास एक वाघ आला आहे यानें एका मागून एक अशा दोघा ख्रिपास यमसदनी पाठविलें.

लढाईच्या वेळीं मुख्य क्याप्टनास इतर गलबतें कशीं असावीत, कोणत्या दिशेला वगैरे हुकूम सांगावे लागतात ते त्या त्या लढाऊ गलबतांवर तारेनें सोडतां यावे अशी एक नवी युक्ती निघाली आहे.

प्रिन्स आफ वेल्स हे इतक्यांत इजिप्तमध्यें जाणार आहेत.

ज्युरीस प्रुडन्स नांवाची वकिली संबंधीं परीक्षा मुंबईस उद्यां सुरू होईल.

एका मुसलमान बाईला एका देवरुषीनें सांगितलें कीं तुला जर मुलगा पाहिजे असेल तर तूं दुसऱ्याचे मुलाचा खून कर. बाईला मुलगा पाहिजे होता! तिनें घेतला एका मुलाचा जीव. परंतु बिचारीला मुलगा होण्याचे पूर्वीं फांशीची शिक्षा झाली.

मामलेदारांच्यासंबंधानें सरकारानें दिलेलें वचन मोडूं नये ह्मणून यावलें, बडोदे, विटे, जि० सातारा, अमदाबाद, सुरत, जळगांव, नडियाद, बेळगाव, कोल्हापुर, अहमदनगर, विजापूर, कुमठा वगैरे ठिकाणीं सभा होऊन तशा आशयाची तार हिंदुस्थान सरकारास करण्याचे ठरलें. बरीच चळवळ झाली ह्मणावयाची.

विलायतच्या लिव्हरपूल गिरण्यांत कापसाची फार तूट पडली आहे.

उत्तम तऱ्हेचा तंबू तयार केल्याबद्दल हिंदुस्थानांतील एका कारागिरास पारिस प्रदर्शनांत इनाम मिळालें. ठा०

एक लाख रुपयांचें एक रुद्राक्ष--कलकत्यांत एका जव्हेऱ्याचे दुकानीं एक मुखी रुद्राक्ष विकण्यास ठेविलें आहे, त्याची किंमत तो जोव्हेरी एक लक्ष रुपये सांगतो. सदरहू रुद्राक्ष नेपाळांतील एका झाडाचें आणिलेलें आहे. हें झाड नेपाळांत एकच असून त्यांस पुष्कळ रुद्राक्ष लागले आहेत परंतु त्या सर्वांत पवित्र बरे असे तीनच रुद्राक्ष मिळण्यांत आले असें तेथील धर्मगुरू सांगतात त्या पैकीच हा एक होय. सदरहू झाड नेपाळांत इतकें पवित्र मानितात कीं, शिवभक्ता वांचून जे कोणी ह्या झाडास शिवतील त्यास देहांत शासन देण्यांत येतें सदरहू रुद्राक्ष खरें आहे अशी खात्री तेथील ह्यामिल्टन कंपनीनें दिल्यास एक व्यापारी एक लक्ष रुपये देऊन तो विकत घेण्यास तयार आहे.

पुणें येथें सरकारानें जें खोती कमिशन बसविलें आहे, त्याचा मुख्य उद्देश खोतांचे पकिपाहणी करण्याचे हक्क काढून घ्यावे असा आहे. खोतांनीं शेतें मक्त्यानें ठरवून द्यावीं असें सरकारचें म्हणणें आहे. आजपर्यंत सुरू असलेल्या वहिवाटीनें सरकारी कामगारास कामाचा फार त्रास पडतो, व ह्या मुळें सरकारानें ही नवीन व्यवस्था करण्याचें मनांत आणिलें आहे असें म्हणतात परंतु सरकारी कामदाराचा त्रास चुकविण्या करितां खोतांचे हक्क बुडविणें निवळ अन्याय नव्हे काय?

कानपूर येथील लाल देवी प्रसाद नावाच्या श्रीमंत गृहस्थानें हिंदु लोकांचीं प्रेतें दहन करण्या करितां एक स्वतंत्र घाट बांधण्या साठीं एकंदर १५००० हजार रुपये दिले आहेत.

विमानाला घोडा बांधून त्याच्या सुद्धां ते वर आकाशांत उडविण्याचा प्रयोग कलकत्यास होणार आहे. त्या संबंधानें कलकत्याचे हायकोर्टाचे जज्ज मि. मारिस यांनीं पशुपक्ष्यांना निर्दयपणानें वागविण्या बद्दल जी मंडळी आहे तिच्या मार्फत तेथील पोलिस अधिकाऱ्यांस हा प्रयोग न होण्याबद्दल अटकाव करण्यास कळविलें आहे.

जामनगर, खाकरेची, विहापूर येथें टोळांनीं नाश केला.

एका ऑनररी म्याजिस्ट्रेटाचा खून—पंजाब इलाख्यांतील गुजरणवाला जिल्ह्यांत त्या एका गांवीं असणाऱ्या एका जमीनदाराचा मोठ्या क्रूरपणानें खून झाला. हा जमिनदार शिख जातीचा मोठ्या थोर कुळांतला सरदार होता. त्याजवर सरकारचा पूर्ण विश्वास असून त्यास आनररी म्याजि.चा अधिकार दिलेला होता. ह्या माजि. नें कांहीं बदमाष लोकांपासून प्रत्येकीं त्यांचे चांगल वर्तणुकी बद्दल २००।२०० रुपयांचे जामीन घेतले होते, परंतु त्या जामीनकीची मुदत संपण्या पूर्वींच त्या बदमाशा कडून गुन्हा घडल्या मुळें ह्या सरदार म्याजि.नें त्यांच्या जामीनकीच्या रकमा जप्त केल्या. ह्या मुळें त्या बदमाषांनीं म्याजि. बद्दल मनांत डाव धरून त्याला ठार मारण्याचा विचार केला. एकदां म्याजि. साहेब आपल्या गांवांवर फिरावयास निघाला असतां हे बदमाष जमून त्याचे जवळ गेले. आणि त्याचे हातीं एक पत्र देऊन तें वाचून पाहण्यास सांगितलें. तें त्याणें वाचण्याचें कबूल केलें नाहीं. तेव्हां ते सर्व बदमाष त्या बापड्यावर घसरून त्यांणीं त्याला लाथा बुक्यां खालीं आणि कांठ्यां सोट्यां खालीं ठार मारलें! इतकेंच करून ते दुष्ट स्वस्थ बसले नाहींत. ते तसेंच त्या सरदाराचे घरावर चालून गेले तेथें सरदाराची बायको होती तिचे नाक व कान कांपून घरांत सांपडलेली सर्व चीज वस्त त्यांणीं लुटून नेली. तेव्हां या बापडीला आपल्या नवऱ्याची प्राणहानि झालेली समजून व नासाकर्ण छेदनाची वेदना न साहून तिणें घराजवळच्या विहीरींत उडी टाकून प्राण दिला ह्या भयंकर कृत्यानें त्या गांवांत मोठी चळवळ होऊन पुढें पोलिसानें मोठ्या शिताफीनें ह्या कामांतल्या २० असामीस पकडून म्याजि. पुढें उभें केलें. तेव्हां बहुतेकांनीं आपला अपराध कबूल केला. अखेर शिआळकोट येथील सेशन्स जज्जा पुढें पक्की चौकशी होऊन पांच जणांस फांशीची शिक्षा, कांहीं जणांस काळें पाण्याची शिक्षा व इतरांस अल्प स्वल्प शिक्षा देऊन ह्या भयंकर कृत्याचा शेवट केला. न्या० सिं०

मनुष्य प्राण्यांच्या अगदीं भिन्न भिन्न ७२ जाती आहेत. त्यांच्या मुख्य तीन शाखाः— एक काळे, दुसरी पिवळी व तिसरी गोरी.

स्वतःच्या खर्ची करितां जर कोणी मीठ तयार करील तर त्याबर खटला करूं नये असें बंगालच्या गव्हरनरांनीं फरमावलें आहे खरें काय?

युरोपांत वार्सा येथें ४० एकर जमिनीच्या तुकड्या बद्दल एक फिर्याद आज ४०० वर्षें चालली होती. ही फिर्याद १४९० त दाखल झाली होती. तिचा नुकताच निकाल झाला.

हिंदुस्थानांत ८६ लक्ष स्त्रिया कांहीं उद्योग करीत नाहींत. १९ लाख शेती करितात. २ लाख मळणी आहेत. ३ लाख कापूस पिंजतात. ९४ हजार पोळपाटलाटणें घेतात.

कोंबडीच्या अंड्यांचें तेल जखमा भरून येण्यास फार उपयोगी पडतें. कोंबडीचीं अंडीं खूप शिजवावीं त्यांतील पिवळागोर घेऊन तव्यावर पेटवावा ह्मणजे त्यांतून तेल निघतें प्रत्येक अंड्या पासून दोन चमचे तेल निघतें.

जर्मनीला ६५ कोट रुपये कर्ज आहे. १८७७ सालीं एक कोट रुपये कर्ज होतें व आज १० व वर्षांत ६४ कोट वाढलें.

अलास्का प्रांतांत मजुरांस ७॥ रुपये दररोज मिळतात, व कारागिरांस १७ रुपये मिळतात, व लागलें तितकें काम आहे.

दारू व तंबाखू सेवन केल्यामुळें अंधत्व प्राप्त होतें असें डाक्टर डिडी नावाच्या वैद्याचें मत आहे. के०

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालभरचें ... २ ... ५८
सालभरेर ११ ११ १८०
किरकोळ अंकास.........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
हें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in arrears ...
Six monthly............3 " 6 as
Single copy......................1as.

Advertisemesnts
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 as.
Repetition pe line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY OCTOBER 21 1889 NO. 41

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २१ माहे अक्टोबर सन १८८९ इ० अंक ४१

### गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समइ पतन होते- परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

### अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतें, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतें, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाकवडी औषध घ्यावें एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

---

### AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

### अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आम्हीं येथें पेठेत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळातीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केस काळे होण्याचा कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतत्राण, हीं औषधें मिळतील.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळावें कीं रिसोड येथील गोरक्षणीचा वर्षोत्साह मिति अश्वीन व. १२ सोमवार ता. २१–१०–८९ इ० रोजीं करण्याचा नेमिला आहे तरी जे गोकल्याण इच्छक असतील त्यांनीं आपण व आपले इष्ट मित्रासह कृपाकरून हा समारंभ पाहण्यास अगत्य अगत्य येण्याचें करावें. येथें सभा स्थापन झाल्यापासून या सभेनें खाटिकाच्या सुरी पासून गाई किती सोडविल्या, वर्गणी किती जमा केली, त्यांतून खर्च किती झाले व गाईचें राहण्याची आणि खाण्या पिण्याची काय व्यवस्था केली या बद्दलचा रिपोर्ट समारंभाच्या वेळीं वाचला जाईल. कळावें ता. १०–१०–८९ इ०

मुक्काम रिसोड
कृष्णराव रघुनाथ खेडें
सेक्रेटरी.

---

### पत्रव्यवहार.

हा सदरा खालील मजकूर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुसद, वऱ्हाड
ता० ६।१०।१८८९

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

सा. न. वि. वि. आपला माझा परिचय नाहीं तरी इकडील हकिकतीच्या चार ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत त्यांस आपले सुंदरपत्रीं जागा मिळेल अशी आशा आहे.

यंदा अजून पर्वतो ईश्वर कृपेनें पीक पाणी उत्तम आहे. आणि अखेर शेवटपर्यंत निभावलें तर ईश्वराची मोठी कृपा होईल.

येथील सरकारी अंमलदार मे. तहशिलदार साहेब आणि नायब तहशिलदार साहेब हे उभयतां उमरावतीस अनुक्रमें हायर आणि लोअरचे परिक्षेस गेलें आहेत. ईश्वर त्यांस यश देवो. दोघांचे जाण्यामुळें वासिमचे नायब तहशिलदार साहेब हे येथें आले आहेत.

यंदा दसऱ्याचा सण सालाबाद प्रमाणें आनंदांत गेला. त्या आनंदांत येथील म० शाळेचे हेडमास्तर यांनीं गांवांतील सर्व प्रमुख मंडळीस सायंकाळीं पानसुपारीस बोलावून भर घातली. ते दिवशीं सायंकाळीं सहा वाजतां निमंत्रणा प्रमाणें बरीच प्रमुख मंडळी जमली होती. नंतर येथील मराठी शाळेचे हेडमास्तर रा० गोविंद भास्कर ओक यांनीं "शिक्षण आणि शिक्षकांस येणाऱ्या अडचणी" ह्यावर एक निबंध लिहून आणिला होता तो वाचिला. निबंधांत दाखविलेल्या अडचणी लहान गांवांतील शिक्षकांस तर पावलों पावलीं येणाऱ्या आहेत. आणि त्यांपैकीं बहुतेक गांव कराच्यांनीं दूर होणाऱ्या आहेत. तर तिकडे स्कूल कमेटीचे मेंबरांनीं आणि गांवांतील प्रमुख गृहस्थांनीं अवश्य लक्ष द्यावें. अशी माझी हात जोडून विंनती आहे.

येथील दवाखान्याकरितां नवीन इमारत बांधावयाची ह्मणून बरीच चर्चा झाली व गेले सालीं मेहेरबान डेपुटी कमिशनर साहेब बहादुर व इंजिनियर साहेब जागा पसंत करण्या करितां आले होते परंतु अद्याप त्या बद्दल कांहींच ऐकूं येत नाहीं व कामास ही कोठें सुरवात झाली नाहीं. हल्लींची इमारत दवा खान्यास अगदींच निरूपयोगी आहे.

येथील लायब्ररींत बरींच वर्तमानपत्रें येतात; पण गांवांतील थोडेच संभावीत लोक लायब्ररींत जाऊन वाचतात. ही वाचनाची गोडी कधीं लागेल ती लागो.

येथें मण्यारीचें दुकान मुळींच नाहीं ह्या वस्तीला एक दोन दुकानें चांगलीं चालतील असें वाटतें. तर कोणी असें दुकान घालील तर त्यांस चांगला फायदा होऊन लोकांची ही चांगली सोय होईल. इकडे व्यापारी मंडळीनीं जरूर लक्ष द्यावें. कळावें पत्र विस्ताराची माफी असावी.

आपला
अपरिचित
"ओ"

---

### नाटक प्रयोग व त्याची स्थिति.

( लिहून आलेला मजकूर. )

३१ सावे अंकावरून पुढें चालूं

All callings are honorable, if pursued in an honorable spirit. It is the heart only which degrades the intention carried into work, and not the work itself. The most despised callings may be made honourable by the honor of its professors.

या उताऱ्या वरून बिचारी नाटककला जी आमच्या तिरस्कारास पात्र झाली आहे ती कोणत्याही प्रकार दोषी ठरत नाहीं. असे जर आहे तर तिचा आम्हीं अर्वाचीन आर्यांनीं कां अपमान करावा? तिच्या भक्तांना आम्हीं नीच कां मानवें तिच्यावर आमच्या अभिनव तरुण विद्वज्जनांचा एवढा कोप कां व्हावा? बिचारीचें सौंदर्य कां नष्ट व्हावें? बिचारीची कनकमय भूषणें जाऊन त्या जागीं पितळेची हेमवत दिसणारीं अलंकार भूषणें कां यावीं? या सर्व प्रश्नांचे जबाब आम्हास तर देता येत नाहींत. नाटक कलेचे प्रतिपक्षी या संबधानें आपले विचार कळवितील कां? असें तेव्हां नाटक कला आमच्या मतें कोणत्याही प्रकारें नीच नाहीं व त्या हलकी आहे त्या पेक्षां तिला उच्चस्थान मिळालें पाहिजे.

हें सर्व सत्य आहे; नाटक कलेचें सौंदर्य अनुपम आहे तिच्या सौंदर्याची कीर्ति दिगंतरीं गेली आहे तिच्या रम्यत्वाच्या मागानें वाल्मिकी सारख्या किंवा नारदा सारख्या ऋषिवर्यांचीं मनें लोलूप करून टाकलीं. पण तिच्या पदास्थित नुपुराच्या झणत्कारानें व कोमल विटपतुल्य बाहुस्थित कंकणाच्या टणत्कारानें आम्हा अर्वाचीन सर्व प्रकारें उदासीन बनलेल्या आर्यांचीं मनें कशी सुप्रसन्न व्हावितीं? सध्यांचा काळच असा आहे. सर्व प्रकारें आम्हांली ग्लानी आली आहे उद्योग देवतेचें राज्यें आमच्यांतून जें एकदां नष्ट झालें तें झालें. त्याचा उदय केव्हा येईल तो येवो. आंग्लभौमवासी जनांचें उदाहरण आमचे डोळ्या पुढें आहे. पण त्यांचे सद्गुणाचें रुप आलें आहे. त्यांच्या खऱ्या सद्गुणाचें अनुकरणें करण्या पुरता शहाणपणाचा भाग अद्याप आम्हांत आला नाहीं. तो लवकर यावा अशी आमची त्या जगन्नियंत्या पाशीं करद्वय जोडून प्रार्थना आहे. व त्या प्रार्थनेचा दर्शकच हा लेख आहे. असो. आमच्या लोकांनीं नाटक कलेचा उद्धार कां करावा या संबधानें चार शब्द लिहून हातीं घेतलेला लेख पुराकरूं. नाटककले पासून मनाचें रंजन होतें. खरोखरें दुर्गुणाचा लवलेश नाहीं असा हा एक करमणुकीचा प्रकार आहे. ज्या कोणाला दुर्गुणा पासून अलिप्त राहून आपलें मन रंजन करून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खुशाल या नाटक कलेच्या सौंदर्याचा अभिलाप मनांत धरावा. इच्यांशीं खुशाल रत व्हावें. इच्या अधरपानाची मनिषा निर्भयपणें धरावी. तिच्या संगमांत जें रमणीयत्व आहे तें अविनाशी होय. तें कधींही नष्ट तर नव्हेंच पण कमीही व्हावयाचें नाहीं. जे आमचे नगरवाशीं जन नाटककलेच्या रम्य सौंदर्या विषयीं उदासीन राहून विश्वयोषितांच्या नीच व क्षणिक सौंदर्यावर लोलुप असतात त्यांनीं या स्वर्गांगनेच्या स्वाभाविक सुरुपतेनें आपले नेत्रद्वय पुनित करून घ्यावेत. अशी आमची त्यास सविनय प्रार्थना आहे. आपल्या धनदेवतेचा व्यय या स्वर्गाप्सरेच्या अनुपम रुपदर्शनांत घालवावा. आमची अशी समजूत आहे कीं आपनांगनाचा रोजगार नष्ट करण्यास ह्या साधनासारखें दुसरें सुरेख साधन नाहीं. पुढें चालेल.

---

वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन वद्य १२ शके १८११

---

काश्मीरच्या महाराजांनीं आपल्या प्रजेवर जुलूम केल्यावरून व त्यांच्या खजिन्यांत बराच घोटाळा होता व तो सुधारणे त्यांच्या

राज्याबाहेर गेले होते सबब त्यांच्या ह्मणण्यावरूनच त्यांना राज्यावरून काढण्याचा किंवा यांचें राज्य खालसा करण्याचा सरकारचा कांहीं हेतु नव्हता वगैरे मतलबाचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. परतु ज्या वेळेस हे असे लेख प्रसिद्ध झाले त्या वेळेसच आह्माला व आमच्या इतर बंधूस बराच या बद्दल संशय वाटला होता व तो संशय आज अगदीं खरा होऊं पाहत आहे. काश्मीरच्या महाराजांस सस्पिंड करण्याचें खरें कारण काय आहे तें अमृतबझार पत्रिकेंत प्रसिद्ध झालें आहे त्यावरून स्पष्ट दिसून येईल कीं महाराजांस सस्पिंड करण्यास कारण महाराजाचा जुलूम किंवा घोटाळा नसून इंग्रज सरकारला आपल्या सरहद्दीचे संरक्षण करितां काश्मीरच्या राज्यांतील त्याच्या आसपासचा कांहीं प्रांत पाहिजेल होता. व तो आपण खालसा करून घ्यावा ह्मणून मि. ब्राउडन आपले वऱ्हाडांतील कायमचे कमिशनर व काश्मीरचे माजी रेसिडेंट यांनीं हिंदुस्थान सरकारास सूचना केली होती. परंतु ही सूचना अशा जबरीच्या रीतीनें अमलांत आणली सर्व दरबारच्या लोकांस ते आवडणार नाहीं तेणेंकरून सर्व लोकांचीं मनें दूषित होतील सबब अशा रीतीनें वर्तन न करितां कांहीं दिवस काश्मीरच्या महाराजाकडे आपला एक सरदार मेजर पोलीस यास पाठवावे व त्यांनीं काश्मीरच्या संस्थानांत फार घोटाळा चालला आहे तर त्याची व्यवस्था अशा तऱ्हेनें करावी असें फारिन सेक्रेटरी. मि. एच डयंड साहेब यांनीं सुचविलें व त्यावर लार्ड डफरिन साहेबांनीं "बरें आहे" (very well) असें लिहिलें फॉरिन सेक्रेटरीनीं केलेली सूचना व त्यावर लार्ड डफरिन साहेबांचें अनुमोदन हें दोन्हीही लेख अमृतबझार पत्रिकेनें बाहेर काढले आहेत. व त्याजबद्दल त्या पत्रिकेचे तारीफ करणें अगदीं योग्य आहे. येणें प्रमाणें व्हाईसराय साहेबांचें मत असल्या मुळें इंग्रज सरकारच्या काश्मीरसंस्थानांतील कामदार लोकांनीं एक मोठी अजब युक्ति योजिली तेणेंकरून महाराजांस अडचणींत धरून त्यांच्या तोंडांतून कांहीं वाक्यें काढून घेतलीं व त्या वाक्यांचा आपणाला अनुकूळ असा अर्थ करून घेऊन महाराजाची योग्य अशी व्यवस्था लाविली काय ही युक्ति! आजपर्यंत आमच्या सरकारानीं जी कांहीं कारस्थानें केलीं त्यांतीलच हे एक आहे. अमृतबझार पत्रिकेनें हें जर कृष्ण कारस्थान बाहेर काढलें नसतें तर सरकारचें करणें अगदीं गैरत नव्हते असें कोणीही म्हटलें नसतें येणेंप्रमाणें आंत एक असून त्याला नीतीचे निराळेंच बाह्य स्वरूप देऊन अशीं राज्यें खलास करण्यापेक्षां आपलें खरें स्वरूप दाखवून जर सरकार आपली महत्वाकांक्षा तृप्त करील तर आम्हाला फारसें दुःख न होतां कांहींसा आनंद होईल.

आम्ही हिंदुस्थानवासी लोक सरकारच्या कार्बाज असतांना त्यांना असें करण्याचे काय बरें कारण? त्यांना असें पायाजाल पसरण्यापेक्षां जर खरें कारण दाखवून काश्मीर प्रांत काबीज केला असतां तर निदान आज आम्हांला मळतेंच सांगून आम्हाला फसविल्यामुळें जें दुःख वाटतें आहे तें बरेंच अंशी कमी झालें असतें. व सरकारच्या म्हणण्यांत व करण्यांत फरक नाहीं व सरकार अगदीं निष्कपटी आहे सत्यवचनी अशी आमची पूर्ण खात्री झाली असती. आजकाल बड्याबड्या कामदार लोकांच्या गोष्टी ज्या निदर्शनास येत आहेत त्यावरून सरकार किती निष्कपटी आहे व त्याच्या बोलण्यावर हिंदुस्थानच्या प्रजेनी भरंवसा ठेवण्यापूर्वी विचार करीत जावा. किंवा आपले न्यायी सरकार सांगतें तें सर्व खरें असें समजून त्यांजवर अगदीं निश्चिंत भरंवसा ठेवीत जावा याबद्दलच विचार सहजच आमच्या लोकांच्या मनांत उत्पन्न होणार आहे. हिंदुस्थानची प्रजा इंग्रेजी अमलाखाली सुखी आहे व हा अम्मल चिरकाल रहावा अशी आमची इच्छा आहे. परंतु सरकारच जर आपलें वर्तन असें ठेवील तर मग सरकारचा दोष म्हणण्यापेक्षां आमचेंच कम नशीब ह्मटलें पाहिजे.

वरील कारस्थान बाहेर आलें असें पाहून आमच्या सरकारला आपल्या कृत्याचा पश्चाताप न होतां मोठा राग आला आहे व रागाच्या भरांत एक कायदाही प्रसिद्ध करण्यांत आला आहे. तो असा कीं जो कोणी सरकारी कामदार सरकारची गुप्त बातमी बाहेर काढील किंवा एखाद्या सरकारी पत्रकर्त्यास कळवील तर तो पांच वर्ष पर्यंतच्या सक्त मजुरीच्या शिक्षेस पात्र होईल. तसेंच जो कोणी पत्रकर्ता अशी बातमी देण्यास कोणा सरकारी नौकरास उत्तेजन देईल किंवा विनंती करील तोही याच शिक्षेस पात्र होईल काय दा वाईट आहे असें कोण म्हणेल परंतु काय द्याचा हेतु पूर्णपणें सफल होण्याकरितां आणखी एक कलम पाहिजेल आहे तें असें कीं जो कोणी सरकारी नौकर सरकारी कागदांत एक मजकुर असून त्याला अन्यस्वरूप देऊन लोकांची समजूत घालील तोही वरील अगर दुसऱ्या एखाद्या शिक्षेस पात्र होईल. हे वरील कलम घातलें ह्मणजे कायद्यांत उघड दिसणारा पक्षपात दूर होईल असे कायदे करण्यापेक्षां ज्या कारितां हे कायदे करावयाचे तीं कारस्थानेंच बंद करून धडधडीत रीतीनें जे काट करावयाचे ते जर आमचे न्यायी सरकार करील तर बरें होणार नाहीं काय आह्मी मोठें न्यायानें राज्य करतों आहों नीतीला आह्मी पूर्ण मान देतों आहों असें ह्मणून कारस्थानें चालण्यापेक्षां आह्मी राज्यकर्ते आहों आह्मीं हवेतें करूं असें ह्मणणें आह्मांला कांहीं विशेष दुःखदायक होणार नाहीं.

## प्रोफेसर जिनसिवाले यांनीं घातलेली धर्म संबंधीं समजूत.

येथवर आमच्या धर्मांत परमेश्वर एक आहे ही कल्पना नवी नाहीं, अनेक देव ही कल्पना कशी उत्पन्न झाली, देवांचे ठायीं जार वगैरे जे पुराणांत आरोप आहेत व ज्यांच्या आश्रयानें इतर मंडळी आमच्या धर्मावर व देवावर तोंड सोडतात, ते आरोप कसा गैर समजामुळें आले वगैर गोष्टींच्या संबंधानें विवेचन झालें. आतां धर्मावरची श्रद्धा उडविण्याचीं कारणें थोडक्यांत सांगू. ही श्रद्धा अशजनांत बिलकुल कमी झालेली नाहीं. त्यांचे ठिकाणीं ती जास्त जरी नसेल तरी असावी त्या मानपेक्षां किंचित देखील कमी नाहीं. ज्यांनीं पंढरपुरचे वारकरी पाहिले असतील त्यांना ही गोष्ट चांगल्या रीतीनें सहज समजेल ज्यांना इंग्रजी भाषेचा व तिच्याद्वारें संस्कृताचा संस्कार झाला आहे त्यांचे ठायीं हा अभाव उघड दिसून येतो. पुणेंत व इतर ठिकाणीं जे मंत्र योजिले आहे तें अर्थाच्या धारणानें योजिले नाहींत. "अक्याय स्वसमेतुनें इत्यादि" मंत्र ह्मणून "पयः स्नानं समर्पयामी" असा संकल्प करतात. वरील मंत्रांत दुधाचे संबंधानें अवाक्षर सुद्धा नसून केवळ सोमवल्लीच्या संबंधाचे वर्णन आहे. तसेंच "चंद्रमा न सोनाता इत्यादि" मंत्र ह्मणतात व नैवद्य समर्पण करितात. येथेंही कृती व मंत्र यांचा मेळ पडत नाहीं. वरील गोष्टी ज्यांना कळतात त्यांनीं तंत्र व मंत्र यांची जुळणी नसल्यामुळें उभयताचाही त्याग केला आहे ह्मणजे नारळावरील कवठी कठीण आहे ह्मणून आंतील खोबरें ही असेंच असेल असें समजून सर्व नारळ फेकून दिल्यासारखें हे आहे. वस्तुतः ज्यांत विचार करण्यास साधनें आहेत. जे आपणास विद्येचा संस्कार झाला आहे असें समजतात त्यांनीं वरील कठीण करवंटीचा त्याग करून आंतील उत्तम अर्थ खोबऱ्याचा स्वीकार केला पाहिजे. ते जर न करतील तर फार शोचनीय स्थिती आहे. या संबंधानें विशेष जबाबदारी पुढारी मंडळीवर आहे.

पुढारी मंडळीनें ही जबाबदारी संभाळतांना आपला पक्ष सबळ करण्या करितां सत्यालाप करितां कामा नये तथापि नेहमीं असा प्रकार दिसण्यांत येतो. एक पुनर्विवाहाची गोष्ट घ्या. ही चाल पाडणें दुःख दायक आहे असें कोणीही म्हणत नाहीं. ही सुरू होणें इष्ट आहे व आम्हास पाहिजेही आहे वगैर गोष्टी लहाना पासून थोरापर्यंत अज्ञाला पासून वृद्धा पर्यंत मान्य आहेत. आतां सर्वांस हें मान्य असून प्रचारांत ही चाल कां येत नाहीं यास अनेक कारणें आहेत. या संबंधानें आमच्या पुढारी मंडळीच्या हातून मोठी चूक अशी होत असावी कीं ते ही चाल प्रचारांत आणण्या साठीं आपला पक्ष प्रबल करण्या करितां ही चाल पूर्वीही होती असें सिद्ध करून दाखवितात. व ही चाल होती यास व आतां ही पुन्हां चाल चालू करण्यास वेदांत आधार आहेत अशी प्रमाणें दाखविण्याचे साहस करिता. असें करण्यांत यांचा हेतु मुळींच चुकत नाहीं. तथापि चांगला इष्ट हेतु साधण्या करितां देखील सत्यालाप करितां कामा नये तो येथें होत आहे. वस्तुतः पुनर्विवाह करण्यात वेदांत फारच थोडे आधार आहेत व त्यासही उलट वाक्यें अढळतात. तेव्हां विनाकारण वेदाचें नाव सांगून समाजाची समजूत घालण्याचा प्रयत्न करणें म्हणजे निवळ खोटें बोलून समाजास फसविणें होय. हे धाडस नव्हे काय? पुढारी मंडळीनें होता होईल तितके सत्याचें अवलंबन केलें म्हणजे त्याचे मागोमाग येणारा समाज सहजच तसें करण्यास प्रवृत्त होणार. खऱ्या गोष्टी सांगून जी मनाची पक्की समजूत घालता येते तितकी खोट्या गोष्टीनें घालतां येणें शक्य नाहीं. ही खोटी समजूत क्षणभर मनावर अंमल करील तथापि तो अंमल निरंतर राहणें बिलकुल संभवनीय नाहीं करितां पुढारी मंडळीवर व मग अर्थात त्यांच्या अनुयायावर सत्यपक्ष नेहमीं धरणें हें यश प्राप्तीस जरूरीचें आहे.

प्रोफेसर जिनसिवाले यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दे सांगितले. त्यांनीं ज्या गोष्टी हें मनावर पूर्ण बिंबण्याकरितां सांगितल्या त्यांतील एक दोन गोष्टी आह्मी सांगतों. खालीं दिलेल्या पहिल्या गोष्टी वरून प्रत्येक मनुष्याला आपली योग्यता समजली तर किती समाधान व फायदा आहे हें कळून येईल. एकदां आपल्या राणीसाहेबांनीं भर दरबारांत बोलून दाखविलें कीं तुह्मी सर्वजण मला इतका बहुमान देतां हें सर्व ठीकच आहे. तथापि मी कोण आहे हे मी पक्कें जाणून आहे. कल्पना करा राज्यव्यवस्थारूपी एक नौका आहे. त्यांतील मी शीड नाहीं. सुकाणु नाहीं. नाळ नाहीं तर मुख्य डोलकाठीवरील फडकणाऱ्या निशाणावर जें चिन्ह असतें तें मी आहे. दुसरी गोष्ट राणीसाहेबांच्या पतीची. या गोष्टीवरून पुढारीमंडळीचे अंगी प्रसंग विशेषी कसें धोरण पाहिजे हें कळेल. ज्यावेळीं युरोपखंडांत चोहोंकडे राज्य क्रांतिची धामधूम सुरू झाली त्यावेळीं फ्रांस वगैरे देशांचे राजे इंग्लंडांत पळून आले. तेव्हां इंग्लंडांत हा मजूरदारांना वाटूं लागलें कीं आपण विनाकारण राणीच्या खर्चाचा बोजा कां सोसावा. आपणाला ही अशीच धामधूम करून इतर देशाप्रमाणें मोकळे झालें पाहिजे याविषयीं विचार करण्याकरितां अमुक ठिकाणी सभा भरेल करितां सर्व मंडळीनें तेथें अमुक वेळीं जमावें असें जाहीर केलें. व जिकडे तिकडे जाहिराती वाटल्या ही बातमी राणी साहेबांचे भ्रतारास कळली. हे जरी कारभार पहात नसते तथापि राणीसाहेबांस वेळोवेळीं योग्य सल्ला देत असत. यांनीं मुख्य प्रधानाचें विचारानें असें ठरविलें कीं आपण ही त्या सभेस जाऊं व कसें ही करून तुह्मी मला अध्यक्ष नेमण्याची तजवीज करा. नेमल्या दिवशीं हे सभेस गेले. तेथें सभामंडपांत शिरतांच आपली टोपी काढून प्रत्येकाचे हातांत हात घालून सलाम करीत करीत आपल्या जागेवर जाऊन बसले. हा सर्व प्रकार पाहून बहुतेकांना वाटूं लागलें कीं आपण चार आणे रोज मिळविणारे मजूर असून आपल्या यजमानानें आपणांस इतका मान दिला तेव्हां राणी विरुद्ध जाणें ह्मणजे पाजीपणा आहे. नंतर जीं भाषणें झालीं ती सर्व यजमानाच्या स्तुतीपर; येणें प्रमाणें आलेलें विघ्न टळलें.

## बिरार हॉर्स अॅन्ड कॅटल शो.

वऱ्हाडांतील वार्षिक घोड्यांचे व इतर गुरांचे प्रदर्शन येत्या २१,२२ व २३ तारखेस उमरावती येथें मे० कमिशनर साहेब बहादूर यांचे अध्यक्षते खालीं अंबा यात्रेचे संबंधानें होईल. ६५० रुपयांचीं अगर या पेक्षां जास्त रुपयांचीं इनामें वाटलीं जातील. आणि खरोखर प्रदर्शना करितां आणिलेल्या

जनावरास प्रदर्शन होई पावेतों फुकट मवत दिलें जाईल.

J. Cooper Exquire.
Veterinary Superintendent
H. A- D.
Honorary Secretary
Berar Horse and Cattle Show.

OURSELVES.

We request our subscribers will allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our office will be closed for the Holidays there will be no paper issued next week.

The Berar Samachar

MONDAY OCTOBER 21, 1889.

## THE WONDERFUL STATE DOCUMENT.

Some of the prominent Native journals of this country have been taken by surprise at the publication of a state document relating to Cashmere. What surprises these journals is that the Government of India and the Government at home entertain some plans and schemes of retaining their hold upon India, inspite of the long cherished desire of Russia to invade India. The state document that has been recently published reveals nothing new besides this fact that our Government is not neglecting its own interests in this far East. To our mind there is nothing in this document to startle or surprise. It is a document written by one who has been entrusted with the duties of guarding the interests of the Indian Empire on the frontier to his master the Viceroy of India. Englishmen as is well known all over the world are very practical people. Statesmen among them must be so, as a matter of course in a prominent degree.

Such being the case, the startling and surprise of the native journals at the publication of the document reveals the unquestionable fact that the natives are quite unfit to discharge the duties relating to foreign-policy of any government. This is one side of the question.

The actonishment of the Native public at the contents of the docket bears an important lesson which may as well be well learnt by the Government of India and the Government of Her gracious majesty in England. That lesson is that the Natives of India have complete confidence in their rulers. The tie of relationship between the ruled and the rulers is firmly fixed in the hearts of the Indian people. The Indians do not care to have any other rule over them than the present one to which they have become so greatly attached. They are loyal to Her Majesty the Queen Empress in the inmost of their hearts. What they desire is that their rights as well as the rights of their princes should be conscientiously preserved without the least molestation. The dominions of their princes should not be taken away from them. The [e]xercise of their powers as far as it is con[siste]nt with the security of the interests of [the] Empire should be left untouched. Ad[vic]e and counsel in matters of internal ad[mi]nistration may no doubt be tendered to [t]hese princes but any other interference beyond this is highly detested. If such are the demands of a loyal people and if their ruler has pledged her word that whatever be the rights of the Natives of India, be they princes or common people, they shall be respected scrupulously, these demands supported as they are by their ruler's declaration, ought to be attended to with care and attention.

## DISCIPLINE AND MORAL TRAINING IN SCHOOLS AND COLLEGES IN INDIA.

Continued from our 7th October 89.

The Governor-General in Council considers that it is desirable to remodel the rules of other provinces on the basis of the rules inforce in Bengal and the North-western Provinces and Oudh (which are printed as an Appendix to this Resolution.) The Educational Department can enforce such rules in all Government Colleges and schools, and their adoption can be made a condition of a grant-in-aid from Government; but it is equally essential that they should be adopted in unaided institutions. The only effectual way of securing this is to invite the co-operation of the University, as has been done in the North-Western Provinces. When the Provincial rules have been revised and determind, the universities should be invited to assist towards securing their adoption in unaided institutions by denying affiliation to such as do not adopt them; and the Governor-General in Council earnestly trusts that, when invited, the universities will throw the weight of their great influence into the scale of order and discipline.

11. In the opinion of the Governor-General in Council the provision of efficient training schools and Colleges for teachers is one of the most effective means avilable to Government for improving discipline and counteracting the tendency to irreverence and contempt of authority and he has accordingly considered with special attention the opinions which the various local authorities have expressed upon this important subject.

In Madras there are at present arrangements for training in the Government and public normal schools, about one third of the teachers required for colleges and secondary schools and three quarters of those required for primary education. The quality of the training however, needs improvement; and this question, as well as that of extending the training system so as to provide teachers for all schools, is engaging the attention of the Madras Government. The University also holds an examination for the degree of Licentiate in teaching. The Bombay Govt. is ready to provide an adequate supply of training schools for primary institutions, but considers that the cost of training colleges for preparing masters for high and secondary schools would be prohibitive, and that the need for such institutions is not great. It admits, however, that teachers are now appointed to schools without any real knowledge of the art of teaching, and proposes to establish normal classes at the large high schools, and to compel candidates for service in the department to attend them. The Bengal Government, on the ground that the education of teachers is costly and that the educational grant is insufficient to adequately provide for elementary and technical education states that there is no present prospect of funds being avilable for the general introduction of a system of training teachers for their profession in special institutions. His Honour the Lieutenant-Governor believes that training in the art of teaching should be given in addition to and not as a substitute for, the education of the University; and urges that there is no want of masters trained in the usual English method at the University, and that it is on this ground and on the ground of expense undesirable to import English masters for definite periods. His Honour is prepared, should the Government of India wish it, to start one training school at a cost of about Rs. 10000 a year for English teachers at high and middle schools, Government or aided. Sir Steuart Bayley also expresses himself in favour of a system of granting certificates in the art of teaching in preference to an extension of normal schools; the possession of such certificates to be made a condition of employment in Government and aided schools. In the North-Western Provinces and Oudh considerable attention had been devoted to the training of masters, and a normal school for teachers in primary and middle institutions is located at the head-quarters of each division, It is found, however, that present arrangements do not adequately provide for the training of masters for the higher class of schools, and it is proposed to establish a central institution for this purpose. In the Punjab there is a central training college at Lahore for masters in secondary schools. No one can be employed in any board school, whether secondary or primary, who does not hold a teacher's certificate. The amount of grants to aided schools, is to a certain extent, dependent on their having certificated teachars. In the Central provinces sufficient provision for training vernacular teachers is said to exist. The Anglo-Vernacular teachers are supplied by the colleges. The Chief Commissioner is in favour of establishing normal classes for Anglo-Vernacular masters and arranging for examination for certificates in teaching, and he has under consideration suggestions for the improvement of the normal schools at Jubbulpore and Nagpore. In Burmah, where education has a strong religious character, adequate arrangements for training masters for primary schools exist, and the Chief Commissioner is working out a scheme for attaching to existing schools department for the training of middle class teachers. The supply of trained teachers for secondary schools in Assam must be procured by indenting on normal schools in Bengal when established, or by sending teachers from Assam for training in those schools. In Berar arrangements have been made for training teachers for primary schools, but the secondary schools are not numerous enough to justify a special training institution, and masters for these schools are procured from Bombay colleges and high schools.

12 The Governor-General in Council desires to give emphatic expression to his view that it is of little use to spend money on schools if the teachers are either inefficient or unable to maintain discipline or a healthy moral tone in their schools. The chief qualification required in a school master are capacity to maintain discipline, and capacity to convey instruction. The first of these qualifications implies firmness and ability to govern, the capacity of inspiring enthusiasm in his pupils and securing their co-operation, and earnestness, sympathy, and insight into character. In the opinion of the Governor General in Council the possession of these qualities cannot be tested merely by an examination such as is suggested by the Government of Bengal. The capacity to convey instruction comes more within the range of an examiners power to test. But this is the lower of the two sets of qualifications which go to make up the model schoolmaster; and an examination is an admittedly inferior way of ascertaining a teacher's ability to convey instruction, his ability to simplify a subject, or his skill to fix the attention and draw out the intelligence of his class. For these reasons the Governor-General in Council considers it impossible to secure good instructors with-out such a process of selection and preparation as normal school training gives, and is unable to regard the adoption of examination in the art of teaching as an adequate substitute for good normal schools. His Excellency in Council, therefore deems it essential that each local Government should accept the responsibility of providing means for training teachers for each grade of schools— primary, middle, and high— as a first charge on the educational grant.

(To be continued.)

सुट्टी.—पुढील आठवड्यांत दिपवाळीचा मोठा सण आहेतर आमचे प्रियवाचक सालाबाद प्रमाणें एक आठवडाभर सुट्टी देतील अशी पूर्ण आशा आहे. म्हणून येत्या तारीख २८ रोजीं वर्तमान पत्राचा अंक निघणार नाहीं.

## वऱ्हाड

हवामान:—गेल्या आठवड्यांत येथें बराच पाऊस पडला. रोगराई कांहीं नाहीं. रब्बीची पेरणी कित्येक ठिकाणीं झाली.

मे० हेअर सा० डे० क० हे ह्या आठवड्यांत दवऱ्यावर जाण्यास निघणार आहेत.

मि० ड्रौडन सा० कमिशनर पुढील महिन्याचे पहिले आठवड्यांत रजेवरून परत येतील.

कर्नल मेकेंझी सा० जु० क० हे दोन तीन महिन्याचे रजेवर जाणार आहेत व त्यांचे रजेंत कर्नल स्पान्स्की सा० त्यांचें काम पहातील असें ह्मणतात.

मि० समसुद्दिन अ० क० शिंकदराबाद यांनीं एक महिन्याची रजा घेतल्यामुळें अ० क० मि० एदलजी नेमजी यांचे शिंकदराबादेस बदली झाली व त्यांचें जागीं रा० बा० पुरुषोत्तमराव ए० अ० क० यांस, त्यांचे स्मा० का० कोर्टाचे नज्जाचे जागीं रा० रा० वासुदेवरावजी पिसोळकर ए० अ० क० यांस व त्यांचें जागीं मि० एदलजी संजाना क्ला० आ० की० यांस नेमले

मि० समसुदिन हे नंतर वऱ्हाडांत येतील असें ह्मणतात.

मि० इस्मायल यांची कमिशनर आफिसांत बदली होऊन त्यांचे जागीं रा० रा० बाळकृष्ण बळवंत मुळें त्यांची नेमणूक झा ल्याप्रमाणें ते गेल्या आठवड्यात आपल्या कामावर रुजू झालें.

ता० २१ आक्टोबर पासून मे० आर आवर्ड सा० यांचे पुढें खालीं लिहिलेले खटले चालणार आहेत:—

आरोपी गुजी मर्द मारुती राहणार बोधल हिने आपला नवरा मारुती याचा खून केला आहे असा आरोप तिजवर आहे.

आरोपी पुजासा राहणार देऊळगांव राजा यानें एका ८ वर्षांच्या मुलाचा सोन्याच्या हसळी करितां खून केला आहे.

गंगी व शिवाय दोन इसम राहणार सेलापूर बु० तालुके मलकापुर यांच्यावर एका ७ वर्षांच्या मुलाच्या अंगावर कांहीं रुप्याचे डागिने होते त्या करितां त्याचा खून केल्याचा आरोप आहे.

जामोद येथें राहणाऱ्या कोणी गंगो नांवाच्या मनुष्यनें एका ८-९ वर्षांच्या मुलाचा खून चांदिच्या डागीन्या करितां केला असा त्याजवर आरोप आहे.

हैद्राबाद सरकार मंकस जाणार असें कळतें.

## वर्तमानसार.

बेळगावकडे टोळधाड आली आहे.

दिल्लीस वर्तमानपत्र निघणार.

[illegible] कमिशन बेडे हाऊन पुष्कळ [illegible] झाले. हाके दिवस त्याच्या रिपोर्टी [illegible] होता. अमेरिका स्टेट सेक्रे [illegible] झाल्याचें दिसतें कीं या [illegible] कांहीं नवीन कायदा करण्याची अवश्यकता नाहीं. एतद्देशीय लोकांस अ[illegible] देण्याच्या तजविजी येथल्या येथें [illegible] आहेत. पहावें सरकार कोण [illegible] तजविजी योजतें तें.

[illegible] इंडियाचा सिमल्याचा बातमीदार असें लिहितोः "भाझी पूर्वीची मामलेदारासंबंधाची बातमी अगदीं खरी आहे. पेन्शनीची मुदत भरे तों पर्यंत त्यांना भर पगार मिळणार इतकेंच नाहीं तर ते नौकरींत असल्याप्रमाणें त्यांच्या पगाराची बढती होत जाणार" असें खासें!

९६ हजार केरोसिन तेलाची पिंपें जळून तीन कोट रुपयांचें नुकसान झालें; तथापि जर्मन व्यापारी तोंच व्यापार करीत आहेत.

एका प्रसिद्ध नटीनें तीस दिवस उपवास केला त्याचें कारण शरीर कृश करावें हें होतें कारण स्थूल स्त्रियांस चांगलें नाचतां येत नाहीं.

भावनगर येथें महारुद्र होणार आहे. या कामास सरकारातून ३ लक्ष रुपये खर्च होणार आहेत. अशा कामीं इतकी रकम खर्च होणें रास्त नाहीं बांकी मेजवान्या आणि डाल्या याच्यापेक्षां हा खर्च बरा.

मुंबईत एक युरोपियन बाई हिंदु स्त्रियांचा पोषाख वालते व तिनें हिंदु धर्म स्वीकारला आहे असें इंडियन मिररवरून समजतें. ही बाई कोण?

भामटे लोकांस तुरुंगांत न पाठवितां त्यांचा लिलाव करून त्यास जो कोणी विकत घेईल त्याचे घरीं त्यांनीं दिवस काढावे अशी एका ठिकाणीं चाल आहे. निसुरी येथे नुकताच लिलांव झाला त्यांत चौघे भामटे विकण्यांत आले. तिघांची पांच पांच रुपये किंमत आली. चौथा दोनच रुपयांस गेला.

रात्रीची स्वप्नें पडूं नयेत यासाठीं जेवल्या बरोबर लागलींच निजूं नये.

मनोतीचा भाव वाढल्यामुळें रेलवेच्या संबंधानें सरकाराला १ कोट तीन लक्ष रुपये जास्ती भरावे लागतात.

"न्यायचक्षु" मासिकपत्र गोंव्यास निघूं लागलें.

रशियांतील उपाध्ये जपान देश कावीज करूं पाहत आहेत. रोमन क्याथलिक पाद्री ही जीवापाड मेहनत करीत आहेत. पाहावें कोण डाव जिंकतो तो.

मनुष्याचें चामडें कमाविण्याची खटपट जर्मनींत चालली आहे

अमेरिकेंत एक गाय रानांतून चरून घरीं आली ह्मणजे तिच्या सडांत दुधाचा एकही थेंब नसे. यावरून कोणी तरी तिचें दूध चोरून काढितात अशा संशयावरून मालकानें पाळत ठेवली; तों एक काळा भुजंग येऊन तिच्या मागच्या पायाला वेळखा घालून दूध पितांना त्यानें पाहिलें. गाईच्या मालकानें त्यास गोळी घालून ठार मारलें, त्यामुळें गाईस वेड लागून ती मरण पावली.

दक्षिण आटलांटिक समुद्राची खोली ४० २३६ फूट अथवा पावणेनऊ मैल आहे इतका खोल समुद्र दुसरा कोणताच नाहीं.

शिकागी येथें दररोज ११,००० गाई, मेंढ्या ९,१००, १३,६०० डुकरें स्वाहा होतात. तसेच तेथें १० हजार टन दांत कोरण्याच्या काड्या मशीनांत तयार होतात. डूक बनत करून घेतात. यंत्रांत एकीकडे डुकराच्या चरब्यांच्या चरब्या येऊन पडतात. एकीकडे लोणी होऊन एका नळीनें बाहेर पडतें व व ताक दुसऱ्या नळीनें जातें. के०

बेळगांव जिल्ह्याच्या पूर्व व दक्षिण भागीं टोळ येऊन त्यांनीं भाताचीं शेतें खाऊन फडशा केली. शेतांतून बी सुद्धां निघावयाचें नाहीं.

सन १८८४ पर्यंत हिंदुस्थानासाठीं विलायतेस काढलेलें पौंडांचें कर्ज ५,४८,८४,००० पौंड होतें, व त्याच्या पुढें आजपर्यंत काढलेलें २७,७७,००० पौंड कर्ज आहे. ह्या एकंदर कर्जाबद्दल सन १८८८ सालीं हिंदुस्थानच्या खजिन्यांतून ३,९२,००,००० रुपये व्याज विलायती व्यापाऱ्यांस द्यावें लागलें.

हाडांचा चूर करण्याची एक गिरणी थोड्या दिवसांत कलकत्यास स्थापन होणार आहे. हाडांच्या भुग्याचें खत फार उत्तम. असतें व तें जमिनीस घातलें असतां पिक अत्युत्तम येतें. पिकाच्या रूपानें जमिनींतून जी सत्वें निघतात तीं हाडांच्या खतानें पुनः जमिनीस मिळतात म्हणजे जमीन निकस होत नाहीं.

सन १८८१--८२ सालीं हुंडीच्या चढत्या भावानें हिंदुस्थानचे ३ कोट रुपये नुकसान झालें. पण १८८९।९० सालांत हुंडणावळी प्रित्यर्थ ८ कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत. हिंदुस्थानची कशी भरभराट होत आहे पहा! ! !

कृत्रिम रेशीम.--तुती पासून कृतीनें रेशिमाचे तंतू काढण्याची युक्ती एका कुशल पुरुषानें काढली आहे. रेशमी किड्याच्या रेशमा प्रमाणें हे रेशिम असतें असें म्हणतात.

अमेरिकेंतील सेंट लारेन्स नदीस क्विबेक येथें दोन कोट रुपये खर्च करून एक पूल बांधणार आहेत त्याची लांबी ३४००० व रुंदी २४००० फूट असणार. दोन मधल्या मधलें अंतर १४४२ फूट राहून पुलाची उंची ४०८ फूट करणार म्हणजे मोठ्या आगबोटी ही त्या खालून सहज जातील.

खानेसुमारीचा खर्च-१८९१ मध्ये होणाऱ्या मनुष्य गणतीस १ कोट रुपये खर्च लागणार व तीन वर्षांच्या खर्चांतून तो काढणार आहेत. १८८१ च्या खानेसुमारीस इतका खर्च लागला होता.

इंडियन एजन्सीचा खर्च--विलायतेस स्थापन झालेल्या इंडियन एजन्सीस १८८८ सालीं १७०० पौंड खर्च झाला व १८८९ साला २५०० पौंड खर्च होणार आहे.

कारखाना ह्यामायो जुनी सक्कर आणि गरीबबाद तालुक्यांत टोळांनीं पिकाचा अतीशय नाश केला. शेतांत हिरवळ राहिलें नाहींच, पण झाडावर हिरवें पान ही त्यांनीं राहूं दिलें नाहीं. शु० सू०

रेल्वेवर देखरेख करण्याकरतां एक कायमचा कमिशनर ठेवण्याचें कलकत्यास घाटत आहे. गांधाची बंदी पुढें ढीड इजायचा!

मिस्टर सिडहसच्या बापाची यत्ता २५ वर्षें करण्यांत आली असें ह्मणतात.

चीन वगैरे देशांतील लोक बंदूक खातात; तसे इंग्लंडांतल्याही कांहीं प्रतिष्ठित लोक बंदूक खातात केंब्रिजशायरांत तर त्यांची मोठी आस्था आहे. अमेरिकेंत तर कहीं लोक मोठाल्या दुकदुकी बुट्ट्या तयार करून त्यांत हजारों बंदूक 'पिकवतात,' आणि त्यांच्या तपाच्यावर पैसे मिळवितात.

टा० अ०

— मुंबईची मुनसिपालिटी २५ लक्ष रुपये लंडनचे व्यापाऱ्यापासून शेंकडा ५ रुपये व्याजावर कर्जाऊ काढणार आहेत.

— टेम्स नदीतून ३-४ मैल लांबीचा एक विवर मार्ग खोदणार आहेत. मध्यंतरीं ६ स्टेशनें होणार असून उतारूंस तेथें उतरविण्याची सोय केली जाईल. यांत मुख्य आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं व्यापार विद्युतचे साह्यानें चालविणार आहेत.

— प्रिन्स अलबर्ट व्हिक्टर हे राजपुत्र हैदराबाद शहरीं एक आठवडा राहणार आहेत व त्यांचे संबधानें निजाम सरकार ५ लक्ष रुपये खर्च करणार आहेत.

सक्कर व कात्री ( सिंध ) येथील शेतकऱ्यांत विकण्यासाठीं नरल बरीत व सांतपुरा या गांवच्या लोकांनीं अपहृत बायकांनीं भरलेला एक नांव पाठविल्याचे पोलिसास समजलें आहे.

भविष्यकरी-- या नांवची वनस्पती मेक्सिकोमध्यें उगवते, हिच्या योगानें माणसाला झोप येते, व त्या झोपेंत विचारलें सांगतां येते व सांगितलेलें कामही करतां येतें!!

मद्रास इलाख्यांतील तीनवलो येथील एका सबमाजिस्ट्रेटानें ६५००० रुपये किंमतीचें एक पार्सल विमा उतरून टपाल मार्फत बाहेर पाठविण्याकरितां रवाना केलें, परंतु ते परत येऊन त्याजवर "सदरहू मालक मिळत नाहीं." असा शेरा मारला होता, सदर माजिस्ट्रेट कडे हें पाकीट परत आल्यावर त्यांस कांहीं संशय आला, ह्मणून पोस्टमास्तर जनरलच्या समक्ष ते फोडून पाहतां आंत घातलेली किंमतवान नाणी नसून तांब्याची वगैरे हलकी नाणी भरलेली दिसली, यावरून मार्गांत टपाल खात्यांतील एखाद्या नोकरानें ती काढून घेतली असावी असा त्यानीं तर्क केला. परंतु पोस्टमास्तर जनरल म्हणतात, सदर माजिस्ट्रेटांनीं पोस्टास टकविण्या करितां हिरे माणिक वगैरे न घालतां तांब्याची वगैरे हलकी नाणीं घातली असावी. शिवाय त्यांनीं विगलपटण येथील माजी स्टेटचे मार्फत फिर्यादीची व त्यांचे आप्तइष्टांची एकंदर मिळकत दोन महिने जप्त करून ठेविली होती. यावरून फिर्यादी माजिस्ट्रेट यांनीं ६५००० रुपयांची मूळ किंमत व दुसऱ्या नुकसानीचा खर्च ५००० एकूण ७०००० रुपयांची स्टेट सेक्रेटरीवर मद्रास हाय कोर्टांत दावा केला आहे.

— गोखरूचें पानें घेऊन पाण्यांत पांच सात वेळ बुडविलें असतां पाणी फार दाट होतें असें म्हणतात.

— तंख्याभिळाचा मुकदमा कांहीं दिवस तहकूब ठेवण्यांत आला आहे. आंदमनसहून कांहीं साक्षीदार यावयाचे आहेत, ते आल्यावर चौकशीस आरंभ होईल.

गेल्या ३४ वर्षांतल्या लढायांत प्राणहानि— त्या लढायांत एकंदर निदान २२३५००० माणसें मेलीं. क्रिमियाच्या लढाईंत ७,५०,००० मेलीं. इटलीच्या लढाईंत ४५,००० मेलीं. डेन्मार्कच्या लढाईंत ३,००० मेलीं; अमेरिकेंतल्या आपसांतल्या लढाईंत उत्तर वाल्यांची २०,८०,००० मेलीं; दक्षिण वाल्यांचीं ५,२८,००० मेलीं; आस्ट्रिया आणि प्रशिया यांच्या लढाईंत ४५,००० मेलीं; फ्रान्स आणि जर्मनी यांच्या लढाईंत फ्रान्साकडची १,५५,००० मेलीं, आणि जर्मनी कडची ६०,००० मेलीं; तुर्कस्थान आणि रशिया यांच्या लढाईंत २,५०,००० मेलीं; दक्षिण अफ्रिकेंतल्या लढाईंत ३,०००० मेलीं; आफगाणिस्थानच्या लढाईंत २५,००० मेलीं; मेक्सिको आणि कोचिन चायनां यांच्या स्वाऱ्यांत ६५,००० मेलीं; आणि बलगेरिया व सर्व्हिया यांच्या लढाईंत ३५,००० मेलीं किती माणसें मेलीं हीं! हीं जर इतकीं रोगानें मेलीं असतीं, तर लोकांनीं देवाला किंवा दैवाला दोष लावून किती शोक केला असतां बरें! पण, ही सगळी मंडळी राज्य लोभाच्या मध्यस्थानीं पडली, किंवा आमच्या राज्यकारस्थानांनीं तीं त्या मध्यस्थानीं पाडिलीं, असें ह्मणावयाचें. तेव्हां आतां कोणच्या नांवानें रडावयाचें! विद्यासंपन्नता दिवसें दिवस पृथ्वीच्या पाठीवर वाढत चालली आहे, असें सगळ्या सुज्ञ जनांचें मत आहे त्या वृद्धीचा हा कां परिणाम व्हावा! विद्या संपन्नता कितीही वाढो. लोभ मी ह्मणतोच आहे.

त्या० सि०

प्रिन्सआल्बर्ट हे विलायतेस जाणार आहेत.

दोघां इंग्लिश पत्रकारावर राजद्रोहाचा आरोप आला आहे.

हायकोर्टांतील रिकाम्या जागेवर आ० तेलंग यांची नेमणूक झाली.

पारीस प्रदर्शनांत डुके व बहिरे यांनीं केलेलीं कामें मांडिलीं आहेत.

कोंबडीच्या आंड्याचें तेल जखमा भरून येण्यास फार उपयोगी आहे.

नेपल्स शहर जवळ नुकतांच आगगाडीचा मोठा अपघात झाला. हजारों मनुष्यें मेलीं.

अं० ल०

रसायनिक क्रियाकरितां लागणारीं यंत्रें युरोपियन लोकांच्या देखरेखीखालीं तयार करून विकण्याचा एक कारखाना कलकत्यांतील कांहीं ग्र्याज्युएटांनीं घातला आहे.

तंख्याभिल्लास शिक्षा—प्रसिद्ध तंख्याभिल्लाची चौकशी जबलपूर येथें चालली होती, तिचा निकाल होऊन त्याला जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा झाली. तंख्यावर एक खुनाचा आरोप होता परंतु तो शाबीत झाला नाहीं.

सर सिमारके हे प्रसिद्ध व हिंदुस्थानचे कैवारी गृहस्थ आज कित्येक वर्षांपासून इंग्लिश पार्लमेंटांत प्रवेश करणेस पहात होते; परंतु साधेना. यांस शेवटीं यश येऊन एक जिन परगण्याचे वतीनें पार्लमेंटांत त्यांचा शिरकाव झाला.

ज०

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास.........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10... 4 a.
Repetition pe line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII    AKOLA MONDAY 4 NOVEMBER 1889    NO. 42

वर्ष २३    अकोला सोमवार तारीख ४ माहे नोवेंबर सन १८८९ इ०    अंक ४२

### गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समइ पतन होते-परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्यांनीं अवलेह घ्यावा. गुंड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

### अन्न पचन होण्याचें औषध.

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं, पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्यांनीं पाचकवडी औषध घ्यावें एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डांक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

### AKOLA MEDICAL & SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

### अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगांची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळांतिणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टीक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याच कलप आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

### बिरार हॉर्स ॲन्ड कॅटल शो.

वऱ्हाडांतील वार्षिक घोड्यांचे व इतर गुरांचे प्रदर्शन येत्या २१, २२ व २३ तारखेस उमरावती येथें मे० कमिशनर साहेब बहादूर यांचे अध्यक्षते खालीं अंबा यात्रेचे संबंधानें होईल. ६५० रुपयांचीं अगर या पेक्षां जास्त रुपयांचीं इनामें वाटलीं जातील. आणि खरोखर प्रदर्शना करितां आणिलेल्या जनावरास प्रदर्शन होई पावेतों फुकट गवत दिलें जाईल.

J. Cooper Exqnire.
Veterinary Superintendent
H. A- D.
Honorary Secretary
Berar Horse and Cattle Show.

नोटीस

पेठ देऊळगांव व चिखली वगैरे ठिकाणचे साहू लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं राजे नाजीराव देऊळगांव संस्थानचे मालक हे अज्ञान आहेत त्याचें पालन व त्यांच्या इस्टेटचा वहिवाट आह्मी मातुश्री व आजी राणी अहिल्याबाई साहेब असे उभयतां मिळून करित आहोंत. मागें सावकार लोकास दस्तऐवज वगैरे उभयतांच्या सहीनें करून दिले आहेत अशी वहिवाट ता० ११ ९ ८९ इ० पर्यंत होती या दिवसांपासून राणी अहिल्याबाई साहेब यांनीं आपले गैरकायदेशीर ठरविलेले मुखत्याराचे मार्फतीनें एकट्याचे नांवानें वहिवाट चालविण्याचा सुरू करून अज्ञानाचे व संस्थानचें नुकसान करण्याचें आरंभिलें आहे हल्लीं त्यांचे वय वृद्ध झाल्यानें बुद्धीची स्थीरता राहिली नाहीं पाहिजे तेव्हां पाहिजेतो गैरशिस्त आणि नुकसानीचीं कामें करितात तरी ता० ११-९-८९चे पुढें आमचे संमती वांचून आमचे परवानगी शिवाय एकटे राणी अहिल्याबाई साहेब यांस किंवा त्यांचे तर्फेनें कोणतेही मुखत्यारास नवीन कर्ज कोणी देईल किंवा पूर्वीचें कर्ज रुजूं करून घेईल किंवा कोणता एखादा करार करतील तर त्याजबद्दल संस्थान व अज्ञान जबाबदार होणार नाहीं याचा परिणाम खास खुद्द राणी अहिल्याबाई यांचे जातीवर राहील.

याची पत अशी गैरशिस्त व्यवस्था न करण्यासाठीं राणी अहिल्याबाई साहेब व त्यांचे मुखत्यार यांस पाहूणगाम पाठविली आहे कीं त्यांनीं असें करू नये केल्यास ते खुद्द किंवा राणी अहिल्याबाई साहेब यांचे जातीवर बोजा राहील कळावें ता० १२ माहे सप्टेंबर सन १८८९ इ०

(सही)
घनःशाम त्रिंबक कुळमुखत्यार
निशाणी राव जगदेव राजे
नाजीराव अज्ञान पालनकरणार राणी कोंडाबाई साहेब.

नोटीस

पारवती भर्द रुंजाजी बुगदे राहणार मौजे बरहाडी तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तूं तारीख १७ आक्टोबर सन १८८९ इसवीचे शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रांत नोटीस दिली ती पावली त्यांतील लिहिलेला मजकूर अक्षरशः सर्व खोटा आहे. ह्या नोटिशीपूर्वीं बहुत वेळां व ही नोटीस पावल्यावर तुजला आणण्याकरितां तुझे बापाचे घरीं आह्मी आलों परंतु तुझे व तुझे बापाचे मनांत तुजबद्दल पैसा घेऊन दुसरा नवरा करावा असें आहे ह्याकरितां तूं येण्याचें व बापानें पाठविण्याचें नाकारलें सबब ह्या कामांत तुजला नांदविण्याबद्दल माझी हयगय नसून सर्व हयगय तुझी व तुझ्या बापाची आहे. करितां खर्चाबद्दल मी जबाबदार नाहीं. आतां ह्या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे घरीं येऊन संसार बायकांचे रीतीप्रमाणें करावा नाहींतर ह्या कामीं मजला कायदेशीर रीतीनें काम करण्यास जो खर्च लागेल त्याबद्दल जबाबदारी तुझां उभयतांचे शिरावर नोटिशीचे खर्चांसुद्धां राहील कळावें तारीख २९ माहे अक्टोबर सन १८८९ इसवी

(सही)
रुंजाजी वल्लद येकोजी बुगदे
राहणार मौजे खंडाळ तालुके
आकोट जिल्हा अकोला
निशाणी खुद्द हात गी.

### पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम सस्ती तारीख २९।१०।८९ इ०

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

सिर साष्टांग नमस्कार वि० वि० शेवेसी चार ओळी पाठविल्या आहेत त्यांस सुंदर पत्रीं जागा मिळेलच. अलिकडे हवेंत बराच थंडावा आहे. मागील आठवड्यांत पावसानें बरीच धामधूम केली. गांवांतून हिवतापाचा आजार बराच पसरला आहे.

दिवाळीचा सण आनंदानें झाला. येथें दिवाळींत मनुष्यांचे अंगावर नोट फटके उडविण्याची फार वाईट चाल आहे ती बंद करण्याकडे गांवच्या मुख्यांनीं लक्ष्य दिलें पाहिजे.

येथील सरकारी मराठी शाळेची वार्षिक परीक्षा चालूं महिन्याचे १८ वे तारखेस झाली. सुमारें एकीच महिने अगाऊ झाली, तरी शाळेचा रिझल्ट फार उत्तम झाला. मास्तरची शाळेची दप्तरची वगैरे स्वच्छता व टापटीप पाहुन साहेब बहादूर फार खुष झाले हे लिहण्यास फार आनंद वाटतो.

मास्तरानें मुलांकडून कसरत वगैरे नानाप्रकारचे खेळ "ज्यॉ" साहेबांस दाखविले ते पाहून सर्वत्रांस संतोष झाला.

परिक्षे करितां भाऊ साहेब सब-डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेब आले होते. त्यांचे रहाण्याची सामानसुमान आणून देण्याची वगैरे सरबराई मास्तर लोकांसच करावी लागली, या विषयीं फार दिलगिरी वाटते.

आह्मां ग्रामस्थांचे नशिबानें या शाळेवर मास्तर उत्तम स्वभावाचे मशिक्षित मिळाले आहेत त्यांस चांगली मदत देऊन आपला फायदा करून घेण्याची कोणीही संधी दवडूं नये.

आपला
गांवांतील "क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक शुद्ध १२ शके १८११

### सेशन खटले.

मागें सेशन ता० २१ पासून सुरू होऊन ता० २४ रोजीं संपले. या सेशनांत एकंदर चार मुकद्दमे निकाल झाले. यापैकीं एक अकोले जिल्ह्यांतील असून बाकी तीन बुलडाणें जिल्ह्यांतील होते या चार पैकीं अकोल्या-जिल्ह्यांतील नामोद येथील गंग्या नांवाच्या कैद्यास ३ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली व बुलडाणें जिल्ह्यांतील तीन मुकद्दम्यापैकीं दोन मधील आरोपी दोषमुक्त ठरून एका मुकद्दम्यांतील आरोपीस जन्म ठेप झाली. बुलडाणें जिल्ह्यांतील जे तीन मुकद्दमे आले होते त्यांत लावलेल्या चैकशीवरून व सेशन कोर्टांत आलेल्या पुराव्यावरून असें स्पष्ट दिसून येते कीं पोलिसाच चांगल्या अनुभवशीर हुशार व कायदेबाज मनुष्याच्या हातून चौकशी झाली नाहीं व त्यामुळें त्या जिल्ह्यांतील दोन मुकद्दमे सुटले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शेगांवांत घडलेल्या खुनाचा तपास करण्याकरितां चकारउला पो. इ. मलकापूर याची नेमणूक झाली होती परंतु हे गृहस्थ आधीं अल्पवयी व नवे असून पोलीस कामा

पब्लिक सर्विस कमिशन थंडे होऊन पुष्कळ दिवस झालें. इतके दिवस त्याच्या रिपोर्टाचा विचार चालला होता. अखेरीस स्टेट सेक्रेटरीचा असा निश्चय झाल्याचें दिसतें कीं या कामीं पार्लमेंटाचा कांहीं नवीन कायदा करण्याची अवश्यकता नाहीं. एतद्देशीय लोकांस अधीक जागा देण्याच्या तजविजी येथल्या येथें होण्या सारख्या आहेत. पहावें सरकार कोण कोणत्या तजविजी योजतें तें.

टाइम्स इंडियाचा सिमल्याचा बातमीदार असें लिहितोः "माझी पूर्वीची मामलेदारासंबंधाची बातमी अगदीं खरी आहे. पेन्शनीची मुदत भरे तों पर्यंत त्यांना भर पगार मिळणार इतकेंच नाहीं तर ते नौकरींत असल्याप्रमाणें त्यांच्या पगाराची बढती होत जाणार" वः, खासें!

९६ हजार केरोसिन तेलाची पिपें जळून दोन कोट रुपयांचें नुकसान झालें; तथापि जर्मन व्यापारी तोच व्यापार करित आहेत.

एका प्रसिद्ध नटीनें तीस दिवस उपवास केला त्याचें कारण शरीर कृश करावें हें होतें कारण स्थूल स्त्रियांस चांगलें नाचतां येत नाहीं.

भावनगर येथें महारुद्र होणार आहे. या कामास सरकारांतून ३ लक्ष रुपये खर्च होणार आहेत. अशा कामीं इतकी रकम खर्च होणें रास्त नाहीं बांको मेजवान्या आणि डाल्या याच्यापेक्षां हा खर्च बरा.

मुंबईत एक युरोपियन बाई हिंदु स्त्रियांचा पोषाख वालते व तिनें हिंदु धर्म स्वीकारला आहे असें इंडियन मिररवरून समजतें. ही बाई कोण?

भामटे लोकांस तुरुंगांत न पाठवितां त्यांचा लिलाव करून त्यास जो कोणी विकत घेईल त्याचे घरीं त्यांनीं दिवस काढावे अशी एका ठिकाणीं चाल आहे. मिसुरी येथें नुकताच लिलाव झाला त्यांत चौघे भामटे विकण्यांत आले. तिघांची पांच पांच रुपये किंमत आली. चौथा दोनच रुपयांस गेला.

रात्राची स्वप्नें पडूं नयेत यासाठीं जेवल्या बरोबर लागलींच निजूं नये.

मनोतीचा भाव वाढल्यामुळें रेल्वेच्या संबंधानें सरकाराला १ कोट तीन लक्ष रुपये जास्ती भरावे लागतात.

"न्यायचक्षु" मासिकपत्र गोव्यास निघूं लागलें.

रशियांतील उपाध्ये जपान देश काबीज करूं पाहत आहेत. रोमन क्याथलिक पाद्री ही जीवापाड मेहनत करित आहेत. पाहावें कोण डाव जिंकतो तो.

मनुष्याचें चामडें कमाविण्याची खटपट जर्मनींत चालली आहे

अमेरिकेंत एक गाय रानांतून चरून घरीं आली ह्मणजे तिच्या सडांत दुधाचा एकही थेंब नसे. यावरून कोणी तरी तिचें दूध चोरून काढितात अशा संशयावरून मालकानें पाळत ठेवली; तों एक काळा भुजंग येऊन तिच्या मागच्या पायाला वेढखा घालून दूध पितांना त्यानें पाहिलें. गाईच्या मालकानें त्यास गोळी घालून ठार मारलें, त्यामुळें गाईस वेड लागून ती मरण पावली.

दक्षिण आटलांटिक समुद्राची खोली ४०२३६ फूट अथवा पावणेनऊ मैल आहे इतका खोल समुद्र दुसरा कोणताच नाहीं.

शिकागी येथें दररोज ११,००० गाई, मेंढ्या ९,१००, १३,६०० डुकरें स्वाहा होतात. तसेंच तेथें २० हजार टन दांत कोरण्याच्या काड्या सालीना तयार होतात; दूध वजन करून घेतात. यंत्रांत एकीकडे दुधाच्या चरव्यांच्या चरव्या येऊन पडतात. एकीकडे लोणी होऊन एका नळीनें बाहेर पडतें व व ताक दुसऱ्या नळीनें जातें. के०

बेळगांव जिल्ह्याच्या पूर्व व दक्षिण भागीं टोळ येऊन त्यांनीं भाताचीं शेतें खाऊन फडशा केलीं. शेतांतून बी सुद्धां निघावयाचें नाहीं.

सन १८८४ पर्यंत हिंदुस्थानासाठीं विलायतेस काढलेलें पौंडांचें कर्ज ९,४८,८४,००० पौंड होतें, व त्याच्या पुढें आजपर्यंत काढलेलें २७,७७,००० पौंड कर्ज आहे. ह्या एकंदर कर्जाबद्दल सन १८८८ सालीं हिंदुस्थानच्या खजिन्यांतून ३,९२,००,००० रुपये व्याज विलायती व्यापाऱ्यांस द्यावें लागलें.

हाडांचा चूर करण्याची एक गिरणी थोड्या दिवसांत कलकत्यास स्थापन होणार आहे. हाडांच्या भुग्याचें खत फार उत्तम. असतें व तें जमिनीस घातलें असतां पिक अत्युत्तम येतें. पिकाच्या रूपानें जमिनींतून जी सत्वें निघतात तीं हाडांच्या खतानें पुनः जमिनीस मिळतात म्हणजे जमीन निकस होत नाहीं.

सन १८८१-९२ सालीं हुंडीच्या चढत्या भावानें हिंदुस्थानचे ३ कोट रुपये नुकसान झालें. पण १८८९।९० सालांत हुंडणावळी प्रत्यिर्ष ८ कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत. हिंदुस्थानची कशी भरभराट होत आहे पहा! ! !

कृत्रिम रेशीम.--तुती पासून कृतीनें रेशिमाचे तंतू काढण्याची युक्ती एका कुशल पुरुषानें काढली आहे. रेशमी किड्याच्या रेशमा प्रमाणें हे रेशिम असतें असें म्हणतात.

अमेरिकेंतील सेंट लारेन्स नदीस किबेक येथें दोन कोट रुपये खर्च करून एक पूल बांधणार आहेत त्याची लांबी ३४००० व रुंदी २४००० फूट असणार. दोन मचव्या मधले अंतर १४४२ फूट राहून पुलाची उंची ४०८ फूट करणार म्हणजे मोठ्या आगबोटी ही त्या खालून सहज जातील.

खाने सुमारीचा खर्च-१८९१ मध्यें होणाऱ्या मनुष्य गणतीस १ कोट रुपये खर्च लागणार व तीन वर्षांच्या खर्चांतून तो काढणार आहेत. १८८१ च्या खाने सुमारीस इतका खर्च लागला होता.

इंडियन एजन्सीचा खर्च--विलायतेस स्थापन झालेल्या इंडियन एजन्सीस १८८८ सालीं १७०० पौंड खर्च झाला व १८८९ साला २९०० पौंड खर्च होणार आहे.

कारखाना ह्मायो जुनी सक्कर आणि गरीबबाद तालुक्यांत टोळांनीं पिकाचा अतीशय नाश केला. शेतांत हिरवख राहिलें नाहींच, पण झाडावर हिरवें पान ही त्यानीं राहूं दिलें नाहीं. शु० सू०

रेल्वेवर देखरेख करण्याकरतां एक कायमचा कमिशनर ठेवण्याचें कलकत्यास घाटत आहे गोऱ्याची चंदी सुरू होइल ह्मणावयाचे!

सिव्हिल सर्व्हिसच्या वयाची यत्ता २९ वर्षें करण्यांत आली असें ह्मणतात.

चीन वगैरे देशांतले लोक बेडूक खातात; तसें इंग्लंडांतल्याही कांहीं प्रांतांतले लोक बेडूक खातात केंब्रिजशायरांत तर त्यांची मोठी आस्था आहे. अमेरिकेंत तर कांहीं लोक मोठाल्या दलदली बुढ्या तयार करून त्यांत हजारों बेडूक 'पिकावतात,' आणि त्यांच्या तगड्यावर पैसे मिळवितात.

टा० अ०

— मुंबईची मुनासिपालिटी २९ लक्ष रुपये लंडनचे व्यापाऱ्यापासून शेंकडा ९ रुपये व्याजावर कर्जाऊ काढणार आहेत.

— टेम्स नदींतून ३-४ मैल लांबीचा एक विवर मार्ग खोदणार आहेत. मध्यंतरीं ६ स्टेशनें होणार असून उतारूस तेथें उतरविण्याची सोय केली जाईल. यांत मुख्य आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं व्यापार विधुतचे साह्यानें चालविणार आहेत.

— प्रिन्स अलबर्ट व्हिक्टर हे राजपुत्र हैदराबाद शहरीं एक आठवडा राहणार आहेत व त्यांचे संबंधानें निजाम सरकार ९ लक्ष रुपये खर्च करणार आहेत.

सक्कर व कात्री ( सिंध ) येथील शेतकऱ्यांत विकण्यासाठीं नरल बरीत व सांतपुरा या गांवच्या लोकांनीं अपहृत बायकांनीं भरलेला एक नांव पाठविल्याचे पोलिसास समजलें आहे.

भविष्यकरी-- या नांवची वनस्पती मेक्सिकोमध्यें उगवते, हिच्या योगानें माणसाला झोंप येते, व त्या झोपेंत विचारलें सांगतां येते व सांगितलेलें कामही करतां येते!!

मद्रास इलाख्यांतील तीनवल्ली येथील एका सबमाजिस्ट्रेटानें ६९००० रुपये किंमतीचे एक पार्सल विमा उतरून टपाल मार्फत बाहेर पाठविण्याकरितां रवाना केलें, परंतु ते परत येऊन त्याजवर "सदर्हू मालक येत नाहीं." असा शेरा मारला होता, सदर माजिस्ट्रेट कडे हें पाकीट परत आल्यावर त्यांस कांहीं संशय आला, ह्मणून पोस्ट मास्तर जनरलच्या समक्ष ते फोडून पाहतां आंत घातलेली किंमतवान नाणी नसून तांब्याची वगैरे हलकी नाणी भरलेली दिसली, यावरून मार्गांत टपाल खात्यांतील एखाद्या नोकरानें ती काढून घेतली असावी असा त्यानीं तर्क केला. परंतु पोस्टमास्तर जनरल म्हणतात, सदर माजिस्ट्रेटांनीं पोस्टास टकविण्या करितां हिरे माणक वगैरे न घालतां तांब्याची वगैरे हलकी नाणीं घातली असावी. शिवाय त्यांनीं बिंगलपटण येथील माजिस्ट्रेटचे मार्फत फिर्यादीची व त्यांचे आप्तइष्टांची एकंदर मिळकत दोन महिने जप्त करून ठेविली होती. यावरून फिर्यादी माजिस्ट्रेट यांनीं ६९००० रुपयांची मूळ किंमत व दुसऱ्या नुकसानीचा खर्च ९००० एकूण ७०००० रुपयांचीं स्टेट सेक्रेटरीवर मद्रास हाय कोर्टांत दावा केला आहे.

— गोखरूचें पान घेऊन पाण्यांत पांच सात वेळ बुडविलें असतां पाणी फार दाट होतें असें म्हणतात.

— तंव्यामिळाचा मुकदमा कांहीं दिवस तहकूब ठेवण्यांत आला आहे. आंदमन्सहून कांहीं साक्षीदार यावयाचे आहेत, ते आल्यावर चौकशीस आरंभ होईल.

गेल्या ३४ वर्षांतल्या लढायांत प्राणहानि— त्या लढायांत एकंदर मिळून २२३९००० माणसें मेलीं. क्रिमियाच्या लढाईंत ७,९०,००० मेलीं. इटालीच्या लढाइंत ४९,००० मेलीं. ड्यानिश लढाईत ३,००० मेलीं; अमेरिकेंतल्या आपसांतल्या लढाईंत उत्तर वाल्यांची २०,८,००० मेलीं; दक्षिण वाल्यांचीं ९,२८,००० मेलीं; आस्त्रिया आणि रुशिया ह्यांच्या लढाईंत ४९,००० मेलीं; फान्स आणि जर्मनी ह्यांच्या लढाईत फान्साकडची १,९९,००० मेलीं, आणि जर्मनी कडची ६०,००० मेलीं; तुर्कस्थान आणि रशिया ह्यांच्या लढाईत २,९०,००० मेलीं; दक्षिण अफ्रिकेंतल्या लढाईंत ३,०००० मेलीं; आफगाणिस्थानच्या लढाईंत २९,००० मेलीं; मेक्सिको आणि कोचिन चायना ह्यांच्या स्वाऱ्यांत ६९,००० मेलीं; आणि बलगेरिया व सर्व्हिया ह्यांच्या लढाइंत ३९,००० मेलीं किती माणसें मेलीं हीं! हीं जर इतकीं रोगानें मेली असतीं, तर लोकांनीं देवाला किंवा दैवाला दोष लावून किती शोक केला असतां बरें! पण, ही सगळी मंडळी राज्य लोभाच्या भक्ष्यस्थानीं पडली, किंवा आमच्या राज्यकारस्थानांनीं तीं त्या भक्ष्यस्थानीं पाडिलीं, असें ह्मणावयचें. तेव्हां आतां कोणाच्या नांवानें रडावयाचें! विचारसंपन्नता दिवसें दिवस पृथ्वीच्या पाठीवर वाढत चालली आहे, असें सगळ्या मुज्ञ जनांचें मत आहे त्या वृद्धींचा हा कां परिणाम व्हावा! विद्या संपन्नता कितीही वाढो. लोभ मी ह्मणतोंच आहे.

न्या० सिं०

प्रिन्सआफवेल्स हे विलायतेस जाणार आहेत.

दोघां इंग्लिश पत्रकारावर राजद्रोहाचा आरोप आला आहे.

हायकोर्टांतील रिकाम्या जागेवर आ० तेलंग यांची नेमणूक झाली.

पारीस प्रदर्शनांत मुके व बहिरे यांनीं केलेलीं कामें मांडिलीं आहेत.

कोंबडीच्या अंड्याचें तेल जखमा भरून येण्यास फार उपयोगी आहे.

नेपल्स शहर जवळ नुकतांच आगगाडीचा मोठा अपघात झाला. हजारों मनुष्यें मेलीं.

अं० ल०

रसायनिक क्रियाकरितां लागणारीं यंत्रें युरोपियन लोकांच्या देखरेखीखालीं तयार करून विकण्याचा एक कारखाना कलकत्यांतील कांहीं ग्र्याज्युएटांनीं घातला आहे.

तंव्यामिल्लास शिक्षा—प्रसिद्ध तंव्यामिळाची चौकशी जबलपूर येथें चालली होती, हिचा निकाल होऊन त्याला जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा झाली. तंव्यावर एक खुनाचा आरोप होता परंतु तो शाबीत झाला नाहीं.

सर सिमोरके हे प्रसिद्ध व हिंदुस्थानचे कैवारी गृहस्थ आज कित्येक वर्षांपासून इंग्लिश पार्लमेंटांत प्रवेश करणेस पहात होते; परंतु साधेना. यांस शेवटीं यश येऊन एडिन परगण्याचे वतीनें पार्लमेंटांत त्यांचा रिघाव झाला. ल०

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.